सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, ९ नोव्हेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक २ रा | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

दर्बी
क्लॉथ मार्केट
(नवी पेठ)
सुटींग, शर्टिंग, लिनन, खादी, कॉटन, सिल्क
प्रीमियम व एक्सक्लुझिव्ह शुटिंग आणि शर्टिंग साठी एकदा आवश्य भेट द्या...!
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ), सोलापूर - ४१३००७
9422459645 | 9130008644

# ‘एक है तो सेफ है’

## जातिजमातींमध्ये संघर्ष घडविण्याचा काँग्रेसचा कट हाणून पाडा

## धुळ्याच्या सभेत पंतप्रधान मोदींचे आवाहन

◆ **मुंबई, ८ नोव्हेंबर**

देशातील विविध जातींमध्ये संघर्ष घडविण्याचा धोकादायक कट काँग्रेस व महाविकास आघाडीने रचला असून, त्यापासून महाराष्ट्राने व देशाने सावध राहावे, असा गंभीर इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी धुळे येथे महायुतीच्या प्रचाराकरिता आयोजित विशाल जाहीर सभेत दिला. 'एक है तो सेफ है' असा मंत्रही त्यांनी देशाला दिला.

काँग्रेस व त्यांच्या साथीदारांच्या या कटापासून जनतेला सावध करणे माझे कर्तव्य आहे. काँग्रेसचा हा इतिहासच आहे आणि तोच वारसा काँग्रेसच्या युवराजांनी पुढे चालविला आहे, अशा शब्दांत त्यांनी राहुल गांधींवरही नेम साधला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, प्रतापराव जाधव आदी उपस्थित होते.



धुळे जिल्ह्यात शुक्रवारी आयोजित महायुतीच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ आयोजित भव्य जाहीर सभेपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले

### मातृभाषा ही दुसरी आई


मातृभाषा ही आपली दुसरी आई असते. आमच्या सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. यावर देश-विदेशातील मराठी भाषकांनी समाधान व्यक्त केले. मराठीजनांचे हे जुने स्वप्न आमच्या सरकारने पूर्ण केले. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा ही कित्येक दशकांपासून जनतेची मागणी होती; पण केंद्रात आणि राज्यात सरकारे असूनही काँग्रेसने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी काही केले नाही, अशी टीका मोदी यांनी केली.

काँग्रेस आणि त्यांच्या साथीदारांना दलित, मागासवर्गीय, आदिवासींची प्रगती सहन होत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाच्या आरक्षणासाठी प्रयत्न केले, पण पंडित नेहरूंनी दलित, मागासवर्गीय आदिवासींना आरक्षण मिळू नये यासाठी शिकस्त केली. महत्प्रयासाने बाबासाहेबांनी आरक्षणाची तरतूद केली, पण त्यासाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. नेहरूंनंतर इंदिराजींनीही तीच आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला. नंतर राजीव गांधीही त्याच विचाराचे वारस होते. त्यांनीही ओबीसी आरक्षणास जाहीर विरोध केला होता. हे आरक्षण झाले तर त्यांच्या राजकारणाचे दुकान बंद होईल, ही भीती त्यांना होती. आज त्याच भयापोटी काँग्रेसचे युवराज काम करीत आहेत, असे पंतप्रधान म्हणाले. *(तभा वृत्तसेवा)*

## महत्त्वाचे

### विक्रीच्या सपाट्याने बाजारात घसरण

**मुंबई :** देशांतर्गत शेअर बाजारातील घसरण सलग दुसऱ्या दिवशीही कायम राहिली. आठवड्याच्या शेवटच्या सत्रात निर्देशांक ५५ अंकांनी घसरून



७९,४८६ वर बंद झाला तर निफ्टीत ५१ अंकांची घसरण झाली. दिवसभरातील कारभारात मिडकॅप आणि स्मॉल कॅप शेअर्सची सपाट्याने विक्री झाली. याचाच परिणाम बाजारातील घसरणीत झाला. मुंबई बाजारातील ३० पैकी १६ शेअर्स तेजीत तर उर्वरित १४ मंदीच्या सावटाखाली होती. निफ्टीमध्ये ५० पैकी २३ शेअर्स वाढले तर २७ शेअर्सना तोटा सहन करावा लागला. सर्वाधिक घसरण एशियन पेंट्सच्या शेअर्समध्ये दिसून आली.

### मुंबईत २.३ कोटींची रोकड जप्त

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर पोलिसांनी दक्षिण मुंबईतील काळबादेवी येथे १२ जणांकडून २.३ कोटी रुपयांची रोकड जप्त केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. लोकमान्य टिळक मार्ग पोलिस स्टेशन आणि निवडणूक अधिकाऱ्यांच्या पथकाने गुरुवारी रात्री लोकांच्या एका गटाला रोखले आणि त्यांच्याकडून २.३ कोटी रुपयांची रोकड जप्त केली. या प्रकरणी या सर्वांना ताब्यात घेण्यात आले. ही रोख आयकर विभागाकडे सुपुर्द करण्यात आली.

### १६ लाख रुपयांच्या गांजासह रशियन महिलेला अटक

**पणजी :** गोवा पोलिसांनी १६ लाख रुपयांचा गांजा आणि एक्स्टसी बाळगल्या प्रकरणी एका रशियन महिलेला अटक केली. अमली पदार्थ विरोधी सेलच्या पथकाने गुरुवारी केरी येथील भाड्याच्या खोलीवर छापा टाकला आणि ३६.१६ ग्रॅम गांजा, ३३७ ग्रॅम एक्स्टेसी आणि १६.८ लाख रुपयांची दारू जप्त केली. मॉस्को येथील राहिवासी असलेल्या या महिलेला नार्कोटिक्स ड्रग्ज ॲण्ड सायकोट्रॉपिक सबस्टन्स (एनडीपीएस) कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे.

# गाव संरक्षण गार्ड्सच्या दोन सदस्यांची अतिरेक्यांकडून हत्या

◆ **जम्मू, ८ नोव्हेंबर**

अतिरेक्यांनी गाव संरक्षण गार्ड्सच्या दोन सदस्यांचे अपहरण करून त्यांना गोळ्या घालून ठार केले. जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यातील पर्वतीय भागात ही घटना घडली. या घटनेमुळे किश्तवाड शहरात संतापाची लाट उसळली असून, लोकांनी रस्त्यांवर येऊन तीव्र आंदोलन केले. नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी या घटनेचा निषेध केला आहे.

या हत्याकांडानंतर पोलिस आणि लष्करी जवानांनी पर्वतीय भाग आणि लगतच्या घनदाट जंगलात व्यापक शोधमोहीम उघडली आहे. नाझीर अहमद आणि कुलदीप कुमार अशी हत्या झालेल्या गाव संरक्षण सदस्यांची नावे आहेत.

हे दोघे नेहमीप्रमाणे आज सकाळी मुंझला धार जंगलात त्यांची गुरे चारण्यासाठी गेले होते. त्याचवेळी अतिरेक्यांनी त्यांचे अपहरण केले, अशी माहिती सूत्रांनी दिली. *(वृत्तसंस्था)*

### बारामुल्लात दोन अतिरेक्यांचा खात्मा

**श्रीनगर :** सुरक्षा दलाच्या जवानांनी बारामुल्ला जिल्ह्यात शुक्रवारी एका चकमकीत दोन अतिरेक्यांना ठार मारले. त्यांच्या जवळून शस्त्र व स्फोटकांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. हे दोन्ही अतिरेकी कोणत्या गटाचे आहेत, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. या भागात अतिरेकी आल्याची माहिती मिळाल्यानंतर जवानांनी गुरुवारी सायंकाळी नाकेबंदी करून अतिरेक्यांचे मार्ग बंद केले होते.

### तोयबाच्या तीन अतिरेक्यांना अटक

**श्रीनगर :** पोलिस आणि सुरक्षा दलाच्या जवानांनी शुक्रवारी लष्कर-ए-तोयबाच्या तीन अतिरेक्यांना अटक केली. अलिकडेच शहरातील प्रसिद्ध बाजारात पहाडावरून करण्यात आलेल्या बॉम्बहल्ल्यात १० नागरिक जखमी झाले होते. यात या अतिरेक्यांचा सहभाग होता. उस्मा यासिन, उमर फयाज आणि अफनान मन्सूर शेख अशी या अतिरेक्यांची नावे आहेत.

### दोन नक्षलवादी चकमकीत ठार

**बिजापूर :** छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात शुक्रवारी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलाच्या जवानांनी दोन नक्षलवाद्यांना ठार केले. उसूर, बासागुडा आणि पामेड या तीन गावांना लागून असलेल्या जंगलात सुरक्षा दलांचे जवान नक्षलविरोधी मोहिमेवर असताना आज सकाळी ही चकमक झडली. गोळीबार थांबल्यानंतर जवानांनी जंगलात शोधमोहीम राबवली असता, दोन नक्षल्यांचे मृतदेह आढळून आले.

# अलिगड मुस्लिम विद्यापीठाचा मुद्दा नव्या न्यायासनाकडे

## सुप्रीम कोर्टाने फिरवला १९६७ चा निर्णय

◆ **नवी दिल्ली, ८ नोव्हेंबर**

अलिगड मुस्लिम विद्यापीठाच्या अल्पसंख्यक दर्जाचा मुद्दा नव्या न्यायासनाकडे सोपविण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. या विद्यापीठाची स्थापना अल्पसंख्यकांनी केली होती का, याचा निर्णय आता नवे न्यायासन घेणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या ७ सदसयीय घटनापीठाने शुक्रवारी ४:३ अशा बहुमताने या मुद्यावर आपला निर्णय दिला. विशेष म्हणजे, न्यायालयाने १९६७ च्या निर्णयात असे म्हटले होते की, अलिगड विद्यापीठ अल्पसंख्यक दर्जावर दावा करू शकत नाही. त्यावेळी अजीज बाशा प्रकरणात न्यायालयाने एएमयू हे केंद्रीय विद्यापीठ असून, ते अल्पसंख्यकांनी स्थापन केले नाही किंवा चालवले नाही, असे स्पष्ट केले होते. आज हा निर्णयही न्यायालयाने फिरवला.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी स्वत:साठी तसेच न्या. संजीव खन्ना, न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्यासाठी निकाल लिहिला. तिथेच न्या. सूर्यकांत, न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. सतीश चंद्र शर्मा यांनी विरोधात निकाल दिला. या प्रकरणी जानेवारी २००६ मध्ये नव्याने वाद निर्माण झाला होता. अलिगड मुस्लिम विद्यापीठाने स्वत:ला अल्पसंख्यक संस्था मानत, मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय पीजी अभ्यासक्रमांत ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. याविरोधात हिंदू विद्यार्थी अलाहाबाद उच्च न्यायालयात गेले. उच्च न्यायालयाने एएमयूला अल्पसंख्यक संस्था मानण्यास नकार दिला. *(वृत्तसंस्था)*

# पंतप्रधान मोदी यांची आज अकोल्यात सभा

◆ **अकोला, ८ नोव्हेंबर**


देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विशाल जाहीर सभा शनिवारी सकाळी १० वाजता स्थानिक डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील प्रांगणात होणार आहे. यात पंतप्रधान मोदी हे पश्चिम विदर्भ महाविजय संकल्प सभेला संबोधित करणार आहेत.

यावेळी त्यांच्यासोबत भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते खा. प्रफुल्ल पटेल, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, शिवसेना नेते आनंदराव अडसूळ, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, खासदार अनुप धोत्रे, आ. वसंत खंडेलवाल, आ. अमोल मिटकरी, तुकाराम बिडकर तसेच महायुतीचे उमेदवार आ. रणधीर सावरकर, विजय अग्रवाल, श्याम खाडे, हरीश पिंपळे, आकाश फुंडकर, प्रकाश भारसाकळे, सई डाहाके, डॉ. संजय कुटे, चैनसुख संचेती, श्वेता महाले, संजय रायमूलकर, भावना गवळी, संजय गायकवाड, बळीराम सिरस्कार उपस्थित राहणार आहेत. या उमेदवारांच्या प्रचारार्थ ही जाहीर सभा भाजपा आणि महायुतीने आयोजित केली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विशाल सभेसाठी मंडप सज्ज असून त्याच्या सुरक्षेसाठी पोलिसांना तैनात करण्यात आले आहे

या जाहीर सभेत महायुतीच्या सर्व जिल्हाध्यक्षांनी आपल्या समर्थकांसह मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. *(तभा वृत्तसेवा)*



## इति-उवाच...



लाडकी बहीण योजनेवर टीका करणारे आता स्वत: ३००० रुपये देण्याचे आश्वासन देत आहेत. १५०० रुपयांनी राज्याला फटका बसतो, तर मग ३००० रुपये कसे देणार, हे सुप्रिया सुळेंनी सांगितले पाहिजे आणि राज्यातील २ कोटी ४० लाख महिलांची माफी मागितली पाहिजे.

**रूपाली चाकणकर,** राकाँ नेत्या.



विधानसभा निवडणुकीनंतर शिक्षण आणि नोकऱ्यांतील आरक्षण जाणार. ओबीसींनो, आरक्षण वाचवायचे असेल, तर वंचितच्या उमेदवारांना निवडून द्या.

**प्रकाश आंबेडकर,** वंचित बहुजन आघाडी



मूळ काँग्रेसमधील आणि आता शरद पवारांच्या गटात आलेले उमेदवार तरुणांचे लग्न लावून देणार, असे सांगत आहेत. त्यांच्या काँग्रेस पक्षाच्या नेत्याचे तरी लग्न लागले का, हे आधी त्यांना विचारा!

**धनंजय मुंडे,** राकाँ नेते



आम्ही आधीपासून हेच सांगत होतो. जे नेते गेले, ते विकासासाठी गेलेले नाहीत. त्यांच्यावर कारवाई होत होती, त्यापासून पळण्यासाठी ते सत्तेत गेले आहेत. केवळ फोडाफोडीचे राजकारण आणि दबावतंत्र या सर्वांच्या मागे आधुनिक काळाचा अनाजीपंत कोण, हे लोकांना समजले आहे.

**रोहित पवार,** शरद पवार गटाचे नेते

# शरद पवार फेक नॅरेटिव्ह फॅक्टरीचे मालक





### खासदार सुप्रिया सुळे व्यवस्थापिका : देवेंद्र फडणवीस

◆ **मुंबई, ८ नोव्हेंबर**

महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला स्थलांतरित होत असल्याची खोटी माहिती पसरवून विरोधक राज्याची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करति आहेत. महाराष्ट्र गुंतवणुकीसाठी अजूनही पहिली पसंती आहे आणि संपूर्ण भारतातील ५२ टक्के विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात येत असताना, खोटे नॅरेटिव्ह पसरविण्याचा प्रयत्न विरोधकांनी चालवला आहे. शरद पवार हे फेक नॅरेटिव्ह फॅक्टरीचे मालक आहेत, तर, खासदार सुप्रिया सुळे या व्यवस्थापिका, असा घणाघात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

**दहा लाख रोजगाराच्या संधी**

सभेच्या शेवटी फडणवीस यांनी १० लाख युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट मांडले आणि महाराष्ट्राच्या आर्थिक स्थैर्याचे पुन्हा एकदा पुनरुज्जीवन करण्याचे वचन दिले. त्यांनी मतदारांना आवाहन केले की, विरोधकांनी पसरवलेल्या फेक नॅरेटिव्हपासून सावध राहा आणि महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीवर विश्वास ठेवावा. ■

पिंपरी चिंचवडमध्ये महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत ते बोलत होते. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र औद्योगिक दृष्टिकोनातून मजबूत आहे आणि विरोधकांनी पसरवलेली माहिती फसवी आहे. आमच्या सरकारने महाराष्ट्राला गुंतवणुकीसाठी आदर्श ठिकाण बनवले आहे. राज्यातील औद्योगिक स्थान बदलत असल्याची बातमी खोटी असून, ती फक्त जनतेची दिशाभूल करण्यासाठी आहे.

यावेळी त्यांनी खासदार सुप्रिया सुळे यांचाही फेक नॅरेटिव्ह फॅक्टरीच्या व्यवस्थापिका असा उल्लेख केला. राज्यातील औद्योगिक क्षेत्र सशक्त आहे आणि कोणतेही आव्हान हे महाविकास आघाडीच्या कार्यकाळात आलेल्या अडचणींचा परिणाम आहे. सुळे यांचे विधान चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी याला महाराष्ट्राच्या प्रगतीस नुकसान पोहोचवण्याचा प्रयत्न आहे, असा आरोप केला.

'लाडकी बहीण' योजनेवरील उद्धव ठाकरे यांनी केलेल्या टीकेचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, ठाकरे यांनी योजनेला विरोध दर्शवणे हे सर्वसामान्य लोकांच्या गरजांशी विसंगत आहे. या योजनेतून हजारो मुलींना आर्थिक मदत मिळणार असून, त्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध होतील. ◂(तभा वृत्तसेवा)

# ...असे गेले शिवाजीरावांचे मुख्यमंत्रिपद





### वैद्यकीय प्रवेशासाठी मुलीचे दोन गुण वाढवल्याचा आरोप

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ८ नोव्हेंबर**

१९८५ मध्ये शिवाजीराव निलंगेकर पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्री म्हणून त्यांचा कार्यकाळ फक्त नऊ महिन्यांचा होता. एमडी परीक्षेत मुलीचे गुण वाढवल्याच्या आरोपावरून पाटील वादाच्या भोवऱ्यात सापडले आणि त्याची परिणती मुख्यमंत्रिपद गमावण्यात झाली.



१९८५ ची निवडणूक काँग्रेसने वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वात लढवली आणि जिंकली. अपेक्षेप्रमाणे वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. नंतर आपल्याला न विचारता प्रभा राव यांची प्रदेश काँग्रेस अध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्यामुळे नाराज झालेल्या वसंतदादांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. परिणामी दादांचे निकटवर्तीय असलेल्या शिवाजीराव निलंगेकर यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली. मुख्यमंत्री झाले तेव्हा शिवाजीराव कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. निलंग्याचे असल्यामुळे शिवाजीराव पाटील यांच्या नावात निलंगेकर हे कायमस्वरूपी जोडल्या गेले.

१९५२ मध्ये काँग्रेसतर्फे त्यांनी निलंगा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली. पण, पहिल्याच निवडणुकीत त्यांचा शेकापच्या उमेदवाराने पराभव केला. १९६२ मध्ये मात्र निलंगा मतदारसंघातून शेकापच्या उमेदवाराचा पराभव करीत शिवाजीराव पाटील पहिल्यांदा विधानसभेवर निवडून आले. नंतर राजकारणातील त्यांचा प्रभाव वाढत गेला. काँग्रेस पक्ष आणि गांधी घराण्यावर त्यांची निष्ठा होती.

सुरुवातीला उपमंत्री म्हणून मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला. काही वर्षांपूर्वी राजकारणात उपमंत्रिपद अस्तित्वात होते. आता ते पद राहिले नाही. राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री असा प्रवास करीत शिवाजीराव मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचले. अंतुले यांच्या मंत्रिमंडळात शिवाजीराव सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. महाराष्ट्र विधानसभेचे बांधकाम त्यांच्याच नेतृत्वात पूर्ण झाले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विधानभवनाच्या इमारतीचे उद्घाटन केले होते.

१९७४ मध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसमध्ये दोन गट पडले. उस्मानाबाद जिल्ह्यातही त्याचे पडसाद उमटले. वसंतदादा पाटील यांच्या गटात शिवाजीराव निलंगेकर पाटील, तर शंकरराव चव्हाण यांच्या गटात विलासराव देशमुख होते. महाराष्ट्रातील अनेक काँग्रेस नेत्यांनी पक्ष आणि निष्ठा बदलल्या. पण, शिवाजीराव निलंगेकर यांच्या निष्ठा गांधी घराण्यावर कायम होत्या.

मुख्यमंत्री म्हणून शिवाजीराव यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. विदर्भ आणि मराठवाड्याच्या विकासासाठी अनेक कलमी कृती कार्यक्रमाची घोषणा केली. त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली. सोबतच पक्षांतर्गत विरोधकांची संख्या वाढली. सर्व काही सुरळीत सुरू असताना आपली मुलगी चंद्रकला डवले हिचे वैद्यकीय प्रवेश परीक्षेत एमडीच्या प्रवेशासाठी दोन गुण वाढवल्याच्या आरोपामुळे शिवाजीराव अडचणीत आले. विरोधकांनी या मुद्यावरून त्यांना घेरत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. प्रकरण न्यायालयात गेले, न्यायालयानेही त्यांच्यावर ताशेरे ओढले. परिणामी त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. शिवाजीरावांच्या निष्कलंक राजकीय कारकीर्दीवर एक न मिटणारा डाग लागला. पुढे या प्रकरणात त्यांना क्लीनचिट मिळाली, हा भाग वेगळा. तोपर्यंत त्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले होते. १९६२ ते २०१४ असे जवळपास ४२ वर्षे विधानसभेचे सदस्य असलेल्या शिवाजीरावांचे कोरोना काळात निधन झाले. ■



शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शुक्रवारी दुचाकीवर फिरून पुण्याच्या शिवाजीनगर मतदारसंघातील महाविकास आघाडीतील काँग्रेसचे उमेदवार दत्ता बहिरट यांच्यासाठी प्रचार केला

# हवामान अभ्यासक पंजाबराव डख भाजपामध्ये

### वंचितचा अंदाज चुकला

◆ **परभणी, ८ नोव्हेंबर**

सोशल मीडियातून प्रसिद्ध झालेले परभणीतील हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी अनेकांचा अंदाज चुकवत राजकीय 'एंट्री' केली आहे. पंजाबराव डख यांनी भाजपात प्रवेश केला असून, भाजपाच्या विद्यमान आमदार मेघना बोर्डीकर यांच्यासाठी ते प्रचाराच्या मैदानात उतरणार आहेत. त्यांच्या पक्ष प्रवेशाने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, पंजाबराव यांचा अंदाज अचूक ठरणार का, हे पाहावे लागेल.

भाजपा नेते रामप्रसाद बोर्डीकर यांच्या हस्ते पंजाबराव डख यांनी भाजपात प्रवेश करून कमळाचा गमछा गळ्यात घातला. ऐन निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी भाजपात प्रवेश करून निवडणूक प्रचाराच्या मैदानात उतरणार असल्याचे सांगितले. आता जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवार मेघना बोर्डीकर यांचा प्रचार ते करणार आहेत. पंजाबराव यांनी लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक लढवली होती, त्यामुळे ते चर्चेत आले होते. आता वंचित सोडून ते भाजपात गेले. ◂(वृत्तसंस्था)

**आतापर्यंत ४३८ कोटी रुपये जप्त**

# दोन राज्यांत कडक नोटांची अवकाळी 'बरसात'

◆ **नवी दिल्ली, ८ नोव्हेंबर**

महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीदरम्यान मतदारांना प्रलोभनापासून रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने केलेल्या कारवाईत आतापर्यंत तब्बल ४३८ कोटी रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. यात एकट्या महाराष्ट्रातून २८० कोटींचा ऐवज



जप्त झाला असून, २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत या रकमेत तिप्पटीने वाढ झाली आहे.

जप्त केलेल्या ऐवजात रोख रक्कम, मद्यसाठा, अमली पदार्थ तसेच मौल्यवान धातू व भेटवस्तूंचा समावेश आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र आणि झारखंडसोबतच विविध राज्यांमध्ये होत असलेल्या पोटनिवडणुकीतही मतदारांना प्रलोभनापासून रोखण्यासाठी तपास यंत्रणांमार्फत कारवाई केली जात आहे. याअंतर्गत महाराष्ट्रातून २८० कोटी रुपयांचा, झारखंडमधून १५८ कोटी रुपयांचा, तर पोटनिवडणुका होत असलेल्या राज्यांमधून ११८ कोटी रुपयांचा असा एकूण ५५८ कोटी रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला . २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत १०३ कोटी कोटीचा, तर झारखंडमध्ये केवळ १८.७६ कोटी रुपयांचा ऐवज जप्त झाला होता, याकडे निवडणूक आयोगाने लक्ष वेधले. ◂(वृत्तसंस्था)

**महाराष्ट्रातून जप्त झालेला ऐवज**

| | |
|---|---|
| रोख रक्कम | ७३.११ कोटी |
| मद्यसाठा | ३७.९८ कोटी |
| अमली पदार्थ | ३७.७६ कोटी |
| दागदागिने | ९०.५३ कोटी |
| भेटवस्तू | ४२.५५ कोटी |
| एकूण | २८१.९३ कोटी |

# महाराष्ट्रात मविआचा सुपडासाफ होणार

### गृहमंत्री अमित शाहांचा हल्लाबोल

◆ **शिराळा, ८ नोव्हेंबर**

हरयाणातील निवडणुकीचे ताजे उदाहरण सर्वांसमोर आहे. तिथल्याप्रमाणे महाराष्ट्रातही महाविकास आघाडीचा सुपडासाफ होणार. शरद पवार यांच्या चार पिढ्या जरी आल्या, तरी आम्ही जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० परत आणणार नाही, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी टीका केली.

ते सांगली जिल्ह्यातील शिराळा येथे भाजपा उमेदवार सत्यजीत देशमुख यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेत बोलत होते. त्यांनी शिराळ्यातील भुईकोट किल्ल्यावर छत्रपती संभाजी महाराजांचे मोठे स्मारक बांधण्याची घोषणा करीत महाविकास आघाडीवर सडकून टीका केली. गृहमंत्री म्हणाले, शरद पवार एरवी शेतकऱ्यांचा कैवार घेतात. पण, त्यांनी सत्तेत असताना त्यांच्यासाठी काय केले, त्यांनी आपल्या कारकीर्दीत महाराष्ट्राला काय दिले, हे सांगावे. याउलट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना ६ हजार रुपये देण्याचे काम केले.



कराड येथे शुक्रवारी महायुतीच्या उमेदवारांसाठी आयोजित भव्य जाहीर सभेत अमित शाह यांचा तलवार देऊन सत्कार करण्यात आला

**राम मंदिरावरून महाविकास आघाडीवर टीका**

अमित शाह म्हणाले, काँग्रेसने अयोध्येतील राम मंदिराचा मुद्दा तब्बल ७५ वर्षे भिजत ठेवला. पण, मोदींनी अवघ्या पाच वर्षांत राम मंदिर उभे करून दाखवले. हे मंदिर तयार झाले तेव्हा शरद पवार, उद्धव ठाकरे, राहुल गांधी प्रभु रामचंद्रांच्या दर्शनाला जाणार होते. पण, ते अजून अयोध्येला गेले नाहीत. आता हे लोक जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० पुन्हा लागू करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**पवारांच्या काढल्या चार पिढ्या**

भाजपा सरकारने व्याप्त काश्मिरात सर्जिकल स्ट्राईक केला, पण राहुल गांधी यांनी त्याचे पुरावे मागितले. त्यांना पुरावेच हवे असतील, तर त्यांनी टीव्हीवर पाकिस्तानचे चेहरे पाहावे. हरयाणातही हे आघाडीवाले फटाके घेऊन गेले होते. पण, त्यांना हे फटाके भाजपा नेत्यांना द्यावे लागले. तिथे त्यांचा सुपडासाफ झाला. आता महाराष्ट्रातही महाविकास आघाडीचा सुपडासाफ होईल, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# बारामतीतील लढाई कुटुंबातील : अजित पवार

◆ **पुणे, ८ नोव्हेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बारामती मतदारसंघात प्रचारसभा घेण्याची विनंती केली नाही; कारण तेथील लढा हा कुटुंबात आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी सांगितले.



अजित पवार हे शरद पवार गटाचे उमेदवार आणि त्यांचा सख्खा पुतण्या युगेंद्र पवार यांच्या विरोधात लढत आहेत. २० नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान मोदी यांच्या प्रचार सभेला शुक्रवारपासून सुरुवात झाली आहे. बारामती मतदारसंघात पंतप्रधान मोदी सभा घेणार नाहीत का, असा प्रश्न विचारला असता अजित पवार म्हणाले, येथील लढा केवळ कुटुंबापुरता मर्यादित आहे. अमित शाह यांच्या प्रचार सभा मतदारसंघात होणार नाहीत का, याला उत्तर देत ते म्हणाले की, प्रचारासाठी फार वेळ नसल्यामुळे आणि निवडणूक खर्चाच्या मर्यादेमुळे आम्ही त्यावर विचार केला नाही.

बारामतीत विजयाचे मताधिक्य किती असेल, असे विचारले असता, मतदारसंघात फिरून आणि लोकांशी संवाद साधल्यानंतर ते सांगू शकेन. पण मी शंभर टक्के खात्रीने सांगू शकतो की, ही चांगली आघाडी असेल, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)



ठाणे येथे महायुतीच्या प्रचारानंतर आयोजित पत्रपरिषदेत उपस्थित केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते किरेन रिजिजू तसेच पक्षाचे उमेदवार



# 'वोटोबा' करतोय् मतदार जनजागृती

◆ **नाशिक, ८ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीप उपक्रमांतर्गत विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. नागरी भागात 'वोटोबा' शुभंकर तयार करून गर्दीच्या ठिकाणी मतदार जनजागृती करण्यात येत आहे.

हा 'वोटोबा' नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. जिल्ह्यात स्वीप नोडल अधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या नियंत्रणाखाली शहरी व ग्रामीण भागात स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यात बॅनर, विविध स्पर्धा, सायकल रॅली, सेल्फी पॉईंट्स, विविध व्हिडीओंद्वारे जनजागृती, घंटागाडींद्वारे जनजागृती, पथनाट्य, गृहभेटी आदी उपक्रम राबविण्यात येत आहेत. १९ नोव्हेंबरपर्यंत जनजागृती करण्यात येईल. मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी नागरी भागात 'वोटोबा'च्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

ग्रामीण भागातही मोठ्या ग्रामपंचायतींत याद्वारे जनजागृती सुरू आहे. या 'वोटोबा'द्वारे गर्दीची ठिकाणे, बाजारपेठ, बसस्थानक, दुकाने, सार्वजनिक ठिकाणी मतदान करण्याबाबत जनजागृती करण्यात येते. या उपक्रमाला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, हा 'वोटोबा' नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# १३.२६ कोटींची दारू, ड्रग्ज, वस्तू जप्त

◆ **ठाणे, ८ नोव्हेंबर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी १३.२६ कोटी रुपयांची दारू, ड्रग्ज व मोफत वस्तू जप्त केल्या आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

जप्तीसंदर्भात एकूण २०९ एफआयआर नोंदविण्यात आले आहे, असे ठाण्याचे जिल्हाधिकारी शिनगारे यांनी बुधवारी विशेष निरीक्षक (खर्च) बी. आर. बालकृष्णन् यांच्यासोबतच्या आढावा बैठकीत सांगितले. शिनगारे यांनी ठाणे जिल्ह्यातील आगामी निवडणुकांशी संबंधित महत्त्वाची आकडेवारी सादर केली. यात १८ विधानसभा मतदारसंघांमध्ये ७२ लाख २९ हजार ३३९ मतदार असून, त्यात २२ लाख ८२ हजार ८८२ महिला आणि १,४१५ तृतीय पंथी आहेत. ◂(वृत्तसंस्था)



## महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवादलाच्या प्रभारी प्रदेशाध्यक्षपदी सुदीप चाकोते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवादलच्या प्रभारी प्रदेश अध्यक्षपदी सुदीप चाकोते यांची निवड झाली. काँग्रेस सेवादलचे राष्ट्रीय अध्यक्ष लालजीभाई देसाई यांनी सुदीप चाकोते यांना दिल्लीला बोलवून घेतले.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी राहुल गांधी व काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या आदेशानुसार विधानसभा निवडणुकीसंदर्भात संपूर्ण महाराष्ट्राचे प्रभारी सुदीप चाकोते यांना सोपवण्यात आले. चाकोते यांनी राहुल गांधी, मल्लिकार्जुन खार्गे व लालजीभाई देसाई यांचे आभार मानले. चाकोते हे काँग्रेस सेवादल ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष असताना त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून यंग ब्रिगेडची मोठी फळी उभा केली. आता काँग्रेस सेवादल व सेवादल यंग ब्रिगेडचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना एकत्र आणून संपूर्ण महाराष्ट्रात महाविकास आघाडी चे सरकार आणल्याशिवाय स्वस्त बसणार नाही, असे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र गुजरातला आंदण देणाऱ्यांना धडा शिकवा

## ● जयंत पाटील : महाविकास आघाडीचे माढ्याचे उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ उपळाई येथे जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा,**
**माढा/पंढरपूर, दि. ८ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्यातील मोठमोठे उद्योगधंदे गुजरातला नेऊन येथील रोजगार पळविला जात असताना बघ्याची भूमिका घेणाऱ्या शिंदे सरकारने महाराष्ट्र राज्य जणू गुजरातलाच आंदण दिले आहे. शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीतही भ्रष्टाचार करून त्याची परिसीमा गाठणाऱ्या त्रिकुटाला पुन्हा सत्तेत बसवणे म्हणजे राज्याला अधोगतीकडे नेण्यासारखे आहे, हे राज्यातील जनतेने ओळखले आहे. सध्या निवडणूक आपल्या टप्प्यात आली असून विजयाचे मताधिक्य वाढवा, असे आवाहन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले.

माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित पाटील यांच्या प्रचारासाठी उपळाई (ता. माढा) येथे आयोजित सभेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, संजय पाटील-घाटणेकर, ॲड. बाळासाहेब पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, निरीक्षक शेखर माने, प्रशांत पाटील, विलास साठे, संदीप साठे, रवी पाटील, नागेश फाटे, साईनाथ अभंगराव, बापूसाहेब जाधव, विलास देशमुख, दीपक देशमुख, ज्योती कुलकर्णी, सुवर्णा शिवपुजे, पोपट अनपट, रणजित बागल, विजयसिंह पाटील, संजय पाटील, रामकाका मस्के, बाबुतात्या सुर्वे, भारत पाटील, आकाश पाटील, रावसाहेब देशमुख, रविंद्र पाटील, विजय भगत, प्रमोदिनी लांडगे, ऋतुजा सुर्वे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.





### निवडणूक एकतर्फी जिंकणार : अभिजित पाटील

उमेदवार अभिजीत पाटील यांनी माढा विधानसभा मतदारसंघाच्या विजयाचे व्हिजन मांडून अभिजीत पाटलाला मत म्हणजे शरद पवारांना मत असे सांगत ही निवडणूक आपण एकतर्फी जिंकू असा विश्वास व्यक्त केला. शरद पवार म्हणजे ऊर्जा तर जयंत पाटील म्हणजे संयम असा उल्लेख त्यांनी केला. तेव्हा उपस्थित हजारो नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली. माढ्याने लोकसभेला नवा खासदार दिला आता नवा आमदार देऊन येथील जनता इतिहास घडविणार असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

सरकारच्या धोरणामुळे राज्याच्या उत्पन्नात घट झाली असून भारताच्या एकूण उत्पन्नात महाराष्ट्राचा १५ टक्के असणारा वाटा १३ टक्क्यांपर्यंत खाली आल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले. याशिवाय २०१४ पर्यंत दरडोई उत्पन्नात कायम गुजरातच्या पुढे आणि प्रथम चार क्रमांकात असणारे आपले राज्य आता गुजरातच्या खाली असून त्याची घसरण अकराव्या क्रमांकावर आली आहे. असे पाटील यांनी सांगितले. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना आबांनी पाच साखर कारखाने चालवण्याचे शिवधनुष्य लीलया पेलले आहे. शरद पवारांच्या विचारांच्या लढाईला साथ देण्यासठी त्यांना भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी लक्ष्मण ढोबळे, संजय पाटील-घाटणेकर, ज्योती कुलकर्णी, संदीप साठे यांची सत्ताधाऱ्यांच्या दडपशाही राजकारणावर बोट ठेवणारी भाषणे झाली.



## प्रत्येक गावात विकासाची गंगा पोहोचविणार : संतोष पवार

### मंद्रुप येथे वंचितची जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ८ नोव्हेंबर-**

दक्षिण तालुका विकासापासून वंचित आहे. आजही अनेक गावात प्राथमिक सोयीसुविधांसाठी जनतेला आंदोलन करावे लागत आहे. सत्ताधाऱ्यांनी जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यानेच त्यांना मतदारांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. दक्षिणमधील प्रत्येक गावात विकासाची गंगा आणण्यासाठी एक संधी देण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोष पवार यांनी केले.

मंद्रुप (ता. दक्षिण सोलापूर) येथे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोष पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर सभेत ते बोलत होते. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष विजयकुमार गायकवाड, शहराध्यक्ष प्रशांत गुनेवार, सुरेश देशमुख, शिवाजी मंजरेकर, उत्तम दिलपाक, सायरा शेख, आतिष बनसोडे, विक्रांत गायकवाड, आसिफ यत्नाळ संतोष राठोड, अजय चव्हाण, अमोल कांबळे, किरण पवार, रोहित पवार, सचिन फडतरे, सुरेश देशमुख, चंद्रशेखर गायगवळी, सूरज खडाखडे, चंद्रकांत मुळे, उस्मान शेख तसेच वंचित बहुजन आघाडी आणि मार्ग फाउंडेशनचे पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. पवार पुढे म्हणाले की, आजपर्यंत दक्षिणचे नेतृत्व केलेल्या नेत्यांनी तालुक्याला कुटुंब मानून तालुक्याचा विकास साधला. विद्यमान नेतृत्वाकडून ज्या वेगाने विकास व्हायला अपेक्षित होते त्या वेगाने झाला नाही. मंद्रुपमधील रद्द झालेल्या एमआयडीसीसाठी विधी मंडळात आवाज उठवणे गरजेच होते , मात्र आमदारांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने तरूणांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. याचा जाब मतदारांनी विचारले पाहिजे. स्व. आनंदराव देवकते यांच्यानंतर सिंचनाचे काम झालेले नाहीत. रखडलेले प्रत्येक प्रकल्प येणाऱ्या काळात मी पूर्ण केल्याशिवाय राहणार नाही असे पवार म्हणाले.

# ईडीपासून मुक्तीसाठी भाजपासोबत गेलो : छगन भुजबळ

## ● राजदीप सरदेसाई यांच्या पुस्तकातील दाव्याने राजकीय वर्तुळात खळबळ, भुजबळांकडून वक्तव्याचे खंडन

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ८ ऑक्टोबर-**

विधानसभा निवडणुकीचा प्रचाराची रणधुमाळी शिंगेला पोहोचली असताना ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांच्या पुस्तकातील दाव्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपबरोबर महायुती सरकारमध्ये सहभागी झाल्याचा आनंद पक्षाच्या सर्वच नेत्यांना झाला होता. कारण अर्थातच त्यामुळे ईडीपासून सुटका झाली होती. माझ्यासाठी तर ईडीपासून सुटका म्हणजे एक प्रकारे पुनर्जन्मच होता, अशी निःसंदिग्धपणे कबुली व राज्याचे अन्न आणि नागरीपुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली होती, असा दावा त्यात करण्यात आला आहे. या पुस्तकावरून विरोधकांनी भाजपा व महायुतीच्या नेत्यावर टिकेची झोड उठवली आहे. त्याचा फटका भाजपा व महायुतीच्या निवडणूकत बसून सेटबॅक बसण्याची शक्यता आहे.

दरम्यान, भुजबळांनी पुस्तकातील आपल्या मुलाखतीचा इन्कार केला असून याबाबत लेखक सरदेसाई यांच्या विरोधात न्यायालयीन कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

राजदीप सरदेसाई यांच्या '२०२४ : द इलेक्शन दॅट सरप्राइज्ड इंडिया' या पुस्तकाने ही खळबळ उडवून दिली आहे. या पुस्तकात 'हमारे साथ ईडी है' या शीर्षकाच्या एक प्रकरण असून यामध्ये महाराष्ट्रातील राजकीय सत्तांतर राष्ट्रवादी काँग्रेसचे फूट त्यामागील कारणाबाबत भुजबळ यांनी रोखठोकपणे मते मांडली आहेत. 'अजित पवार, त्यांची



पत्नी सुनेत्रा, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ, अनिल देशमुख, नवाब मलिक अशा विविध नेत्यांना ईडीच्या चौकशांना सामोरे जावे लागले होते. मला, देशमुख व मलिकांना ईडीने अटक केली होती. अशा वेळी पंतप्रधान मोदी वा भाजपबरोबर हातमिळवणी केल्याशिवाय सुटका नाही ही साऱ्यांचीच भावना झाली होती. हा विषय आम्ही पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्याकडे मांडला. पवारांना हे सारे समजत होते. पण ते भाजपबरोबर जाण्यास अनुकूल नव्हते. तेव्हा अखेर अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या आमदारांनी भाजपबरोबर हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय पक्षाच्या बहुतांशी नेत्यांना मान्य होता. भाजपबरोबर गेल्याने ईडीच्या जाचापासून साऱ्यांची सुटका झाली. मी ओबीसी असल्यामुळे मला जाणीवपूर्वक खूप त्रास देण्यात आला .अगर उच्च जातीचा असतो तर काहीही झाले नसते, अशी भावना भुजबळांनी त्यात व्यक्त केली आहे.

अजित पवार यांचीही ईडीने चौकशी सुरू केली होती. साखर कारखान्याच्या विक्रीवरून त्यांना घेरण्यात आले होते.

### पहिल्यांदा पूर्ण पुस्तक वाचावे : सरदेसाई

माझे पुस्तक हे केवळ महाराष्ट्राचा राजकारणापूर्ती नाही तर देशातील सर्व तत्कावे घडामोडीचा आढावा घेणारा आहे त्यामध्ये केवळ एक प्रकरण महाराष्ट्र बाबतचे आहे त्यामुळे ते प्रत्येकाने पहिल्यांदा पूर्ण वाचावे त्यानंतर आपली मते बनवावीत

**- राजदीप सरदेसाई, ज्येष्ठ पत्रकार व पुस्तकाचे लेखक**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 238-Nilanga | Sambhaji Diliprao Patil Nilangekar | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | District Judge 1st & Session Court At Latur. SLP Case No. 12/2015 Pending. | U/s 120 (B), 420, 467, 468, 471 of Indian penal code & U/s 13(2) R.W.13(1)(D). | Nil | Nil | Nil |
| 2. | | | J.M.F.C. Court, Nilanga. SSC No.119/2022 Pending . | U/s. 188 I.P.C. & 135 of Maharastra police Act With Nilanga Police Station. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 238-Nilanga**
**Place : Mumbai**
**Date : 08/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

## महायुतीच्या दशकपूर्ती व्हीजनचीच मतदारांमध्ये होत आहे चर्चा

**शेतकऱ्यांना कर्जमाफी, लाडकी बहीण, वृद्धांच्या मदतीत वाढ**

**तभा वृत्तसेवा । सुधीर गंगणे**
**औसा, दि. ८ नोव्हेंबर-**

विधानसभेच्या होत असलेल्या निवडणुकीत महाविकास आघाडी, महायुतीसह इतर पक्ष व अपक्षांनी धुमाकुळ घातला आहे. मात्र गावागावातील मतदारांमध्ये व विशेष करुन ग्रामीण भागात महायुतीच्या व्हीजनमधील शेतकऱ्यांना कर्जमाफी, वयोवृद्ध पेन्शनधारकांच्या पेन्शनमध्ये वाढ, अंगणवाडी व आशा सेविकांच्या मानधनात वाढ, वीज बिलात ३० टक्के कपात, २५ लाख रोजगारनिर्मिती अशा अनेक मुद्यांचीच चर्चा होत आहे.

गेल्या विधानसभेची निवडणूक खांद्याला खांदा देत विजय खेचून आणलेले एकमेकांचे चांगले मित्र आ. अभिमन्यू पवार व माजी आमदार दिनकर माने एकमेकांविरुद्ध या होऊ घातलेल्या निवडणुकीत दंड थोपटले आहेत. या औसा विधानसभेच्या होत असलेल्या निवडणुकीच्या रिंगणात १९ उमेदवार असून अजित पवार राष्ट्रवादी काँगेस, ठाकरे शिवसेना व भाजपाच्या महायुतीकडून विद्यमान आ. अभिमन्यू पवार तर शरद पवार राष्ट्रवादी, काँग्रेस व उबाठा शिवसेनाच्या महाविकास आघाडीकडून उबाठा शिवसेनेचे माजी आ. दिनकर माने यांच्यात सरळ लढत होत आहे.

या निवडणुकीच्या प्रचारात गेल्या पंचवार्षिकमध्ये औसा शहरासाठी पिण्याच्या पाण्यासाठी निम्ण तेरणा प्रकल्पातील आरक्षणात वाढ करुन केलेल्या पाणी पुरवठा योजना, औसा, कासारशिरशी व




लामजना येथील नव्याने उभारण्यात आलेली बसस्थानक, किल्लारी व कासारशिरशी येथे सुरु करण्यात आलेली अपर तहसिल कार्यालय, गावागावात केलेली रस्ते व सिमेंट रस्त्यांची कामे, शेतरस्ते यासह बंद पडलेला न नव्या दमाने सुरुकेलेला किल्लारी साखर कारखाना असे मुद्दे महायुतीकडून ओठे, कट्टे, कार्नर बैठका, प्रचार बैठका व प्रचार सभेत महायुतीच्या नेतेमंडळीकडून मांडण्यात येत आहेत.

तर पिकांचे नुकसान होवूनही पीक विमा शेतकऱ्यांना मिळाला नाही, ठिंबक- तुषार सिंचनाचे अनुदान, टेंबी प्रकल्प, सोयाबीनला मिळत असलेला बाजारभाव, औसा येथील उड्डानपुल असे अनेक मुद्दे महाविकास आघाडीच्या नेते मंडळीकडून प्रचारादरम्यान मांडण्यात येत आहेत. महाविकास आघाडीकडून मांडण्यात येणाऱ्या पंचसुत्रीत कर्जमाफी, लाडकी बहिण योजनेअंतर्गत रकमेत वाढ, मुलीआणि महिलांना मोफत प्रवास, रोजगार निर्मिती या महायुतीप्रमाणे जवळपास सारख्याच लाभ देणाऱ्या योजना शिवाय बेरोजगारांना चार हजार व कुटुंब रक्षण असे मुद्दे मांडण्यात येत आहेत. तर महायुतीच्या नेतेमंडळीकडून मांडण्यात येणाऱ्या दशपुर्तीत प्रत्येकास अन्न आणि निवारा, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर, ४५ हजार गावात पाणंद रस्ते, लाडक्या बहिणींच्या रकमेत ७०० रुपयांची वाढ, शेतकऱ्यांना कर्जमाफी व सन्मान निधीत वाढ, व्हिजन महाराष्ट्र २०२९ या दशपुर्ती व्हिजनची गावकऱ्यांच्या बैठकीतून चर्चा होत आहे. याचा महायुतीला फायदा होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 234- Latur Rural | Ramesh Kashiram Karad | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | CJM Court, Latur. RCC No. 142/2002 Pending. | U/s. 147, 148, 149 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 2. | | | 1st JMFC Court, Nilanga. SCC No. 119/2022 Pending. | U/s. 188 of IPC, Sec. 135 Mumbai Police Act. | Nil | Nil | Nil |
| 3. | | | 1st JMFC Court, Renapur. SCC No. 325/2021 Pending. | U/s. 341, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 234 - Latur Rural**
**Place : Mumbai**
**Date : 08/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

## अग्रलेख...

# संविधानाची विटंबना आता तरी थांबवा...

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने 'संविधान खतरे में' म्हणून केंद्रातील मोदी सरकार आणि भाजपाविरुद्ध प्रचार म्हणण्यापेक्षा अपप्रचार केला होता. त्याचाच परिणाम म्हणा वा अन्य काही म्हणा भाजपाला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते. त्यामुळे आपल्या अपप्रचारात इंडिया आघाडी काही प्रमाणात यशस्वी झाली होती. 'खोटं बोलं पण रेटून बोल' ही काँग्रेसची सुरुवातीपासूनचीच भूमिका राहिली आहे. आपल्या राजकीय स्वार्थासाठी काँग्रेसने देशातील बहुसंख्यक हिंदूंवर अन्याय करताना मुस्लिमांचे तुष्टीकरण केले होते. या धोरणाचा काही काळासाठी काँग्रेसला तात्पुरता फायदा झाला असला, तरी दीर्घकाळासाठी त्याचा फटकाही बसला. ज्या संविधान बचावच्या गोष्टी काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी (की विनोदी) पक्षनेते राहुल गांधी आज करीत आहेत, त्यांच्याच आजीने म्हणजे तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आपल्या कार्यकाळात संविधान पायदळी तुडवले होते. आपल्या राजकीय स्वार्थासाठी आणिबाणी लावत देशातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याची होळी केली होती. इंदिरा गांधींची निवडणूक अलाहाबाद उच्च न्यायालयाने रद्द ठरवली होती. त्यामुळे नैतिकता म्हणून इंदिरा गांधींनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देणे अपेक्षित होते. पण सत्तेच्या मोहापायी पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याची तयारी नसल्यामुळे इंदिरा गांधींनी आपल्या हुकूमशाहीचा वरवंटा फिरवत देशावर आणिबाणी लादली. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्यासह विरोधी पक्षांच्या सगळ्या नेत्यांना तुरुंगात डांबले. एवढेच नाही, तर सर्वसामान्य माणसाला जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरही निर्बंध लादले.

जवळपास १९ महिने संपूर्ण देशाचा तुरुंग बनवून टाकला. आपल्या विरोधकांना तुरुंगात डांबूनही इंदिरा गांधींचे समाधान झाले नाही. त्यांच्या छुप्या आशीर्वादाने तुरुंग कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी तसेच पोलिसांनी दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई लढणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांवर अनन्वित अत्याचार केले. वयोवृद्ध जयप्रकाश नारायणही यातून सुटले नाहीत. आज त्याच इंदिरा गांधींचा दिवटा नातू 'संविधान खतरे में' म्हणत देशभर फिरत बोंबा ठोकत आहे. हा प्रकार म्हणजे 'सौ चूंहे खां के बिल्ली हज को चली'सारखा म्हणायला हरकत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर 'चोराच्या उलट्या बोंबा' असेही याला म्हणता येईल.

भाजपा असो की नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार त्यांनी घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नेहमी आदर आणि सन्मान केला आहे. मोदी यांचे सरकार २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासाठी जेवढे काम केले, त्याच्या पाच टक्केही काँग्रेसच्या शासनकाळात झाले नाही. संसद भवनापासून हाकेच्या अंतरावर असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर असो की राजधानी दिल्लीत उभारण्यात आलेली आणखी काही ऐतिहासिक स्वरूपाची स्मारके, ही मोदी सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाहिलेली आदरांजली म्हणायला पाहिजे.

काँग्रेसची भूमिका ही नेहमीच दलितविरोधी राहिली आहे. त्यामुळे काँग्रेसने अप्रत्यक्षपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विरोधच केला. डॉ. आंबेडकर लोकसभेत पोहोचू नये म्हणून कटकारस्थाने केली. भंडाऱ्यातील लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव केला. आज तीच काँग्रेस आणि त्याचे दिवटे नेते राहुल गांधी 'संविधान खतरे'ची जी बांग देतात, ते पाहून विचारी माणसाची तळपायातील आग मस्तकात गेल्याशिवाय राहात नाही. 'दहा माराव्या आणि एक मोजाव्या' असे म्हणतात, त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, असे त्याला वाटल्याशिवाय राहवत नाही. माणसाच्या खोटे बोलण्यालाही मर्यादा असली पाहिजे. जनाची नसली तरी मनाची लाज राहुल गांधींना वाटायला पाहिजे. पण आपल्या कृतीने 'पप्पू' अशी प्रतिमा निर्माण केलेल्या राहुल गांधी यांना आपण जसे बोलतो, वागतो आणि करतो त्याचा अभिमान वाटतो. हा निर्लज्जपणाचा कळस म्हटला पाहिजे. देशातील जनतेने आणिबाणी लावल्याबद्दल काँग्रेसला अजूनपर्यंत माफ केले नाही आणि कधी करणारही नाही. तुम्ही सर्व माणसांना काही काळ, काही माणसांना सर्व काळ फसवू शकता, पण सर्व माणसांना सर्व काळ फसवू शकत नाही. शहामृगासारखे जमिनीत तोंड खुपसून बसलेल्या काँग्रेसच्या नेत्यांना याची जाणीव नाही. '...झाड उगवले तर सावलीच वाटते,' अशी काँग्रेस नेत्यांची भूमिका असते. तसे नसते तर त्यांनी पुन्हा एकदा संविधान सन्मान संमेलनाचे आयोजन केले नसते.

महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचे देशाच्या राजकारणात वेगळे महत्त्व आहे. शताब्दी वर्षात पदार्पण केलेल्या रा. स्व. संघाची स्थापना नागपुरात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षाही नागपुरात दीक्षाभूमीवर घेतली. त्याच शहरात काँग्रेसने दुसऱ्या एका बॅनरखाली संविधान सन्मान मेळाव्याचे आयोजन केले, पण याच मेळाव्यात राहुल गांधी यांनी भारतीय संविधानाची चेष्टा केली. भाषण करताना हातात लाल रंगाची एक चोपडी घेत संविधान म्हणून ते उपस्थितांसमोर मिरवले. प्रत्यक्षात आतून कोऱ्या पानांचे ते पुस्तक होते. मेळाव्याला उपस्थित सर्वांच्या हातातही असे कोरे संविधान होते. आपल्या या कृतीतून राहुल गांधी यांनी भारतीय संविधानाची विटंबना केली, खिल्ली उडवली, असे म्हणायला हरकत नाही. या फसव्या कृतीबद्दल आंबेडकरीच नाही तर देशातील सर्वसामान्य जनताही राहुल गांधी आणि काँग्रेसला कधीच माफ करू शकणार नाही. आपल्या या कृतीने राहुल गांधी यांनी शहरी नक्षलवादाचा एकप्रकारे प्रचार आणि पुरस्कार केला, हा भाजपाने केलेला आरोप नाकारता येण्यासारखा नाही. 'भाजपा की बात में कुछ दम है,' असे म्हणायला हरकत नाही.

महत्त्वाचे म्हणजे या संविधान सन्मान मेळाव्यापासून लोकशाहीतील चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माध्यमातील लोकांना जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले. या मागचे कारणही हेच असावे. या मेळाव्यात असे काही घडणार होते वा घडवले जाणार होते, ते लोकांसमोर येऊ नये, अशी काँग्रेसची अपेक्षा असावी. त्यामुळे पत्रकारांना मेळाव्यात प्रवेश नाकारण्यात आला होता. मात्र, या घटनेचा आतापर्यंत पत्रकारांच्या एकाही संघटनेने निषेध केलेला दिसला नाही.

राहुल गांधी हे काँग्रेसच्या अडचणीच्या जागेचे दुखणे आहे. राहुल गांधींमुळे काँग्रेसचा आजपर्यंत कधी फायदा झाला नाही; झाले ते नेहमी नुकसानच. तरीपण काँग्रेसजनांचे डोळे उघडत नाहीत. राहुल गांधींनी आपल्या नेतृत्वात काँग्रेसला आजपर्यंत एकही निवडणूक जिंकून दिली नाही. अगदी ग्रामपंचायतीची निवडणूक राहुल गांधी जिंकून देऊ शकले नाही. राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेस एक पाऊल पुढे जाते तर दोन पावले मागे येते. म्हणजे राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेसची आगेकूच कधी झाली नाही तर नेहमीच पीछेहाटच होत राहिली आहे.

काँग्रेस आता देशात कधी सत्तेवर येऊ शकत नाही. किमान त्याने विरोधी पक्ष म्हणून तरी आपले स्थान कायम ठेवले पाहिजे. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षाचा दर्जा कायम राहील आणि विरोधी पक्षनेतेपद मिळेल, एवढ्या जागाही काँग्रेसला जिंकता आल्या नाहीत. २०२४ च्या निवडणुकीत सुदैवाने विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळेल तसेच विरोधी पक्षनेतेपदाचा दर्जा मिळेल, एवढ्या जागा काँग्रेसला मिळाल्या आहेत, त्याचे भान काँग्रेसने ठेवले पाहिजे. सकारात्मक बोलायचे तर कोणत्याही दृष्टीने लायक नसलेल्या राहुल गांधींना लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदाचा दर्जा मिळाला आहे; त्या पदाचा मानसन्मान तरी राहुल गांधींनी आपल्या कृतीने आणि उक्तीने राखला पाहिजे. राहुल गांधी आता विरोधी पक्षनेते अशा संवैधानिक पदावर आहे, त्यामुळे आपल्या कृतीने संविधानाचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अनादर होणार नाही, याची काळजी त्यांनी घेतली पाहिजे; नव्हे ती त्यांची संवैधानिक जबाबदारी आहे. देशवासीयांनी एवढी सामान्य अपेक्षा त्यांच्याकडून करायची का?

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# पूर्ण बहुमत!



अमेरिकेत 'तो' पुन्हा आला, आता महाराष्ट्रातही 'तो' पुन्हा येणार का? अशी चर्चा रंगू लागली आहे. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. प्रचार, आरोप-प्रत्यारोप जोरात सुरू झालेले आहेत. आश्वासनांची खैरातही मोठ्या प्रमाणात वाटण्यात येत आहे. उद्धव ठाकरेंनी प्रत्येक जिल्ह्यात शिवरायांचं मंदिर उभारण्याचं आश्वासन दिलं आहे, शरद पवारांनी आपल्या निवृत्तीचं पिल्लू सोडून भावनिक साद घातली आहे, राज ठाकरे पुन्हा जोमाने कामाला लागले आहेत आणि देवेंद्र फडणवीसांनी पूर्ण बहुमताची घोषणा केली आहे. युती आणि आघाडीकडूनही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा उघड करण्यात आलेला नाही. ज्यांना सरासरी जास्त जागा मिळतील त्यांना मुख्यमंत्रिपदाची खुर्ची मिळेल किंवा विभागून हे पद घेण्यात येईल. मात्र, युतीमध्ये फडणवीसांचा आत्मविश्वास पाहता यंदा भाजपाचा मुख्यमंत्री होईल, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. तर, दुसरीकडे राज ठाकरे यांनी आपण सत्तेत बसणार असल्याचे आत्मविश्वासाने जाहीर केले आहे. पहिल्यांदा सात प्रमुख पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरलेत आणि शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस फुटून दोन्ही गट एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत. अशा सर्व घटकांमुळे ही निवडणूक ऐतिहासिक ठरणार आहे.

लोकसभा २०२४ मध्ये निवडणुकीचा एक पॅटर्न तयार झाला होता. यास 'व्होट जिहाद' असं नाव देण्यात आलं होतं. हा व्होट जिहाद विधानसभेतही कायम राहणार आहे. या पॅटर्नमुळे विरोधकांवर टीकेची झोड उठवण्यात आली होती म्हणून यावेळी उघडपणे या समाजाला आवाहन करण्यात आलेलं नाही. तरीसुद्धा भाजपाला सत्तेपासून दूर ठेवायला हा समाज मोठ्या संख्येने मतदान करायला जाताना दिसेल. इथे हे पाहणं औत्सुक्याचं ठरेल की, ओवैसी या समाजाला कसे आकर्षित करतील? ओवैसींना देशात मुस्लिम नेता म्हणून नावारूपाला यायचं आहे. मात्र, त्यांची जिंकण्याची खात्री नसल्यामुळे आणि सरकारमध्ये त्यांना स्थान नसल्यामुळे हा समाज काँग्रेस, ममता बॅनर्जी इत्यादी पक्षांना मोठ्या प्रमाणात मतदान करतो. राजकीयदृष्ट्या अत्यंत जागरूक असलेला हा समाज या निवडणुकीतही आपली ताकद दाखवेल. यावेळी महाराष्ट्रामध्ये आघाडीसमोर मोठे आव्हान असणार आहे. परिवर्तन महाशक्ती रिंगणात उतरल्यामुळे आघाडीला काही जागांवर फटका बसू शकतो. मनोज जरांगे पाटील यांनी माघार घेतल्यामुळे शरद पवारांनी त्यांचे आभार मानले असले, तरी या चालीमुळे मराठा समाजात संभ्रम निर्माण होऊ शकतो. कारण, हा समाज पाटील यांच्याकडे आशेने पाहत होता. निवडणुकीत हार-जीत होत राहते; पण लढणं गरजेचं असतं. त्यांनी जर ही निवडणूक लढवली असती तर त्यांना एक वेगळं राजकीय महत्त्व प्राप्त झालं असतं. असो...

लोकसभेच्या निकालामुळे आघाडीमध्ये चांगलाच आत्मविश्वास निर्माण झाला होता. मात्र, हरयाणाच्या पराभवानंतर काँग्रेसमध्ये संभ्रम निर्माण झाला. त्यामुळे त्यांना उबाठा गटाला डावलता आले नाही आणि त्यांच्या वाटेला फारशा जागा आल्या नाहीत. युतीमध्ये मात्र भाजपाला आपल्या पदरात चांगल्या जागा पाडून घेता आल्या आणि आपण मोठा भाऊ असल्याचे दाखवून दिले. त्यामुळे युतीचं सरकार आलं आणि भाजपाला १०० जागांचा आकडा पार करता आला तर यावेळी 'तो' पुन्हा येईल. भाजपाचा मुख्यमंत्री बसेल. एकनाथ शिंदे आणि अजित पवार असे दोन उपमुख्यमंत्री बसण्याची शक्यता आहे. दुसरीकडे राज ठाकरे आपण सत्तेत बसणार असल्याचे बोलत आहेत. युतीचं सरकार आलं आणि ठाकरेंना किमान १०-१५ आमदार निवडून आणता आले तर ठाकरे युतीत सहभागी होतील आणि त्यांच्या पदरात एक मंत्रिपद पडू शकतं. हे मंत्रिपद अर्थात बाळा नांदगावकर किंवा अमित ठाकरेंच्या वाटेला येईल. मात्र, राज ठाकरेंना किंगमेकर अशी भूमिका निभावता येणार नाही. कारण, जर भाजपाला १०० चा आकडा पार करता आला तर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस मिळून बहुमताचा आकडा गाठतील आणि देवेंद्र फडणवीस म्हणतात त्याप्रमाणे पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन होईल.

लोकसभेमधील व्होट जिहाद आता विरोधकांवरच उलटणार आहे. व्होट जिहादचा नारा देऊन विरोधकांनी घोडचूक केली आहे. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा हिंदू मतदारांना डिवचलं आहे तर यावेळी विधानसभेत हिंदू मतदारांची ताकद निश्चितच पाहायला मिळेल. दुसरी गोष्ट लाडकी बहीण योजनेच्या विरोधात विरोधकांनी रान उठवलं होतं. त्याचाही फटका आघाडीला बसणार आहे. कारण, हा थेट महिलांच्या भावविश्वाला हात घालणारा मुद्दा आहे. मेट्रोची आणखी एक लाईन सुरू झाल्यामुळे मुंबईकर युती सरकारवर खूश आहेत. मेट्रोमुळे भाजपाला मुंबईत चांगला प्रतिसाद मिळेल. कदाचित पुढे मुंबई महापालिकेची निवडणूक भाजपा स्वबळावर लढवू शकते. जरांगे पाटील इफेक्ट खूप कमी ठिकाणी दिसेल. या निवडणुकीवर त्यांचा फारसा प्रभाव असणार नाही. ही निवडणूक शिंदे आणि अजित पवार यांच्यासाठी महत्त्वाची आहे. खरा वारसदार कोण हे सिद्ध करण्याची त्यांना संधी मिळालेली आहे. तर अशा सर्व घटकांमुळे महाराष्ट्रात पाच वर्षे टिकणारे पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन होईल.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# एसटी बसचे भाग्य कधी उजळणार?

आज दळणवळणाची विविध साधने उपलब्ध आहेत. मात्र, प्रवाशांचा राज्य परिवहन महामंडळाच्या लालपरीवर आजही विश्वास कायम आहे. विशेषत: ग्रामीण भागातील प्रवाशांना एसटी बसशिवाय पर्याय नाही. त्यामुळे राज्य परिवहन मंडळाने एसटी बसमध्ये आमूलाग्र परिवर्तन करण्याची नितांत आवश्यकता आहे. आधी कोरोनामुळे एसटीची बस सेवा बंद होती. त्यानंतर कर्मचाऱ्यांच्या संपामुळे एसटी बसची चाके थांबली. त्याचा देखभाल दुरुस्तीवर प्रचंड विपरीत परिणाम झाला. संपानंतर पुन्हा एसटी बस सुरू झाल्यावर अनेक कालबाह्य झालेल्या बसेस रस्त्यातच बंद पडू लागल्या. आजही अनेकदा एसटी बस बंद पडल्यामुळे रस्त्यात उभी असलेली आपल्याला दिसते. अनेक बसेस खिळखिळ्या झाल्या आहेत. त्यामुळे कधी बसचे चाक निघाल्याचे तर कधी खिडकी निखळून पडल्याच्या बातम्या आपल्याला वाचायला मिळतात. अनेक बसेसचे छत पावसाळ्यात गळताना प्रवाशांनी पाहिले. तर, अनेक बसेस नादुरुस्त झाल्याने आगारात उभ्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. दुसरीकडे चालक-वाहकांची उपस्थिती असूनही त्यांना बस नसल्याने ड्यूटीच मिळत नाही. ग्रामीण भागातील प्रवाशांना तासन्तास बसची प्रतीक्षा करीत बस थांब्यावर उभे राहावे लागते. हा प्रकार सध्या पाहायला मिळत आहे. दिवाळी झाली. त्यानंतर सुटी असल्याने अनेक कुटुंबांनी देवदर्शन किंवा पर्यटनाचा बेत आखला होता. माहेरवाशिणींना सासरी परतायचे होते. असे भाविक, पर्यटक व लाडक्या बहिणी प्रवासाला निघाल्या. पण, बस स्थानकावर पोहोचल्यावर बसेसची संख्या कमी असल्याने त्यांना आपल्या नियोजित स्थळी जाण्यासाठी बसची प्रतीक्षा करावी लागली, लागत आहे. मोठ्या प्रतीक्षेनंतर बस लागल्यावर त्यात चढण्यासाठी प्रवाशांची प्रचंड गर्दी होत आहे. अनेक प्रवाशांना बसमध्ये चढणेदेखील शक्य होत नाही. त्यांना दुसऱ्या बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. एवढे सारे होऊनही कोणती बस कुठे, केव्हा नादुरुस्त होऊन बंद पडेल, हे सांगता येत नाही. त्यातही सरकारने प्रवास भाड्यात विविध सवलती सुरू केल्याने विशेषत: महिला व ज्येष्ठ नागरिक प्रवाशांची संख्या वाढली आहे. त्याचा एसटी महामंडळाला फायदा झाला आहे. जी बस रिकामी फेरी करीत होती, त्यात आता उभे राहायला जागा मिळत नाही. रिकाम्या सीटपेक्षा अर्धे भाडे एसटी महामंडळाला मिळत आहे. त्यामुळे एसटी महामंडळाला यावर्षी मोठा नफा झाला आहे. तेव्हा महामंडळाने 'एसटी बसचा प्रवास सुखकर प्रवास' या त्यांच्या ब्रिदवाक्याप्रमाणे नवीन बसेस खरेदी करून प्रवाशांचा प्रवास सुखकर करावा, अशी अपेक्षा आहे.



दिवाळीच्या काळात खाजगी बस वाहतूकदारांनी प्रचंड भाडेवाढ केली होती. शेगाव ते पुणे प्रवासाचे दोन हजार रुपये भाडे आकारले जात आहे. मात्र, एसटी महामंडळाने या मार्गावरील व या कालावधीत कोणतीही भाडेवाढ न करता प्रवाशांच्या हिताचा निर्णय घेतला. त्यामुळेच प्रवाशांचा आजही एस.टी.वर प्रचंड विश्वास आहे. दोन तास वाट बघावी लागली तरी चालेल. पण, प्रवास करेल तर, एस. टी. बसनेच, असा निश्चय करून प्रवास करणारे प्रवासी मोठ्या संख्येत आहेत आणि याचमुळे आज एस. टी. महामंडळ सुरू आहे. ज्या प्रवाशांच्या भरवशावर आपण तग धरून आहोत, अशा प्रवाशांना चांगली सुविधा देणे हे एस. टी. महामंडळाचे आद्य कर्तव्य आहे. तेव्हा, राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना बसची प्रतीक्षा करावी लागू नये म्हणून जास्त संख्येत सुस्थितीतील व शक्यतो नवीन बसेस उपलब्ध कराव्यात. काही दिवसांपूर्वी राज्य परिवहन महामंडळाने इलेक्ट्रिक बसेस खरेदी केल्याच्या बातम्या वर्तमानपत्रात झळकल्या होत्या. तसेच, कोणत्या आगाराला किती बसेस देणार हेदेखील परिवहन महामंडळाने जाहीर केले होते. पण, आजपर्यंत त्या बसेस किमान खामगाव, शेगाव आगारात तरी पोहोचलेल्या दिसत नाहीत. बसस्थानकांचे नूतनीकरण सुरू आहे. मात्र, बसेस जुन्याच असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना चांगली सुविधा उपलब्ध करून द्यावी, एवढीच आमची माफक अपेक्षा आहे.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# दुप्पट लाचेचं आमिष!



महायुती सरकारने लागू केलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना म्हणजे सरळसरळ लाच देण्याचा प्रकार असल्याचे वक्तव्य उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले होते. आता बेरोजगारांना ४ हजार आणि लाडक्या बहिणींना १५०० रुपयांऐवजी ३ हजार रुपये देऊ, अशी घोषणा उद्धव ठाकरेंनीच आपल्या वचननाम्यातून केली आहे. याचा अर्थ आता उद्धव ठाकरेंनी बहिणींना आणि तरुणांना दुप्पट लाचेच्या आमिषाची घोषणा केली आहे, असे म्हणायला हरकत नाही. अर्थात उद्धव ठाकरेंच्या दृष्टिकोनातून तरी तसेच दिसते. उद्धव ठाकरेच कशाला त्यांच्या महाविकास आघाडीने राज्यातील महिलांना दर महिना ३ हजार तर बेरोजगार तरुणांना ४ हजार रुपये देण्यासारख्या घोषणांची खैरात वाटणारी 'पंचसूत्री' जाहीर केली आहे. त्यामुळे ठाकरेंच्या लाच देण्याच्या वक्तव्यातूनही ठाकरे आणि महाविकास आघाडी महिला आणि तरुणांना दुप्पट लाचेचं आमिष देत आहेत, हेच या घोषणांमधून सिद्ध होते.

उद्धव ठाकरे यांनी वेळोवेळी आमचं सरकार आल्यावर युती सरकारने घेतलेले निर्णय आम्ही रद्द करू, असे जाहीर केले आहे. मग युती सरकारने घेतलेले निर्णय जर तुम्ही रद्द करणार असाल तर लाडकी बहीण योजना चालू ठेवणार की रद्द करणार? रद्द केली तर ३ हजार कसे देणार? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. मुळात उद्धव ठाकरे सध्या गोंधळलेल्या मनःस्थितीत आहेत. काहीही करून इज्जत वाचेल एवढे आमदार तरी आले पाहिजे, अशा प्रयत्नात वाट्टेल तशी आश्वासनं देत फिरत आहेत. त्यांना माहिती आहे, जाहीरनाम्यांना वचननामा म्हटल्याने काही फरक पडणार नाही. सत्तेत आलो तरी जाहीरनामा असो किंवा वचननामा पूर्ण काहीच करायचं नाही. हे मागील काळात तीन वर्षे सत्ता उपभोगून दिलेली आश्वासनं पूर्ण केली नाही, यावरून स्पष्ट आहे. उद्धव ठाकरेंनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन 'हेक्टरी ५० हजार द्या, कर्जमाफी नाही कर्जमुक्ती द्या' सारख्या घोषणा केल्या होत्या. आणि स्वतः मुख्यमंत्री बनल्यावर मात्र, ना शेतकऱ्यांना ५० हजार दिले, ना शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले. मुळात यात त्यांची काही चूक नाही. कारण, त्यांनी निर्मला सीतारामन मुंबईत आल्या असताना त्यांच्यासमोर जाहीरपणे सांगितलं होतं की, मला बजेटमधलं काहीही कळत नाही. आता त्यांना बजेटचं काही कळतच नाही त्यामुळे बिचारे निष्पाप बालकाप्रमाणे वाट्टेल तशा घोषणा करून टाकतात. या बिचाऱ्यांना काय म्हणायचं, काँग्रेसच्या सुशीलकुमार शिंदेंनीदेखील निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना वीज बिल माफीची घोषणा केली नव्हती का? निवडणूक झाली, शेतकऱ्यांची भरघोस मतं घेतली, जिंकून सत्तेत आले आणि ती घोषणा टायपिंग मिस्टेकच्या नावाखाली हवेत विरली. घोषणेनंतर तब्बल १३ वर्षे सत्तेत राहूनदेखील आजही शेतकरी हवालदिलच आहे. त्यामुळे उबाठा आणि काँग्रेस दोघेही 'चोर चोर मौसेरे भाई'च आहेत.

अमित शाहांनी दिलेलं वचन मोडल्याची रुदाली सातत्याने करणारे ठाकरे ॲण्ड कंपनीने मागील काळात शेतकऱ्यांना दिलेली वचनं मुख्यमंत्री राहूनही पूर्ण केली नाहीत. वचनं देऊन सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांच्याच पाठीत खंजीर खुपसण्याचं काम केलं. मग शेतकऱ्यांनी ठाकरेंच्या नाही तर कोणाच्या नावाने शिमगा करायचा? यांना कदाचित माहिती असतं आपण सत्तेत येणार नाही, काहीही आश्वासनं दिलीत तरी काय फरक पडतो आणि चुकीने सत्तेत आलो तर नाही पूर्ण केली तरी काय फरक पडतो. राज्यातील जनतेला आणि शेतकऱ्यांना अशा घोषणांची आणि बनवाबनवीची सवयच झाली आहे.

म्हणे लाडक्या बहिणींना १५०० रुपये दिल्याने राज्यावर कर्जाचा डोंगर झाला आहे. राज्य कर्जबाजारी झालं आहे. राज्य दिवाळखोरीत निघालं आहे. राज्याच्या तिजोरीत पैसाच नाही; मग हे पैसा देणार कुठून, निवडणुकीच्या तोंडावर देतील, नंतर देणार नाहीत. असे एक नव्हे अनेक आरोप यांनी सरकारवर केले.

मग आता बेरोजगारांना ४ हजार, शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंतची कर्जमाफी देणार (कर्जमुक्ती विसरलेत उद्धव ठाकरे बरं का), महिलांना १५०० ऐवजी ३ हजार देणार. या सगळ्याला साधारणपणे ३ लाख कोटी रुपये लागतील. आपल्या राज्याचं बजेट आहे साडेसहा लाख कोटींचे. यावेळी कदाचित अंदाजे ७ लाख कोटींपर्यंत जाण्याची शक्यता आहे. पगार, पेन्शन, घेतलेल्या कर्जाचं व्याज यात निम्मे पैसे जातील. निम्मे गेल्यावर निम्मे पैसे विकास कामांसाठी, विविध योजनांसाठी राहतात. यासाठी पैसे कुठून आणणार राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे?

या सरकारनं जाहीर केलेल्या योजना ओढून ताणून ७५ हजार कोटींपर्यंत नेल्या आहेत. म्हणजे अंथरूण पाहून पाय पसरले आहेत, असे म्हणायला हरकत नाही. पण आता मविआ देत असलेली योजनांची आश्वासने पाहता रक्कम ३ लाख कोटींपर्यंत जात आहे. मग युती सरकारला म्हणत होता की, पैसे देऊ शकणार नाही. राज्यावर कर्जाचं डोंगर असताना हे शक्य नाही. राज्य कर्जबाजारी असताना हे शक्य नाही आणि मग तुम्ही दुप्पट तिप्पट चौपट वाढ करत आहात. हे कसं शक्य होणार आहे? याचं उत्तर ज्याला बजेट समजत नाही तो तरी कसा देईल? लेखकानं स्क्रीप्ट लिहून दिली यांनी रटून फरटिदारपणे फेकली...

### शिवाजी महाराजांचं मंदिर प्रत्येक जिल्ह्यात बांधणार

एकीकडे म्हणायचं राज्यावर कर्जाचा डोंगर आहे. राज्य दिवाळखोरीत निघालं आहे. पैसाच नाही तर लाडक्या बहिणीला पैसे कुठून देणार? मग आता प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांचे मंदिर बांधायचे म्हणजे दिवाळखोरीत निघालेल्या राज्याच्या तिजोरीतून मंदिरासाठी पैसे कुठून आणणार? राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात नव्हे तर अपवाद वगळता प्रत्येक गावात महाराजांचा पुतळा मोठ्या दिमाखात उभा आहे. मग मंदिर उभारण्याऐवजी, लाडक्या बहिणीला ३ हजार देण्याऐवजी आम्ही बहिणींना सुरक्षा देऊ, असे आश्वासन किंवा यांच्या भाषेतच म्हणायचे झालेच तर वचन का दिले नाही ठाकरेंनी आपल्या वचनाम्यात? १५०० नको, सुरक्षा द्या म्हणणाऱ्यांनी आपल्या वचननाम्यात महिला सुरक्षेसाठी आम्ही हे करणार, याची हमी किंवा वचनं का दिली नाहीत? शिवाय 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' या सरदार वल्लभभाई पटेलांच्या पुतळ्याच्या निर्मितीवेळी हीच जमात एवढा कोट्यवधींचा खर्च पुतळ्यावर करण्यापेक्षा दवाखाने बनविले असते तर जनतेच्या कामाचे झाले असते, असे सल्ले देताना दिसली होती. मग आता यांना मंदिराऐवजी दवाखाने बनवा, आरोग्य सुविधा द्या, असे सल्ले त्यावेळी सल्ले देणारी जमात आता का देताना दिसली नाही? अचानक कुठे नामशेष झालीय ती जमात? गडचिरोलीच्या ग्रामीण भागात मुलांचे मृतदेह खांद्यावर घेऊन चालत जाणाऱ्या पालकासाठी ठाकरेंचा भोंगा सरकारला लाज वाटली पाहिजे एवढा थयथयाट टीव्हीसमोर करताना दिसला होता. मग ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था, दळणवळण यांसारख्या व्यवस्था सुधारण्यासाठी, बळकट करण्यासाठी आम्ही उपाययोजना करू, असे वचन का दिले नाही ठाकरेंनी? सरकारचे कान उपटणाऱ्या भोंग्यात ठाकरेंचे कान उपटण्याची हिंमत आहे? बरं, '१५०० नको, सुरक्षा द्या' म्हणणाऱ्या त्या महिला कुठाय् आता? महाराजांच्या मंदिरापेक्षा महाराजांचे महिला सुरक्षेचे विचार राबविण्यासाठी प्रयत्न करा म्हणून, ठाकरेंना सल्ला द्यायला पुढे का सरसावल्या नाहीत अद्याप? कोणत्या बिळात लपल्या आहेत?

९२७०३३३८८६

### प्रादेशिक नाट्यकारण

प्रेक्षकांच्या आडोशाने भाषिक प्रदूषण पसरविण्याचा उद्योग कुडाळस्थित बाबा वर्दम संस्थेद्वारे आयोजित नाट्य महोत्सवाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात सध्या चालू आहे. ही घटना स्वातंत्र्योत्तर मराठी रंगभूमीच्या इतिहासात पहिल्यांदाच घडत आहे. विदर्भातील हेमेंद्र नाट्य संस्थेतर्फे 'जंगोम सेना' हे मराठीच्या वैदर्भी बोलीतील नाटक कुडाळ परिसरातील प्रेक्षकांना समजणार नाही, या सबबीखाली स्पर्धेतून हद्दपार करण्यात आले. कोकणी-मराठी हा वाद तसा जुनाच. गोवा राज्यात या वादाला तोंड फुटले. आता तर या वादाचे हातपाय मराठी राजभाषा असलेल्या महाराष्ट्रात पसरविण्याचे कारस्थान रचले जात आहे. सुमारे ५४ बोलीभाषा असलेल्या मराठीच्या केवळ वैदर्भीय बोलीतील नाट्यसंहितेवर स्पर्धा आयोजक समितीने आक्षेप घ्यावा, ही कृती केवळ प्रेक्षकांच्या कला जीवनात कलुषित भाव पसरविण्याच्या उद्देशाने तेवढी गेली नसून त्यामागून प्रादेशिक राजकारण तर खेळले जात नसावे, याची शंका येते. भाषिक कारणास्तव एखादी नाट्यकृती स्पर्धेतून बाद झाल्याचे उदाहरण रंगभूमीच्या इतिहासात सापडत नाही. प्रस्तुत घटनेमुळे उद्भवलेल्या असंतोषावर काय उपाय करायचे ते शासन त्यांच्या स्तरावर करतीलही; मात्र महाराष्ट्रातील रंगभूमीची शीर्षस्थ संस्था अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद या विषयावर मूग गिळून बसली आहे, याचे आश्चर्य वाटते.

**डॉ. विलास देशपांडे**/९९६००३११४८

### खाद्यपदार्थांची नासाडी

सध्या दिवाळीमुळे सगळीकडे उत्साहाचे, उत्सवाचे वातावरण आहे. बाजारात अनेक प्रकारांचे खाद्यपदार्थ, वस्तू, कपडे, फुले, भेटवस्तूंची मोठ्या प्रमाणावर रेलचेल असते. त्या निमित्ताने अनेकांकडे समारंभ आयोजित केलेले असतात. मोठ्या प्रमाणात अन्न शिजविले जाते. मात्र, बऱ्याचदा अन्नाची नासाडी होते. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात नासाडी होणाऱ्या अन्नाचे व्यवस्थापन ही समस्या गंभीर होत आहे. यात अनेक सामाजिक संस्था या समस्येचे निराकरण करीत आहेत. तरीसुद्धा ती कमी पडते. लग्नसमारंभ कॅन्टीन, हॉटेल, सामाजिक आणि कौटुंबिक समारंभात फार मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाते. सर्वेक्षणानुसार भारतात जेवढे अन्न फेकून दिले जाते त्यात किमान दोन हजार लोकांची भूक भागेल. याकरिता अन्न वाचवण्याचा प्रारंभ अर्थातच स्वतःपासून करणे आवश्यक आहे. लहान मुलांनाही तशी सवय लावावी. सर्वांनीच स्वतःच्या व्यवहारात सुधारणा केली तर एकत्रित परिणाम मोठा होतोच; पैसाही वाचेल आणि नासाडीपासून होणारे वाईट परिणामही कमी होतील आणि अन्न उत्पादनाची प्रक्रिया अधिक कार्यक्षम होईल. आजकाल बऱ्याच रेस्टॉरंटमधून 'कृपया पानात अन्न टाकू नये,' असे फलक लावलेले असतात. आपण त्याचे पालन करावे. दुसरे म्हणजे स्वदेशी वस्तू खरेदी करण्यावर आपण भर द्यावा. घरगुती पारंपरिक फराळ तयार करण्यावर अथवा गृहउद्योग संस्थांमधून खरेदी करावा.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

## वाचक पत्रे

### रेल्वे आरक्षणाची मनमानी

दिवाळीच्या सुट्यांमध्ये भोपाळला बहिणीकडे भाऊबीज करण्यासाठी जाण्यास दीड महिन्याआधी २ नोव्हेंबरचं छत्तीसगढचे आरक्षण केले होते. वेटिंग लिस्ट ३२ असल्याने काऊंटरवरून सांगण्यात आले की, वेळ असल्यामुळे कन्फर्म होऊ शकते. चार्ट तयार झाला तेव्हा वेटिंग लिस्ट ७ वर येऊन थांबून गेली. शेवटी जाण्याचा बेत रद्द केला व तिकीट परत केले. त्यात ६० रुपये कटले. येण्याचे ९ तारखेचे कन्फर्म तिकीट मिळाले; जाण्यासाठी आरक्षण कन्फर्म नसल्यामुळे येण्याचेही कॅन्सल करावे लागले. त्यात १२० रुपये कटले. काही जणांनी सांगितले की, एजंटकडून जादा पैसे देऊन तिकीट घेतले असते तर कन्फर्म मिळाले असते. एजंट लोक एका दिवसात कन्फर्म तिकीट देतात म्हणे! आश्चर्य वाटले की, आपण दीड महिन्याआधी केलेले तिकीट कन्फर्म नाही झाले आणि एजंट एका दिवसात कन्फर्म तिकीट देतो. एजंटजवळ अशी कोणती यंत्रणा आहे की तो कन्फर्म तिकीट देतो. तेही एका दिवसात. एक प्रश्न मनात आला की, जे लोक एजंटकडून जादा पैसे देऊन एका दिवसात कन्फर्म तिकीट घेतात ते शहाणे की माझ्यासारखे रेल्वे यंत्रणेवर विश्वास ठेवून महिना-दीड महिना आधी वेटिंग तिकीट घेणारे मूर्ख?

**प्रमोद वाडी**/९५६१७०११७२

### क्रिकेट संघाचा लज्जास्पद पराभव

शेवटच्या कसोटी सामन्यात पाहुण्या न्यूझीलंडने भारतीय संघाला जिंकण्यासाठी दिलेले १४७ धावांचे लक्ष्य भारतीय संघाला गाठता आले नाही. कसोटी मालिका या सामन्यापूर्वीच गमावली होती. जिंकण्यासाठी गवत नसलेली, चेंडू हातभर वळणारी खेळपट्टी निवडूनही विदेशी फिरकीपटूंसमोर उपरोक्त शेर ढेर झाले. भारतीय भूमीवर ३ विरुद्ध ० हा मालिकेतील पराभव लज्जास्पद आहे. मर्यादित षटकांचे अमर्यादित सामने खेळूनही कसोटी सामन्यात फलंदाजी करण्याची कला सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, मोहिंदर अमरनाथ, राहुल द्रवीड, लक्ष्मण यांना अवगत होती. हे फलंदाज दोन-तीन दिवस खेळपट्टीवर चिपकून फलंदाजी करीत असत.

**श्रीराम ढोले**/अमरावती

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### ३५ लाखांसाठी पत्नीचा छळ करणाऱ्या पतीवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर -**

कर्ज फेडण्यासाठी पत्नीने माहेरून ३५ लाख रुपये आणावेत म्हणून तिचा छळ करणाऱ्या पतीविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत स्वाती रमेश



केरूरकर (वय ३४, रा. बनशेट्टी आप्पा नगर, वसंत विहार, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन रमेश शांतप्पा केरूरकर (रा. लेगसी सेलेस्टीया, विनोद नगर, वाकड, पुणे मुळ पत्ता- भवानी पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० फेब्रुवारी २०११ ते २६ सप्टेंबर २०२४ या कालावधीत स्वाती या सासरी बेलापूर (नवी मुंबई) येथील भाड्याच्या घरी, वाकड (पुणे) येथील घरी नांदत होत्या. त्यावेळी पती रमेश याने स्वाती यांना तू मला व माझ्या आईला आवडत नाहीस, तुझ्या आई वडीलांनी लग्नात आमचा मानपान केला नाही, चांगला हुंडा दिला नाही तसेच दोन्ही वेळेस तू मुलींना जन्म दिला याचा राग मनात धरून जोपर्यंत तुला मुलगा होत नाही, तोपर्यंत तु मुलांना जन्म घालायचा असे म्हणून तिचा छळ केला. तसेच बरेच बँकातून घेतलेले ३० ते ३५ लाख रुपयांचे कर्ज फेडण्यासाठी स्वातीने तिच्या मोहरून पैसे आणावेत म्हणून मानसिक व शारीरीक छळ करून तिचा जाचहाट करून छळ केला व स्वाती व तिच्या मुलींना माहेरी आणून सोडले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मुजावर पुढील तपास करीत आहेत.

### आरपीएफ ऑफीसजवळून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर -**

रेल्वे स्टेशनजवळील आरपीएफ ऑफीसजवळून चोरट्याने १५ हजारांची दुचाकी चोरून नेली. याबाबत रमेश यल्लप्पा पागे (वय ४७, रा. मोदी, हुडको, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पागे यांनी २४ ऑक्टोबर रोजी त्यांची दुचाकी क्र. एमएच १३ एपी ५९८३ ही आरपीएफ ऑफीससमोर हॅन्डल लॉक करून पार्क करून



ड्यूटीला गदग एक्स्प्रेसने गेले होते. ते ७ नोव्हेंबर रोजी परत आले. त्यावेळी त्यांना त्यांची दुचाकी दिसून आली नाही. चोरट्याने दुचाकी चोरून नेल्यामुळे सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार सरतापे पुढील तपास करीत आहेत.

# पित्याच्या हत्येबाबतच्या दाव्याचे अचूक टायमिंग

## पूनम महाजनची राजकीय वर्तुळात चर्चा

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. ८ नोव्हेंबर-**

राजकारणात कोणती बाब कधी चर्चेत येईल?, त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम कोणावर केला जाईल? याचा अंदाज कोणालाही लावता येत नाही. राज्यात निवडणुक प्रचाराचा ज्वर वाढत असतानाच भाजपाच्या माजी खासदार खासदार पूनम महाजन हे नाव राजकीय वर्तुळात चर्चेत आले आहे.

दिवंगत पिता व भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रमोद महाजन यांच्या हत्येमागे काहीतरी मोठे षडयंत्र असल्याची शंका व्यक्त करुन त्यांनी खळबळ उडवून दिली. आहे. अठरा वर्षांपूर्वी घडलेल्या या हत्तेमागे आताच संशय करण्यामागील कारण काय, पूनम महाजन यांचा त्यामागे कोणावर रोख आहे ?असे प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाले आहेत.

सुमारे दोन दशकापूर्वी प्रमोद महाजन हे नाव देशाच्या राजकारणात वरच्या स्तरावर होते. दिवंगत पंतप्रधान व भाजपाचे ज्येष्ठ नेते अटल बिहारी वाजपेयी यांचे वारसदार म्हणून भाजपा त्यांची ओळख निर्माण झाली होती. मात्र कौटुंबिक वादातून त्यांचे लहान सख्खे भाऊ प्रवीण महाजन यांनी त्यांची गोळ्या झाडून हत्या केली होती त्यानंतर भाजपाने त्यांची कन्या पुनम महाजन यांना २०१४ व २०१९ मध्ये उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देत संसदेत पाठवले होते मात्र २०२४ च्या निवडणुकीत त्यांचे तिकीट कापून त्यांच्या ऐवजी जेष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांना उमेदवारी दिली होती .मात्र मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष वर्षा गायकवाड यांच्याकडून त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. तेव्हापासून पूनम महाजन या पक्षात सक्रिय नव्हत्या. त्यांच्या मामे बहीण पंकजा मुंडे यांना पक्षाने लोकसभा निवडणुकीत पराभव पत्करावा लागल्यानंतर पुन्हा विधान परिषदेत संधी दिली त्यामुळे पूनम यांनाही विधानसभा निवडणुकीत उमेदवारी दिली जाईल, अशी अपेक्षा होती .मात्र त्यांचा त्यासाठी त्यासाठी विचार करण्यात आला नाही त्यामुळे त्या नाराज असल्याचे समजते अशातच त्यांनी आता आपल्या पित्ताच्या हत्तेमागे काहीतरी मोठे षडयंत्र असावे, असा संशय व्यक्त करून पुन्हा चर्चेला सुरुवात केली आहे.

### प्रमोद महाजन यांचा मृत्यू असा झाला होता?



२००० च्या दशकात राष्ट्रीय राजकारणात मोठे नाव असलेल्या माजी केंद्रीय मंत्री प्रमोद महाजन यांची त्यांचे लहान बंधू प्रवीण महाजन यांनी २२ एप्रिल २००६ मध्ये प्रमोद महाजन यांना वरळी येथील त्यांच्या पूर्णा या निवासस्थानी जाऊन ३२ बोअर च्याया पिस्तूलमधून ३ गोळ्या घातल्या होत्या. १३ दिवस रुग्णालयात झुंज दिल्यानंतर त्यांचे ३ मे २००६ रोजी निधन झाले. त्यांचे बंधू प्रवीण यांच्या विरोधाचा खटला सुरू असताना त्यांनी न्यायालयात काही धक्कादायक बाबी सांगितल्या. त्यामुळे कोर्टाने हा खटला इन कॅमेरा चालविला गेला. या खटल्यामध्ये प्रवीण यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती मात्र तिच्या भोगत असतानाच त्यांचा काही वर्षांपूर्वी मृत्यू झाला आहे त्यांच्या पत्नी सारंगी महाजन यांनीही त्यावेळी आपल्या पतीच्या प्रकृती बिघडविण्यास कौटुंबिक कारण असल्याचे आरोप केले होते .नुकतेच त्यांनी धनंजय मुंडे व पंकजा मुंडे यांनी बीड जिल्ह्यातील त्यांच्या मालकीच्या भूखंड अल्प दरात खरेदी करून फसवणूक केले असल्याचाही आरोप केला आहे त्यामुळे एकूणच पुनम महाजन यांचे आरोप सारंगी महाजन यांनी मुंडे भावंडावर केलेल्या आरोपामुळे पुन्हा हा मुद्दा निवडणुकीच्या काळात चर्चेचा ठरला आहे.

## काडतुसासह गावठी पिस्टल लावून संशयितरित्या फिरणाऱ्या युवकास अटक

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ८ नोव्हेंबर-**

कमरेला जीवंत काडतुसासह गावठी पिस्टल लावून संशयितरित्या फिरणाऱ्या एका युवकास तेल गिरणी चौक परिसरातून दि. ६ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजता बार्शी शहर पोलिसांनी अटक केली आहे

ऋषिकेश रमेश क्षीरसागर (वय २४, रा. रामहरीनगर, भूमजि. धाराशिव) असे अटक केलेल्या संशियाताचे नाव आहे. तेलगिरणी चौक येथे गोपनिय माहितीच्या अधारे तेलगिरणी चौक येथे सदर तरुण थांबला होता पोलिसांना पाहताच कावराबावरा होऊन पळून जाताना त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे एक गावठी बनावटीचे पिस्टल व खिशात दोन राऊंड जीवंत काडतुस आढळून आले. याबाबत त्याच्याकडे कोणता परवाना आहे का चौकशी केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. याबाबत शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.


### जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील सर्व रहिवासीयांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगरपालिकेच्या ग.व.सु. हद्दीतील, विजापूर नाका, गरीबी हटाव, झोपडपट्टी नंबर १ या नावाने ओळखले जाणारे झोपडपट्टी मधील झोपडी नं.३०९ यापैकी पश्चिमेकडील क्षेत्र २२५ चौरस फुट जागा यात एक पन्हाळी पत्रे घातलेली खोली आहे. यांसी चतुःसिमाः पूर्वेस हरिचंद्र गायगवळी यांची झोपडी जागा, पश्चिमेस शिवलिंग मोरे यांची झोपडी जागा, दक्षिणेस- व्हनकोरे यांची झोपडी जागा, उत्तरेस- रस्ता.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील वर वर्णन केलेली झोपडी जागा ही आमचे अशिलांची पती आनंद बाबु गायगवळी यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीची होती. त्यांचे दिनांक ०१/०७/२०२० रोजी राहत्या घरी मयत झालेले आहे. तरी आमचे अशिल श्रीमती शोभा आनंद गायगवळी हे मयत आनंद बाबु गायगवळी यांच्या मृत्यूपश्चात पत्नी या नात्याने एकमेव कायदेशीर वारसदार असल्याने सदर मिळकतीवर त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून आमचे अशिलांच्या नावाची नोंद सो.म.पा. येथील ग.व.सु. कार्यालयात होण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या नोटीसीद्वारे कळविण्यता येते की, सदर झोपडी नं.३०९ यापैकी पश्चिमेकडील क्षेत्र २२५ चौरस फुट या जागेवर आमच्या अशिलांव्यतिरिक्त इतर कोणाचा कायदेशीर वारस हक्क व अधिकार असेल, त्यांनी व तसेच इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार गहाण, दान, वहिवाट, टाच, जप्ती बोजा, लिज, पोटगी, बक्षीसपत्र अगर इतर हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांच्या नावाची नोंद सो.म.पा.च्या ग.व.सु दप्तरी करुन घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारची तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

हे जाहीर नोटीस दिले ता.०७/११/२०२४.

सही/-
ॲड. अशोक एन. चलवादे
एम.ए., एलएल.बी. (स्पे.) ॲडव्होकेट
पत्ता-१८३, विजापूर नाका, गौतम नगर,
सोलापूर. मो. नं. ९८२२४२०२२५
अशिलांतर्फे ॲडव्होकेट


## दिव्यांग, वयोवृध्द अन् अत्यावश्यक सेवेतील ५ हजार ४०२ जणांचे भरले मतदार फॉर्म

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील ८५ वय वर्षापेक्षा अधिकचे मतदार, दिव्यांग मतदार आणि अत्यावश्यक सेवेतील मतदारांचे १२ ड फॉर्म आजपासून भरून घेण्यास प्रारंभ झाला असून, आज पहिल्या दिवशी ११ मतदारसंघातून ५ हजार ४०२ जणांचे फॉर्म भरले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे दिव्यांग मतदार, अत्यावश्यक सेवेतील मतदार आणि अत्यावश्यक सेवेतील मतदारांना त्यांच्या जागेवरच मतदान करता यावे म्हणून ५, ४०२ मतदारांचे १२ ड फॉर्म निवडणूक कार्यालयाने भरून घेतले. त्यामध्ये सीनियर सिटीजन मतदार ३ हजार ७४२, अपंग मतदार ५०६ व अत्यावश्यक सेवेतील मतदार ११५४ असे आहेत.

५ हजार ४०२ मतदारांपैकी निवडणूक विभागाने ५ हजार ३१६ अर्जांना मंजुरी दिली. यामध्ये सीनियर सिटीजन ३ हजार ७३५ दिव्यांग मतदार ४२७ अत्यावश्यक सेवेतील १ हजार १५४ तर दिव्यांग मतदार कार्ड नसणे ८५ वर्षापेक्षा कमी वय असणे अधिकारणामुळे ८६ अर्ज रिजेक्ट केलेले आहेत.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भाग मजरेवाडी येथील मिळकत यासी सर्व्हे नं. ९/५/६ यापैकी प्लॉट नं. अ-१८ याचे क्षेत्र २.९०.०९ आर.चौ.मी. ही खुली प्लॉट जागा यासी चतुः सिमा पूर्वेस अंतर्गत ९ मीटर रस्ता, पश्चिमेस प्लॉट नं. अ-१२, दक्षिणेस प्लॉट नं. अ-१७ व उत्तरेस बालाजी अमाईन्स लिमिटेड यांचे मालकीची सर्व्हे नं. ९/३/४.

येणेप्रमाणे वर नमूद चतुः सिमेतील खुली प्लॉट जागा ही बिसलसिध्देश्वर विश्वनाथ शेगांवकर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून, सदरहू मालकांनी आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरविले आहे. तसेच सदरहु मालकांनी सदरील प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलास दिलेली आहे.

तरी परंतु सदर खुल्या प्लॉट जागेवर अन्य कोणाचा हक्क, वारसा हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी-विक्री, मृत्युपत्र, अग्रहक्क, कर्ज व इतर स्वरुपाचे करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत आपले हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर आणून देऊन खात्री करुन द्यावी. जर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदर खुली प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिलांनी सदर खुल्या प्लॉट जागेचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली ता. ०८/११/२०२४

सही/-
ॲड. लक्ष्मण गुरुबसप्पा म्हेत्रे
प्लॉट नं. १७७, स्वामी विवेकानंद नगर,
हत्तुरे वस्ती, मजरेवाडी, होटगी रोड, सोलापूर
मो.नं. ९८६०३८७३६२
अशिलातर्फे ॲडव्होकेट



### महाराष्ट्र महसूल व वन विभाग
### तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात
संकलन अभिलेख कक्ष

दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@gmail.com

जा.क्र. २०२४/अभिलेख/कावि/९९१/२०२४ दि.०७/११/२०२४

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्रीम. पल्लवी चंद्रकांत परीट** - **अर्जदार**
रा. शिरवळ ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय ग्रामपंचायत,** - **सामनेवाला**
**शिरवळ ता अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील पल्लवी चंद्रकांत परीट रा. शिरवळ ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि.१३/०२/२००१ रोजी मौजे शिरवळ ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतु माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन पल्लवी चंद्रकांत परीट या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.२१/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. ०७/११/२०२४ रोजी आमचे सहीने कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

सही/-
(विनायक मगर)
तहसीलदार, अक्कलकोट



### Classifieds

**नोकरीविषयक**

सुदत्त नर्सिंग होम,
गांधी नगर चौक
सोलापूर ४१३००३
भरती करणे आहे.
ANM आणि GNM
स्टाफ नर्स
भेटण्याची वेळः- दु. ३ ते ४
फोन नेः (०२१७)२३१२६६५

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



### जामश्री रिअलटी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र – 413 001 सीआयएन : L17111PN1907PLC000258
दूरध्वनी : 91 22 22872401 इमेल आयडी: jammill1907@gmail.com वेबसाइट: www.jamshri.in

**30 सप्टेंबर 2024 रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्धवर्षाच्या कालावधी करीता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरण** (रु. लाख EPS सोडून)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही 30.09.2024 (अलेखापरिक्षित) | संपलेली तिमाही 30.06.2024 (अलेखापरिक्षित) | संपलेली तिमाही 30.09.2023 (अलेखापरिक्षित) | संपलेल अर्धवर्ष 30.09.2024 (अलेखापरिक्षित) | संपलेल अर्धवर्ष 30.09.2023 (अलेखापरिक्षित) | संपलेल वर्ष 31.03.2024 (लेखापरिक्षित) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एकूण महसूल उत्पन्न | 212.78 | 260.55 | 191.49 | 473.32 | 251.87 | 672.52 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/(तोटा) | (66.91) | 5.76 | (135.33) | (61.14) | (256.38) | (318.57) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्च्यात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | (34.48) | 5.76 | (135.33) | (28.71) | (256.38) | (318.57) |
| 4 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | (4.86) | (4.81) | (5.50) | (9.68) | (11.54) | (21.57) |
| 5 | कर पश्च्यात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | (4.86) | (4.81) | (5.50) | (9.68) | (11.54) | (21.57) |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (समावेश नफा / (तोटा) (करपश्च्यात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन (करपश्च्यात)) | (39.34) | 0.95 | (140.83) | (38.39) | (267.93) | (350.63) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रु 10/ अखंडित परिचलना करीता मूलभूत व सौम्यिकृत प्रति शेअर कमाई | (0.49) | 0.08 | (1.94) | (0.41) | (3.67) | (4.56) |
| | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रु 10/- खंडित परिचलना करीता मूलभूत व सौम्यिकृत प्रति शेअर कमाई | (0.07) | (0.07) | (0.08) | (0.14) | (0.17) | (0.31) |

टिप : अ) उक्त अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरीक्षक समितीने आढावा घेतला आहे संचालक मंडळाने त्यांच्या नोव्हेंबर 08, 2024 रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्यांना मंजूरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस्) नियम, 2015 सुधारीत असल्याप्रमाणे आणि अधिधिनयमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचाव्याच्या कंपन्या अधिनियम, 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचीत केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस् (आयएनडी) नुसार तयार करण्यात आलेले आहेत.
क) 30 सप्टेंबर 2024 रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षाचा आर्थिक निष्कर्षाच्या बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.
ड) 30 सप्टेंबर 2024 आणि 2023 रोजी संपलेल्या तिमाहीसाठी (जून 2024 सह) आणि 30 सप्टेंबर, 2024 आणि 2023 रोजी संपलेल्या सहामाहीसाठी आणि 31 मार्च 2024 रोजी संपलेल्या वर्षासाठी EPS (मूलभूत आणि सौम्य) स्टॉक विभाजनामुळे पुनर्स्थित केले गेले आहे

तारीखः **08.11.2024**
ठिकाण : सोलापूर

जामश्री रिअलटी लिमिटेड करीता
सही
राजेश दामाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक



### सोलापूर जनता सहकारी बँक लि.
SJSB Multi-State Scheduled Coop.Bank
मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

### जाहीर ताबा नोटीस

नियम ८(१)

**(दि सेक्युरिटायझेशन & रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस & इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये)**

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम १३ (२) अन्वये दि. ०३/०९/२०२४ रोजी कर्जदार व गहाणकार **श्री. मधुकर लक्ष्मीनारायण श्रीमल,** रा. घर नं.४/१/१, प्लॉट नं. १७/१८, वीर सावरकर चौक, शास्त्री नगर, तालुका ऑफिस जवळ, सोलापूर ४१३ ००३.

**जामीनदार - १) श्री. पुरुषोत्तम रंगनाथ बोगा २) सौ. सुनिता लिंबाजी वाघमारे**

यांना मागणी नोटीस पाठवून रक्कम **रु.७,७७,३३६=८४ (अक्षरी रु. सात लाख सत्याहत्तर हजार तीनशे छत्तीस पैसे चौऱ्याऐंशी मात्र) आणि दि.०१/०९/२०२४** पासूनचे देय असलेले पुढील व्याज व इतर खर्च अशी संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून ६० (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते, परंतु नोटीस मिळूनही सदर कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी भरणा केलेली रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, खालील सही करणार यांनी खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचा दिनांक ०६/११/२०२४ रोजी दि सेक्युरिटायझेशन & रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस & इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३ (४) नियम ९ अन्वये **प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे.**

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये, या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही, याची नोंद उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी,

**परिशिष्ट**
**तारण स्थावर मालमत्ता वर्णन**

श्री. मधुकर लक्ष्मीनारायण श्रीमल यांचे नावावरील जिल्हा व उपजिल्हा सोलापूर ता. उत्तर भाग सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील रेल्वे लाईन्स सोलापूर येथील मिळकत यासी सिटी सर्व्हे नं. ८३९८/२ब/१ सब प्लॉट नं.१ याचे क्षेत्र ४५६.७२ चौ.मी. इतके असून, या जागेवर बांधण्यात आलेल्या अपूर्वा अपार्टमेंट या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील ओनरशिप पद्धतीचे तळमजल्यावरील दुकान गाळा नं.३ याचे क्षेत्र २२.७८ चौ. मी. ही मिळकत याचे चतुः सिमा पुढीलप्रमाणे पूर्वेस - ओपन साईड मार्जीन पश्चिमेस प्लॉट नं.१ दक्षिणेस दुकान गाळा नंबर २ उत्तरेस ओपन साईड मार्जिन

**दिनांक : ०६/११/२०२४**
**ठिकाण : सोलापूर**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी स्टेट शेड्युल्ड को ऑप बँक)**



**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 254- Malshiras | Ram Vitthal Satpute | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | C.J.J.D. & J.M.F.C., Solapur. SCC No. 6277/2023 | U/s.336, 188, 269, 270 of IPC, Sec. 51(B), Disaster Management Act, Sec. 3 Prevention of the Epidemic Diseases Act 1897 & Sec. 37 (1) (3), 135 of Maharashtra Police Act. | Nil | Nil | Nil |
| 2. | | | Nil. Pending (Police) | U/s. 143, 188, 269, 270, 336 of IPC, Sec. 51 (B), Disaster Management Act, Sec. 3 Prevention of the Epidemic Diseases Act 1897 & Sec. 37 (1) (3), 135 of Maharashtra Police Act. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 254- Malshiras**
**Place : Mumbai**
**Date : 08/11/2024**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### कोर्टात साक्ष देऊ नये म्हणून तरूणावर धारदार शस्त्राने हल्ला

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर -**

कोर्टात साक्ष देऊ नये म्हणून तरूणावर धारदार शस्त्राने हल्ला करून जखमी करण्यात आले. मोहसिन अलीम शेख (वय ३३, रा. रामवाडी, सध्या रा. नविन विडी घरकुल, कुंभारी) असे जखमीचे नाव असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मोहसिन शेख हा ७ नोव्हेंबर रोजी रात्री रामवाडीकडे पायी चालत जात होता. त्यावेळी मोदी ब्रिजच्या खाली मोहसिन यास अडवून तू आमच्या विरूध्द कोर्टात साक्ष देऊ नको असे म्हणून इम्रान हवालदार याने अज्ञात धारदार वस्तूने मोहसिन यास मारहाण करून जखमी केले. यामध्ये उजव्या पाठीत मार लागल्याने मोहसिन हा गंभीर जखमी झाल्याने त्यास उपचारासाठी रिक्षा चालक समीर शेख याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### पैशावरून महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर -**

पैशाच्या कारणावरून महिलेने मुंग्या मारण्याचे विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सविता प्रकाश वाघे (वय ४०, रा. नरसिंग नगर, मुळेगाव रोड, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव आहे. सविता वाघे यांनी ७ नोव्हेंबर रोजी रात्री राहत्या घरी पैशाच्या व्यवहारातून विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे सविता यांना त्रास होऊ लागल्याने त्यांना मुलगा सचिन वाघे याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### मार्डी फाट्याजवळ अपघातात सहा जखमी

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर -**

तुळजापूर रोडवरील मार्डी फाट्याजवळ झालेल्या दोन अपघातात सहाजण जखमी झाले. शुक्रवारी दुपारी एकच्या सुमारास सुरज विलास माळी (वय २८), बालाजी सदानंद कुलकर्णी (वय ३०, दोघे रा. सुरतगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) हे दोघे तामलवाडी ते मार्डी असे दुचाकीवरून जात होते. मार्डी फाटा येथे दुचाकी वळवत असताना समोरून येणाऱ्या चार चाकी वाहनाने दुचाकीस जोरदार धडक दिली. यामध्ये दोघेही जखमी झाल्याने त्यांना प्रकाश माळी यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. तर दुसऱ्या घटनेत राजेंद्र शिवबसप्पा पाटील (वय ६४), स्नेहल गणेश शिंदे (वय २१), साक्षी गणेश शिंदे (वय ७), संकेत गणेश शिंदे (वय १, सर्व रा. उत्कर्ष नगर, विजापूर रोड, सोलापूर) हे सर्वजण दुचाकीवरून तुळजापूर येथून मार्डीकडे जात होते. मार्डी फाटा येथे दुचाकी वळवत असताना समोरून भरधाव आलेल्या एमएच १४ केएन ५०६६ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाच्या चालकाने वाहन भरधाव चालवून दुचाकीस धडक दिली. यामध्ये वरील चौघेही जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात मंगेश पाटील यांनी दाखल करण्यात आले आहे.

# दक्षिण तालुका 'सुजलाम सुफलाम' करणार: आ. सुभाष देशमुख

## विकासासाठी पुन्हा महायुतीला साथ देण्याचे आवाहन

## दक्षिण तालुक्यातील विविध गावांना भेटी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ नोव्हेंबर-**

दक्षिण तालुक्यातील प्रत्येक गावासाठी कोट्यवधींचा निधी दिला आहे. तालुक्यातील प्रत्येक गाव समृद्ध गाव करायचे आहे. त्यासाठी तुमची साथ हवी आहे. दक्षिण तालुक्याला सुजलाम सुफलाम करण्यासाठी महायुतीला सत्तेत आणावे, असे आवाहन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

आ. देशमुख यांनी निवडणुकीच्या प्रचारार्थ तालुक्यातील यत्नाळ, फताटेवाडी, शिरवळ, बोरूळ, बंकलगी, आहेरवाडी, सिंदखेड, मद्रे, घोडातांडा या गावाला भेट दिली. यावेळी आ. देशमुख यांचे प्रत्येक गावात स्वागत करण्यात आले. युवकांनी फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत करत 'ठरलंय यंदा बापू तिसऱ्यांदा' असा जयघोष केला.



दक्षिण सोलापूरला जोडणारे राष्ट्रीय महामार्गासाठी ११३७ कोटींचा निधी दिला आहे. याशिवाय मुख्यमंत्री ग्रामसडक, मूलभूत सुविधा, ग्रामीण रस्ते, ग्रामपंचायत बांधकाम २२७ कोटी, वडापूर बॅरेजेस ६७ कोटी, होटगी आदिवासी आश्रम शाळा व वसतिगृह बांधकाम ३२ कोटींचा निधी दिला आहे. तालुक्यातील प्रत्येक गावात असा निधी दिला आहे. गावात आणखी कामे करायची आहेत, त्यासाठी आपल्याला पुन्हा एकदा संधी द्यावी. तालुक्याचा कायापालट केल्याशिवाय राहणार नाही, असे देशमुख म्हणाले. यावेळी महिलांना लाडकी बहीण योजना सुरू केल्याबद्दल आ. देशमुख यांच्यासह शासनाचे अभिनंदन केले. विविध योजना सुरू केल्याबद्दल शेतकऱ्यांनीही आ. देशमुख यांना आशीर्वाद देत पाठिशी उभे राहण्याचे वचन दिले.

यावेळी तालुकाध्यक्ष संगप्पा केरके, हणमंत कुलकर्णी, माजी तालुकाध्यक्ष रामप्पा चिवडशेट्टी, नामदेव पवार, अंबिका पाटील, अतुल गायकवाड, सरपंच जगन्नाथ गायकवाड, मल्लिकार्जुन चिवडशेट्टी, सरपंच सुनंदा वाघमोडे, उपसरपंच सुनील हिरापुरे, बाबय्या स्वामी, रमेश तोरूनगी, गणेश तळेकर, राजशेखर हिरापुरे, मल्लिकार्जुन कोनदे, केदार हिरापुरे, पाचलिंग अंबलगी, श्रीशैल कोरे व ग्रामस्थ उपस्थित होते.

### धुबधुबी तलावाचे केले जलपूजन

नुकतेच धुबधुबी तलावामध्ये उजनी धरणाचे पाणी पोहोचले आहे. आ. सुभाष देशमुख यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. ऐन गरजेच्या वेळी पाणी मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी महायुती शासन व आ. देशमुख यांना धन्यवाद दिले.

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यामुळेच उजनीचे मिळाले पाणी

या भागातील शेतकऱ्यांची पाण्याची अडचण लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला. शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनीही आपली मागणी लगेच मान्य करून उजनी धरणातून पाणी सोडण्याचे आदेश दिले. त्यापूर्वी तलावातील गाळ काढून पाण्याची साठवण क्षमता वाढवली. यापुढेही शेतकऱ्यांच्या हाकेला तत्पर धावून येणारे सरकार आपल्याला आणायचे आहे.

**-सुभाष देशमुख, आमदार, दक्षिण सोलापूर**

# दक्षिणचे प्रलंबित प्रश्न सोडविणार : अमर पाटील

### जुळे सोलापुरात पदयात्रेला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ८ नोव्हेंबर-**

दक्षिणचे आमदार सरकारमध्ये सहभागी असतानाही दक्षिणचे प्रश्न प्रलंबित आहेत. वीज, पाणी, रस्ता यासह आरोग्याच्या प्रश्नांना प्राधान्य देणार आहे. म्हणून दक्षिणच्या मतदारांनी निवडून देण्याचे आवाहन सोलापूर दक्षिण मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार अमर पाटील यांनी केले.

जुळे सोलापूरात पदयात्रा करून कॉर्नर सभेत बोलत होते. यावेळी माजी आमदार रतिकांत पाटील, माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, योगीराज पाटील, संतोष पाटील, राजकुमार कोळी, संदीप



मेंडगुदले, संतोष बरूरे यांच्यासह कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी अमर पाटील म्हणाले की, पंचायत समिती व जिल्हा परीषद सदस्य असताना मोठ्या प्रमाणात विकासकामे करून जनतेला न्याय देण्याचे काम केले आहे. मात्र सत्ताधारी पक्षाचे आमदार असतानाही बेरोजगार तरूण, सिंचन प्रश्न, शेतकर्यांच्या समस्या व वीजेच्या समस्या याकडे दुर्लक्ष करण्यात आले. सीना भीमा नदीला महापूर आल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होते, तर ऊन्हाळयात पाण्यासाठी आंदोलन करावे लागते, यावर आमदार मूग गिळून गप्प आहेत. त्यामुळे तालुक्याच्या विकासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या उमेदवाराला धडा शिकवून दक्षिणच्या विकासासाठी देण्याचे आवाहन अमर पाटील यांनी केले.

# दक्षिणमध्ये कोगनुरे परीवर्तन करणार : राज ठाकरे

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ८ नोव्हेंबर-**

एमके फाउंडेशन व सागर सिमेंटच्या माध्यमातून महादेव कोगनूरे यांनी दक्षिण तालुक्यात मोठया प्रमाणात समाजोपयोगी कार्य केला आहे. शिवाय संकटसमयी नागरिकांना मदतीला धावून जाणारे महादेव कोगनुरे दक्षिण सोलापूर मतदारसंघात परीवर्तन करणार अशी ग्वाही मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी केले.

पंढरपूर मंगळवेढा येथील सोलापूर जिल्हयातील मनसे उमेदवाराच्या प्रचारासाठी आल्यानंतर कोगनूरे यांनी कार्यकर्त्यांसह राज ठाकरे यांची भेट घेतली, यावेळी ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. राज ठाकरे म्हणाले की, महादेव



कोगनूरे यांनी भेदभाव न करता जळीतग्रस्तांना मदत, निराधारांना अन्नदान, शालेय विद्यार्थ्यांना सायकल व वह्या वाटप, बेघरांना दिवाळीत फराळ वाटप यासारख्या विधायक कार्यातून सामाजिक बांधिलकी जपली आहे म्हणून मनसेचे सर्व पदाधिकारी कोगनुरे यांच्या विजयासाठी जीवाचे रान करीत आहेत. दक्षिणमध्ये लोकप्रतिनिधींनी विकासकामे करण्यापेक्षा स्वार्थ साधण्याचे काम केला आहे. दक्षिणमध्ये मोठया प्रमाणात मतदारांच्या समस्या असताना आमदारांचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे म्हणून दक्षिणच्या विकासासाठी मतदार कोगनुरे यांना साथ देणार असल्याने कोगनूरे दक्षिणमध्ये परीवर्तन घडवतील असे ठाकरे म्हणाले.

# व्यावसायिकाची अवघ्या २५ दिवसांत १ कोटी ८० लाखांची फसवणूक

### सायबर गुन्हेगारांकडून शेअर मार्केट फंडा

### जादा पैसे कमावण्याच्या आमिषातून गंडा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर -**

शहरातील एका बड्या व्यावसायिकाला सायबर गुन्हेगारांनी शेअर मार्केटमधून काही दिवसांत दुप्पट परतावा मिळेल, या आमिषातून अवघ्या २५ दिवसांत तब्बल एक कोटी ८० लाख रुपयाला गंडा घातला आहे. याप्रकरणी सोलापूर शहर सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



रजनिश कोठाडिया या व्यावसायिकाच्या फिर्यादीवरुन मोबाईल क्र. ९६०१८७३०९१ ची मोबाईल धारक रमा लक्ष्मी, बजाज फिन्सर्व्ह नावाच्या वॉटसअॅप मोबाईल क्र. ९१३६७१२८७६ क्रमांकाचा मोबाईल धारक आणि मोबाईल क्र. ६२३२३०९१७६ चा धारक विजय बजाज यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रजनिश कोठाडिया यांना वरील तिघां आरोपींनी बनावट अॅप व लिंक तयार करून २ सप्टेंबर २०२४ रोजी कोठाडिया यांच्या वॉटरअॅपवर पाठवून दिली. त्याद्वारे शेअर मार्केट व आयपीओ मध्ये जादा नफा मिळवून देतो असे सांगून कोठाडिया यांचा विश्वास संपादन करून तिघांनी वेगवेगळ्या बँक खात्यावर ऑनलाईन रक्कम भरण्यास भाग पाडले. २ सप्टेंबर ते २५ ऑक्टोबर या कालावधीत कोठाडिया यांनी वरील तिघांनी सांगितलेल्या वेगवेगळया बँक खात्यावर १ कोटी ८० लाख रुपये भरले. पैसे भरूनदेखील वाढीव परतावा मिळेनासा झाल्याने कोठाडिया यांनी याबाबत फसवणुक झाल्याची तक्रार दाखल केली. पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा पुढील तपास करत आहेत.

# उत्पादन शुल्कच्या कारवाईत १२ वाहनांसह १५ लाख ६३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर -**

आचार संहिता कालावधीमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या धडक कारवाईमध्ये एक दिवसामध्ये अवैध बनावट देशी विदेशी मद्य वाहतुक करणारे एका दिवसात बारा वाहने व मद्यसाठा असा १५ लाख ६३ हजार ३१३ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

७ नोव्हेंबर २०२४ रोजी सोलापूर शहर व जिल्हयामध्ये हातभट्टी विरोधात केलेल्या कारवाईत १५ गुन्हें नोंद करण्यात आले असून १३ व्यक्तींवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत २७०० लिटर गुळमिश्रीत रसायन, ५९३ लिटर हातभटटी दारु, २६.२५ बल्क लिटर देशी मदय, ८४.९६ बल्क लिटर विदेशी मदय, १५.६ बल्क लिटर बिअर तसेच ७७.७६ बल्क लिअर बनावट विदेशी मदय जप्त करण्यात आले असून बारा वाहने जप्त करण्यात आली. त्यामध्ये एक चारचाकी वाहन, एक अॅटोरिक्षा व दहा मोटार सायकल सह १५ लाख ६३ हजार ३१३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई अधिक्षक भाग्यश्री चव्हाण, उपअधिक्षक एस आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक आर. एम. चवरे, जे. एन पाटील, ओ व्ही घाटगे, डी. एम बामणे ,पंकज कुंभार, भवड, मारुती मोहीते तसेच दुय्यम निरीक्षक, आर एम कोलते,



धनाजी पोवार, समाधान शेळके, सुखदेव सिद, श्रीमती अंजली सरवदे, कुदळे, श्रीमती बहुधाने सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, विजय पवार, गुरुदत्त भंडारी, आनंद जोशी, जवान सर्वश्री आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, शोएब बेगमपुरे, वसंत राठोड, चेतन व्हनंगुटी, इसमाईल गोडीकट, कपील स्वामी, दिनकर शिदे, अनिल पांढरे, विनायक काळे, विकास वडमिले, विजय शेळके, योगीरज तोग्गी, तानाजी जाधव, रशीद शेख व दिपक वाघमारे यांनी केली.

# मशिदीबाहेर नमाज अदा करण्याच्या कारणावरुन बालकास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर -**

मशिदीबाहेर नमाज अदा करण्याच्या कारणावरून बालकास मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना शुक्रवारी दुपारी सव्वा दोनच्या सुमारास घडली.

इब्राहीम सिराज शेख (वय १२, रा. ईश्वर नगर, मजरेवाडी रोड, सोलापूर) असे जखमी बालकाचे नाव असून त्याच्यावर शासकीय




रुग्णालयात उपचार सुरु आहेत. शुक्रवारी दुपारी सव्वा दोनच्या सुमारास ईश्वर नगर साहबा मशिदच्या बाहेर नमाज अदा करण्याच्या कारणावरून इब्राहीम शेख यास गौस कुरेशी व इतर एकाने मिळून लाथाबुक्क्याने मारहाण केली.

त्यामध्ये इब्राहीम याच्या मानेस तसेच सर्वांगास मार लागल्याने त्यास नातेवाईक परविन शेख याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## क्रीडा

# केरळला विजयासाठी ३२२ धावांची तर महाराष्ट्राला ९ बळींची गरज

### कूच बिहार क्रिकेट : महाराष्ट्राच्या नलगेचे शतक, कवडे नाबाद दिडशतकी खेळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरू असलेला कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील महाराष्ट्र व केरळ हा सामना चौथ्या दिवशी कोणता संघ विजय मिळवतो या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे कारण महाराष्ट्राला विजय मिळवण्यासाठी केवळ ९ बळींची आवश्यकता असून केरळला मात्र आणखी ३२२ धावा करायचे आहेत. कालच्या ३ बाद १८१ वरून महाराष्ट्राने आज सकाळी दुसरा डाव पुढे खेळायला सुरुवात केल्यानंतर अर्ध्या तासाने १०६ धावांची भागीदारी झाली तेंव्हा ४था बळी, सुश्रुत सावंत (६३) बाद झाला. त्यानंतर आलेल्या यष्टीरक्षक फलंदाज अनुराग कवडे ने लंच पर्यंत खेळपट्टीवर तग धरत अर्धशतक साजरे करत ५व्या गड्यासाठि १९५ धावांची भागीदारी करत धावसंख्या ३०२ पर्यंत नेली. जेवणानंतर मात्र साहिल नलगे ने शानदार असे शतक (२७४चेंडू १०चौकार) झळकाविले व





त्याच्या पाठोपाठ अनुराग कवडे ने देखील आपला धमाकेदार खेळ दाखवत शतक ( १६५चेंडू, १३चौकार) साजरे केले. दोघांची २१६ धावांची भागीदारी झाली आणि साहिल नलगे १२४ (३२० चेंडू, १२ चौकार) बाद झाला. त्यानंतर पुढील ३७ धावात ओम भाबड (१०), योगेश चव्हाण (२) बाद झाले. चहापानाला खेळ थांबला तेव्हा महाराष्ट्र संघाने ४०० धावा करत मजबूत अशी आघाडी मिळवली. लगेचच अनुराग कवडे ने एक बाजू लावून धरत दीडशतक (२१५ चेंडू, १७चौकार, १ षटकार) झळकाविले. पार्थ देवकर (१४*) सोबत जेंव्हा महाराष्ट्राने ३५० धावांची आघाडी मिळवली तेंव्हा अनुराग नाबाद १५४ वर असताना महाराष्ट्राने ७ बाद ४८४ (१३३ षटके) वर डाव घोषित करून केरळ संघाला शेवटच्या अर्ध्या तासात फलंदाजीसाठी बोलाविले. केरळ कडून मोहम्मद जसील ७८/३, अहमद इम्रान ११४/२, आदित्य बैजू व मोहम्मद इनान प्रत्येकी १ बळी घेतले. विजयासाठी ३५१ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या केरळ संघाला शेवटच्या अर्ध्या तासात ८ षटके टाकताना महाराष्ट्र गोलंदाज नीलय शिंगवी ने एस.अक्षय (१) याला पायचीत करत पहिला झटका दिला. तिसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेंव्हा केरळ संघाने दुसऱ्या डावात १ बाद २९ धावा केल्या आहेत. त्यांचे सलामीवीर अहमद खान (२३), एस.सौरभ (४) नाबाद खेळपट्टीवर असून शेवटच्या दिवशी विजयासाठी गरजेच्या आणखी ३२२ धावा केरळ संघ करतो की महाराष्ट्र संघ आवश्यक असलेले ९ बळी किती वेळात मिळवतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.



# शालेय सेपक टकरा स्पर्धेत पानगल प्रशालेस दोन गटात उपविजेतेपद

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

मंगळवेढा येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर झालेल्या पुणे विभागीय शालेय सेपक टकरा स्पर्धेत एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेजने १४ व १७ वर्षांखालील मुलांच्या गटात उपविजेतेपद संपादिले. तसेच १९ वर्षांखालील मुलांच्या गटात त्यांना तृतीय स्थान मिळाले.

संघास अल्ताफ सिद्दिकी, नावेद मुंशी व इक्बाल दलाल यांचे मार्गदर्शन लाभले. संघाचे प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान, उपमुख्याध्यापिका डॉ. सूररया परविन जहागीरदार आदींनी अभिनंदन केले.

**उपविजयी संघ : १४ वर्षे मुले :** कोतकुंडे बासित, मुंशी माज, पटेल मोहम्मद मुजफ्फर, अत्तार मोहम्मद, युसुफ मोहाळकर, अब्दुल रजाक. **१७ वर्षे मुले :** दलाल कामरान, हन्नुरे अबू जैद, पटेल मुजम्मिल, सिद्दिकी मोहम्मद मुजताबा, शेख आकिब.

**तृतीय संघ : १९ वर्षे मुले :** बागवान अयान, बागवान मोहम्मद सुफियान, पटेल अब्दुल्ला, हवालदार असदुलाह कुरेशी, अमीर खुसरो.

# ओकीनावा कराटे अॅकडमीचे ब्लॅक बेल्टमध्ये यश

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

पुणे येथील टेक्निकल सेमीनार अॅन्ड ब्लॅक बेल्ट ग्रेडेशनच्या जपान कराटे डो निमुकाई सिटोरियो इंडिया या संस्थेच्या अंतर्गत झालेल्या टेक्निकल सेमीनार अॅन्ड ब्लॅक बेल्ट ग्रेडेशनमध्ये येथील ओकिनावा कराटे अॅण्ड योगा एज्युकेशन अॅकडमीच्या विद्यार्थ्यांनी ब्लॅक बेल्ट सेकंड डिग्री प्राप्त केली. यात प्रिसिजन इंग्लिश मेडियम श्री रेड्डी, देवांश रेड्डी, पार्थ गोटीपामूल, प्रांजल माटेटी, वर्षा होनमाने यांचा समावेश आहे. तसेच किओची सिगेकी उमूरा-जपान, सिहान रियुची तनाका जपान व राजू थापा यांच्या मार्गदर्शनाखाली दिलीप शिंदे यांनी फिफ्त दान डिग्री संपादन केली.



# तायक्वांदो, कराटे, फुटबॉल खेळाचे प्रशिक्षण शिबिर

**सोलापूर, दि. ७ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्हा तायक्वॉन्दो स्पोटर्स कौन्सील व जमियत यूथ क्लब सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत तायक्वॉन्दो, कराटे, फुटबॉल अशा विविध खेळांचे ४५ दिवसीय प्रशिक्षण शिबिर सुरू झाले आहे. इच्छुकांनी ८७६६८६१४६३ अथवा ९९२२८९३७४१ या मोबाईलवर संपर्क साधावा, असे सोलापूर जिल्हा तायक्वॉन्दोचे सचिव मंजूर शेख व जिल्हा अध्यक्ष मोहन भुमकर व जमियत यूथ क्लबचे प्रभारी मौलाना मोइनुदीन हुसेनसाब पठाण व जिल्हा सचिव युनूस डोनगांवकर यांनी कळविले आहे.



# माजी मुख्यमंत्र्यांच्या कुटुंबियांमध्ये फूट

**राज्याच्या राजकारणामध्ये वर्चस्व राखून असलेल्या नाईक कुटुंबियांमध्ये विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर फूट पडली आहे. या बंजाराबहुल मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मनोहर नाईक यांच्या दोन्ही मुलांनी एकमेकांच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल केल्याने मतांचे विभाजन होण्याची शक्यता आहे.**

महायुतीच्या वतीने आमदार इंद्रनील नाईक यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला, तर त्यांचे मोठे बंधू ययाती नाईक यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. महाराष्ट्राच्या या प्रतिष्ठित राजकीय कुटुंबातील वादामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पुसद हा बंजाराबहुल मतदारसंघ आहे. येथे बंजारा, आदिवासी, मराठा, कुणबी समाजाची मते अधिक आहेत. ययाती नाईक यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून महाविकास आघाडीची उमेदवारी मागितली होती; मात्र येथे शरद पवार यांनी मराठा कुणबी समाजाचे शरद मैंद यांना पक्षाची उमदेवारी दिली. त्यामुळे नाराज झालेल्या ययाती नाईक यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली. आपल्या फलकांवर ययाती यांनी वडील मनोहरराव नाईक यांचे छायाचित्रही वापरले नाही. केवळ वसंतराव नाईक आणि सुधाकरराव नाईक यांचे छायाचित्र लावल्याने मतदारसंघामध्ये नाईक कुटुंबातील वादाबद्दल चर्चा आहे. शरद पवार हे काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर सुधाकरराव नाईक त्यांच्यासोबत गेले. तेव्हापासून नाईक कुटुंबीय राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे. गेल्यावर्षी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर पुसदचे आमदार इंद्रनील नाईक हे अजित पवार गटात गेले. त्यांचे वडील मनोहरराव नाईक यांनी याबाबत कधी जाहीर भाष्य केले नसले, तरी मुलासोबत तेही अजित पवार गटामध्ये असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे ययाती यांना वडील मनोहरराव नाईक यांची साथ नसावी, अशी चर्चा आहे. महाविकास आघाडी नाईक कुटुंबातील इंद्रनील आणि ययाती या भावांमधील वादाचा फायदा करून घेण्याच्या तयारीत आहे. मनोहरराव नाईक आणि त्यांचा मुलगा आमदार इंद्रनील नाईक यांनी पक्षाची साथ सोडल्यामुळे नाराज झालेल्या शरद पवार यांनी ययाती यांना उमेदवारी न देता एका दगडात दोन पक्षी मारल्याचे बोलले जाते. या बंजाराबहुल मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीची उमेदवारी न दिल्यास ययाती नाईक बंडखोरी करणार हे गृहीत धरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने जाणीवपूर्वक मराठा उमेदवार दिला. शरद पवार यांनी पुसदमध्ये बंजारा मते नाईक कुटुंबियांमध्ये विभाजित झाल्यास मराठा, कुणबी, अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्याकांची मते महाविकास आघाडीकडे वळतील, या सूत्राने खेळी खेळल्याची चर्चा आहे. नाईक कुटुंबातील हा वाद कायम राहिल्यास तो महाविकास आघाडीच्या पथ्यावर पडेल, असे चित्र सध्या आहे.

यवतमाळ लोकसभा मतदारसंघामध्ये पुसद मतदारसंघ येतो. विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमेवर वसलेल्या या मतदारसंघामध्ये पुसद आणि महागाव तालुक्याच्या काही भागांचा समावेश होतो. हा बंजाराबहुल मतदारसंघ असल्याने बंजारा समाज ज्याच्या पाठिशी तोच इथला आमदार बनणार, हे गणित ठरलेले आहे. म्हणूनच नाईक कुटुंबातल्या नेत्याशिवाय इतर कोणीही या मतदारसंघाचे नेतृत्व करू शकलेले नाही. या मतदारसंघात आदिवासी समाजाचा प्रभाव अधिक असून ओबीसी आणि मुस्लिम समाजाचीही मते आहेत. पुसद म्हटले, की सर्वांत आधी वसंतराव नाईक यांचे नाव समोर येते. त्यांनी सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपद भूषवले होते. महाराष्ट्राची स्थापना होण्याच्या आधी वसंतराव नाईक यांनी पुसद विधानसभा निवडणूक लढवली होती. १९५२ मध्ये ते पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, तेव्हा ते पहिले महसूल




मंत्री होते. मारोतराव कन्नमवार यांच्या निधनानंतर वसंतराव नाईकांकडे मुख्यमंत्रिपदाची धुरा आली. १९७५ पर्यंत ते मुख्यमंत्रिपदावर कायम होते. वसंतराव यांचे पुतणे सुधाकरराव नाईक हेसुद्धा राजकारणात सक्रिय झाले होते. पुढे सुधाकरराव नाईक राज्याचे मुख्यमंत्री झाले. पुसद हा एकाच कुटुंबातून राज्याला दोन मुख्यमंत्री देणारा मतदारसंघ ठरला. १९९९ मध्ये शरद पवारांनी काँग्रेसमधून बाहेर पडत राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. तेव्हा सुधाकरराव यांनी शरद पवारांसोबत राष्ट्रवादीमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. सुधाकरराव यांचे भाऊ मनोहर यांनी २००४ पासून २०१४ पर्यंत या मतदारसंघामधून निवडणूक लढवली होती; मात्र २०१४ मध्ये त्यांना पुतणे नीलय यांच्या बंडखोरीचा सामना करावा लागला. पुढे नीलय नाईक यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये नीलय यांनी मनोहर नाईक यांचा लहान मुलगा इंद्रनील नाईक यांच्याविरोधात निवडणूक लढवली. या वेळी पुसदमधल्या मतदारांनी इंद्रनील यांना निवडून दिले होते. मनोहरराव नाईक यांना ययाती आणि इंद्रनील अशी दोन मुले आहेत. इंद्रनील हे सध्या पुसदमधील आमदार आहेत, तर ययाती हे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आहेत. अडीच वर्षांपूर्वी राज्यात झालेल्या सत्तानाट्यानंतर महाविकास आघाडी आणि महायुती अस्तित्त्वात आली. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर पुसदच्या नाईक घराण्यातही फूट पडली. इंद्रनील यांनी अजित पवार गटामध्ये जाताना आपल्याला विश्वासात घेतले नाही, याबद्दल ययाती नाईक यांच्यात नाराजी होती, तर दुसरीकडे २०१९ मध्ये आपल्याला डावलून आमदारकीची संधी इंद्रनील यांना मिळाल्याने ययाती हे संधीच्या शोधात होते. ययाती यांनी शरद पवार गटातच राहणे पसंत केले. लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीच्या संजय देशमुख यांना मदत करताना आपण विधानसभेसाठी इच्छुक असल्याचे ययाती यांनी सांगितले होते.

### लक्षवेधी लढत

यंदाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळावी यासाठी ते आग्रही होते. त्या अनुषंगाने ययाती यांनी मतदारसंघामध्ये मोर्चेबांधणीही केली होती. संभाव्य उमेदवारांच्या यादीतही त्यांचे नाव होते; मात्र ऐनवेळी ययाती यांना उमेदवारी न देता शरद मैद यांना तिकिट देण्यात आले. आमदार इंद्रनील नाईक यांनी पक्षाची साथ सोडल्यामुळे शरद पवार नाराज असल्याची चर्चा होती. यामुळेच त्यांनी ययाती यांना उमेदवारी न देता एका दगडात दोन पक्षी मारल्याचे म्हटले जात आहे.

गेल्या पाच वर्षांत इंद्रनील हे सर्वसामान्य जनतेच्या संपर्कात नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. मनोहर नाईक यांच्यासारखा जनसंपर्क इंद्रनील यांचा तयार करता आला नाही. त्यामुळे पक्षफुटीचाही परिणाम या मतदारसंघात दिसेल, अशी शक्यता राजकीय विश्लेषक वर्तवत आहेत. दुसरीकडे ययाती यांनी गेल्या पाच वर्षांत आपला जनसंपर्क चांगलाच वाढवला आहे. ययाती यांच्याबद्दल या मतदारसंघामध्ये थोडी सहानुभूतीसुद्धा आहे. या मतदारसंघातील सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे बेरोजगारी. यवतमाळ हे कापसासाठी ओळखले जाते; पण इथे कापूस आणि सोयाबीनला भाव मिळत नसल्याने, शेतकरी नाराज आहेत. त्यामुळे पुसद मतदारसंघातील तरुण आणि शेतकरी यांचे प्रश्न समजून त्या अनुषंगाने काम करणाऱ्या नेतृत्त्वाला जनतेची साथ मिळू शकते, असा अंदाज आहे.




# चार मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात रस्सीखेंच

**सातारा हा तीन माजी आणि एका आजी मुख्यमंत्र्यांचा जिल्हा. या जिह्यामध्ये माजी मुख्यमंत्री, एक कॅबिनेट मंत्री आणि दोन माजी मंत्र्यांसह काही मातब्बर उमेदवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.**

सातारा जिल्ह्याने यशवंतराव चव्हाण, बॅ. बाबासाहेब भोसले, पृथ्वीराज चव्हाण आणि एकनाथ शिंदे असे चार मुख्यमंत्री राज्याला दिले. शिंदे हे ठाण्यातून निवडून येत असले, तरी ते वाई तालुक्यातील आहेत. सातारा जिल्ह्यातील आठही मतदारसंघांमधील प्रमुख लढतींकडे सर्वांचे लक्ष आहे. कराड दक्षिण, कराड उत्तर, पाटण, कोरेगाव या मतदारसंघांमध्ये प्रतिष्ठेच्या लढती होत आहेत. उमेदवारी जाहीर होईपर्यंत एकतर्फी वाटणाऱ्या मतदारसंघामध्येही आता बलाढ्य उमेदवारांचे आव्हान निर्माण झाले आहे. त्यात वाई, माण, फलटण या मतदारसंघांचा समावेश आहे. कराड दक्षिणमधून काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण उमेदवार आहेत. ते यापूर्वी याच मतदारसंघातून २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये निवडून आले होते. दोन्ही वेळा भाजपच्या डॉ. अतुल भोसले यांनी त्यांच्याशी निकराची लढत दिली. त्यापूर्वी डॉ. भोसले यांनी कराड उत्तरमधूनही निवडणूक लढवली होती. तिन्ही वेळा त्यांना यशाने हुलकावणी दिली. आता त्यांच्या पदरात हार पडणार की विजयाची माळ पडणार याबाबत उत्सुकता



आहे. चव्हाण यांनी मुख्यमंत्रिपदाच्या तसेच खासदार आणि केंद्रात मंत्री असण्याच्या काळात त्यांनी विविध विकासकामे केली. गेल्या दोन टर्ममध्येही त्यांनी मतदारसंघाशी संपर्क ठेवत विकासकामांसाठी निधी खेचून आणल्याचे सांगितले जाते. त्याशिवाय ही शेवटची निवडणूक असल्याचे भावनिक आवाहन त्यांनी केले आहे. चव्हाण राज्यपातळीवर पक्षासाठी नेतृत्व करत असल्याने त्यांची प्रतिमा मोठी आहे. त्यांच्या या जमेच्या बाजू आहेत. डॉ. भोसले यांनीही गेल्या निवडणुकीतील पराभवानंतर मतदारसंघातील संपर्क वाढविला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपच्या बड्या नेत्यांशी संपर्कात राहिल्याने महायुती सरकारच्या काळात कराड शहर तसेच ग्रामीण भागासाठी मोठ्या प्रमाणात विकासकामे व निधी त्यांनी आणला आहे. कृष्णा साखर कारखाना, कृष्णा हॉस्पिटलसह कृष्णा समूहातील विविध शाखांच्या माध्यमातून ते कार्यरत असतात. या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत; मात्र अपेक्षेएवढा संपर्क दोन्ही बाजूने होत नसल्याच्या तक्रारी आहेत. मतदारसंघात कराड शहराचा समावेश आहे. त्यामुळे कराड नगरपालिकेच्या राजकारणाचा या मतदारसंघातील प्रभाव मोठा आहे. दक्षिणमधील उंडाळकर यांचा गट मोठा आहे. त्यामुळे उदयसिंह पाटील उंडाळकर यांची भूमिका महत्त्वाची असते. सध्या ते काँग्रेसमध्ये असल्याने ते चव्हाण यांच्यासोबत असतील, असे मानण्यात येते. कराड शहर आणि उंडाळकर गट या दोन्ही प्रभावी बाबी या मतदारसंघातील निकालावर परिणाम करणाऱ्या ठरणार आहेत.

### राज्य वार्तापत्र

पाटणमधून पालकमंत्री शंभूराज देसाई शिवसेना शिंदे गटाकडून रिंगणात आहेत. देसाई व पाटणकर यांच्या गटांमधील ही लढत पारंपरिक असते; मात्र या वेळी या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांशिवाय त्यांच्याविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने हर्षद कदम या युवा नेतृत्त्वाला संधी दिली आहे. त्यामुळे येथील लढत आता तिरंगी होणार आहे. वास्तविक राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार पक्षाकडून सत्यजितसिंह पाटणकर यांना उमेदवारी मिळण्याची खात्री येथे व्यक्त होत होती; मात्र तसे न झाल्याने पाटणकरांनी बंडाचा झेंडा फटकवला आहे. देसाई यांच्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांना पाटणमध्ये सभा घेऊन त्यांच्या काळात मतदारसंघात किती निधी आला, याचा पाढा वाचला. देसाई मंत्री असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर विकासकामे व निधी आणून त्यांनी झंझावात निर्माण केला. या बलाढ्य नेत्यापुढे उभे राहणे अवघड वाटत होते. पाटणकर यांनी तशी तयारीही केली होती. या मैदानात तिसरा उमेदवार येण्यामागे कोणाची खेळी तर नाही ना, अशी शंकाही आहे. ठाकरे गटाला उमेदवारी देण्यामागे प्रामुख्याने शिवसेनेच्या मतांची विभागणी होऊन तिसरा उमेदवार निवडून यावा, अशी रणनीती इथे दिसते. अर्थातच अशी राजकीय खेळी कोण करू शकते, याचीही जिल्ह्यात चर्चा आहे, तरीही आता या मतदारसंघात रंगत निर्माण झाली आहे.

माजी सहकार आणि पणनमंत्री बाळासाहेब पाटील कराड उत्तर मतदासंघातून षटकार मारण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून रिंगणात आहेत. भाजपच्या मनोज घोरपडे यांनी या वेळी त्यांच्यापुढे आव्हान निर्माण केले आहे. पाटील आणि चव्हाण यांच्यात पूर्वी फारसे सख्य नव्हते. एक राष्ट्रवादी काँग्रेसचा तर एक काँग्रेसचा नेता. कराड दक्षिणमध्ये जसा पाटील यांना मानणारा मोठा वर्ग आहे, तसाच कराड उत्तरमध्ये चव्हाण यांना मानणारा मोठा गट आहे. दोन्ही नेते आता महाविकास आघाडीतून महायुतीविरोधात लढत असल्याने पाटील आणि चव्हाण यांचे अनुयायी आता परस्परांना मदत करतील. कोरेगावमधून माजी मंत्री शशिकांत शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून लढत आहेत. त्यांना शिवसेनेच्या (शिंदे) आमदार महेश शिंदे यांच्याशी सामना करावा लागत आहे. हे दोन्ही आक्रमक नेते मैदानात असल्यामुळे या मतदारसंघाकडेही सर्वांचे लक्ष आहे. वाईत चौकार मारण्यासाठी सज्ज झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे मकरंद पाटील यांच्यासमोर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष अरुणादेवी पिसाळ यांना रिंगणात उतरविले आहे. वाई मतदारसंघात पाटील– भोसले– पिसाळ असे प्रमुख गट आहेत. त्यात पिसाळ गट उमेदवारी मिळविण्यात यशस्वी झाला. फलटणमध्ये राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून विद्यमान आमदार दीपक चव्हाण लढत देत आहेत, तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून सचिन कांबळे पाटील रिंगणात आहेत. ही जागा भाजपची. महायुतीमध्ये ती अजित पवार यांच्याकडे गली. त्यांनी भाजपचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी ठरवलेल्या उमेदवारालाच संधी दिली. या मतदारसंघातील ज्येष्ठ नेते रामराजे नाईक निंबाळकर सध्या अजित पवार गटाकडे आहेत; परंतु ते प्रचारात नाहीत. अजितदादांनी त्यांना नोटीस देण्याचा इशारा दिला आहे.

आमदार चव्हाण व संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्यासह बाकीचे सैन्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडे दाखल झाले आहे. त्यापूर्वीच अजित पवार यांनी या मतदारसंघातून चव्हाण यांची उमेदवारी जाहीर करून टाकली होती; पण आ. चव्हाण यांनी ऐनवेळी पक्ष बदलल्याने अजित पवार यांनी रणजीतसिंहांचा उमेदवार आयात केला. त्यामुळे रामराजे आता प्रचाराच्या रिंगणात नाहीत. माणमध्ये भाजपचे जयकुमार गोरे बलाढ्य उमेदवार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून येथील उमेदवारी प्रभाकर घार्गे यांना दिली. घार्गे यांच्याप्रमाणेच पक्षाकडून प्रभाकर देशमुख, अनिल देसाई, अभय जगताप तसेच काँग्रेसचे रणजीतसिंह देशमुख इच्छुक होते. यांच्यापैकी एकच उमेदवार रिंगणात आल्याने गोरे यांच्यासमोर आता आव्हान निर्माण झाले आहे. सातारा–जावळी मतदारसंघात विद्यमान आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले पाचव्यांदा विजयी होण्यासाठी भाजपकडून मैदानात उतरले आहेत. तुल्यबळ असणाऱ्या शिवेंद्रसिंहराजे यांना पर्याय कोण असा प्रश्न विरोधकांसमोर होता. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष असणारे अमित कदम यांनी उमेदवारीसाठी शरद पवार यांच्याकडे प्रयत्न केले. अखेर त्यांना महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारी मिळाली. अमित कदम यांनी प्रचार सुरू केला आहे. या स्थितीत शिवेंद्रसिंहराजे यांनी सावध पवित्रा घेत पूर्वीपासून सुरू असलेल्या प्रचाराला अधिक गती दिली आहे.

# शिवसेनेचे बंड शेकापच्या मुळावर

**धैर्यशील पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे वाताहत झालेल्या शेकापसमोर पेण विधानसभा मतदारसंघामध्ये यंदा अस्तित्वाची लढाई असणार आहे. एकाच वेळी महाविकास आघाडीतील दोन पक्षांचे उमेदवार रिंगणात असल्याने शेकापच्या अडचणी वाढणार आहेत. शिवसेना आणि शेकापमधील जागावाटणीचा वाद शेकापच्या अस्तित्वाचा मुद्दा ठरतो आहे.**

पेण विधानसभा मतदारसंघ हा शेकापचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जायचा. २००४, २०१९ चा अपवाद सोडला तर चार दशकांहून अधिक काळ पेण मतदारसंघावर शेकापचे वर्चस्व राहिले आहे. या मतदारसंघातून विधानसभेवर सलग पाच वेळा मोहन पाटील तर दोन वेळा धैर्यशील पाटील निवडून गेले होते. त्यामुळे पुन्हा हा मतदारसंघ ताब्यात घेण्यासाठी शेकाप प्रयत्नशील आहे; परंतु या मतदारसंघामध्ये शिवसेनेच्या ठाकरे गटाने बंड केले आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होण्याऐवजी महाविकास आघाडीतील दोन पक्षांची परस्परांतील लढत विरुद्ध महायुती असे या लढतीचे स्वरुप आहे. हा मतदारसंघ पेण, सुधागड, पाली आणि रोहा तालुक्यातील काही भाग मिळून तयार झाला आहे. मतदारसंघामध्ये तीन लाख सात हजार ९७९ मतदारांचा समावेश आहे. यात एक लाख ५४ हजार ६६१ पुरुष, एक लाख ५३ हजार ३१७ महिला तर एका तृतीयपंथी मतदाराचा समावेश आहे. महायुतीकडून भाजपचे विद्यामान आमदार रवींद्र पाटील पुन्हा एकदा निवडणूक रिंगणात आहेत, तर शेकापकडून व्यवसायाने वास्तुरचनाकार असलेल्या अतुल म्हात्रे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून प्रसाद भोईर हे निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीतील दोन घटक पक्षांचे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पूर्वी शेकाप आणि काँग्रेस असे दोन प्रमुख पक्ष मतदारसंघामध्ये होते; मात्र गेल्या पाच वर्षांमध्ये मतदारसंघातील राजकीय समीकरणे बरीच बदलली आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीआधी काँग्रेसच्या रवींद्र ऊर्फ रविशेठ पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे मतदारसंघातील काँग्रेसचे अस्तित्व जवळपास संपुष्टात आले. भाजपकडून निवडणूक लढवून ते आमदारही झाले. शेकापच्या धैर्यशील पाटील यांचा त्यांनी पराभव केला होता; पण निवडणुकीनंतर धैर्यशील पाटील हेदेखील शेकापची साथ सोडत भाजपमध्ये दाखल झाले. त्यामुळे मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलली. धैर्यशील पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे मतदारसंघामध्ये शेकापचे



अस्तित्व अडचणीत आले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार प्रसाद भोईर यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने शेकापच्या अडचणी वाढणार आहेत.

शेतकरी कामगार पक्ष हा महाविकास आघाडीचा घटकपक्ष आहे, तरीही दोन्ही पक्षांचे उमेदवार असल्याने एकमेकांविरुद्ध लढून ते काय साध्य करणार, असा प्रश्न पेण–सुधागड तालुक्यातील मतदार विचारत आहेत.

### जिल्हा वार्तापत्र

उद्धव ठाकरे आणि शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्यातील चर्चेनंतर अलिबाग, पेण आणि पनवेल मतदारसंघ शेकापला देण्याचा निर्णय ठाकरे यांनी घेतला. एवढेच नाही अर्ज मागे घेणार नाहीत त्यांच्यावर कारवाईचा इशारा ठाकरे यांनी दिला. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी अलिबागमधून जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी अर्ज मागे घेत शेकापच्या चित्रलेखा पाटील यांना वाट करून दिली; मात्र पेणमधून प्रसाद भोईर यांचा अर्ज कायम राहिला आहे. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी अतुल म्हात्रे यांनी पत्रकार परिषद घेऊन ते महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचा दावा केला. त्यांच्या मागे बॅनरदेखील अधिकृत उमेदवार असाच होता. त्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे आणि उपनेते विजय कदम यांनी पत्रकार परिषद घेत प्रसाद भोईर हेच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचा दावा केला; मात्र त्यांच्यामागे महाविकास आघाडीचा बॅनर नव्हता. त्यामुळे आता महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शेकापचे अतुल म्हात्रे की शिवसेना ठाकरे गटाचे प्रसाद भोईर, असा प्रश्न मतदारसंघामध्ये विचारला जात आहे. दोन्ही बाजूंनी प्रचाराला वेग आला आहे. त्यामुळे पेण मतदारसंघामध्ये महाविकास आघाडासाठी कुणाला मतदान करायचे याबाबत स्पष्टता नाही. आता मतदानाला केवळ काही दिवस उरले आहेत. त्यामळे आता यावर केवळ पक्षप्रमुख उद्धव ठाकरेच पडदा टाकून हा राजकीय गोंधळ आणि मतदारांमधील संभ्रम मिटवू शकतात. प्रश्न आहे तो हे केव्हा घडणार?


## महाविकास आघाडीची अशीही खैरात

बीकेसी मैदानातल्या प्रचार सभेमध्ये राहुल गांधी आणि उद्धव ठाकरे महायुतीवर अक्षरशः तुटून पडले. महायुतीपेक्षा आम्ही जनतेसाठी किती आणि काय काय करणार आहोत हे सांगताना शेवटी लाडकी बहीण योजने प्रमाणेच लाडका भाऊ योजनाही राहुल गांधींनी जाहीर केली. महाराष्ट्रातील महिलांसाठी मविआतर्फे त्यांनी महालक्ष्मी योजना जाहीर केली आहे. मविआ निवडून आली तर दर महिन्याला त्यांच्या खात्यात तीन हजार रुपये खटाखट जमा होणार आहेत. युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी युवकांच्या खात्यातही दर महिना चार हजार रुपये जमा होणार आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे. फक्त यासाठी पैसे कुठून आणणार हे मात्र त्यांनी जाहीर केले नाही. मात्र हे ऐकताना लाडक्या बहीण योजनेच्या वेळी महाराष्ट्राच्या रिकाम्या पडलेल्या तिजोऱ्या एकाएकी भरभरून वाहू लागल्याचा आनंद महाराष्ट्रातील जनतेला झाला यात काही शंका नाही.



महाराष्ट्रातील निवडणुकींचे निकाल धक्कादायक असणार आहेत याबद्दल कुणाच्याच मनात शंका नाहीत. महायुतीतले तीन मोठे पक्ष आणि मविआमधले तीन मोठे पक्ष यांची विलक्षण झुंज या निवडणुकीमध्ये होते आहे. कोण जिंकणार, कोण हारणार याबरोबरच नंतरची गणिते कोणता पक्ष कशी जमवणार याचीही उत्सुकता सगळ्यांच्या मनात आहे.


## तोवर एकत्र येणार नाही...



काकांची आणि ताईंची साथ सोडून महायुतीमध्ये गेलेल्या अजित पवारांच्या पुढच्या खेळीविषयीही सर्वांना उत्सुकता आहे. ही राजकीय गणितं जुळवताना अजित पवार परत आले तर त्यांना पुन्हा सोबत घेणार का हा प्रश्न सुप्रियाताई सुळेंना विचारण्यात आला. दादा भाजपाबरोबर असेपर्यंत त्यांना परत घेणे कठीण आहे, असं त्या म्हणाल्या. कारण भाजपा आणि आमच्या विचारधारा खूप वेगळ्या आहेत. पण सत्तेसाठी कोणतीही विचारधारा कुठेही आणि कशीही मिसळून जाऊ शकते हे महाराष्ट्रातील जनतेने चांगलेच अनुभवले आहे.

## हुलकावणीचा खेळ

काय असेल ते असो, पण शरद पवार आणि पंतप्रधानपद याचा नेहमीच पाठशिवणीचा खेळ चालू असतो आणि अगदी थोडक्यात ते सर्वोच्च पद त्यांना हुलकावणी देते. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी राजीव गांधी यांची हत्या झाली. तेव्हा शरद पवारांनी राज्यातल्या ४८ पैकी ३८ जागा जिंकल्या. पी. व्ही. नरसिंहराव, अर्जुनसिंग यांच्या नावाबरोबर त्यावेळी पंतप्रधानपदासाठी शरद पवारांच्या नावाचीही चर्चा होती. पण अचानक सगळी नावे बाजूला टाकत पी. व्ही.



नरसिंहराव पंतप्रधान झाले. त्यांच्या रिक्त स्थानावर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून सुधाकरराव नाईक यांची निवड झाली. पण बदलत्या राजकीय परिस्थितीमध्ये सुधाकरराव नाईकांना राजीनामा द्यावा लागला आणि शरद पवारांना पुन्हा महाराष्ट्रामध्ये परत यावे लागले. पवारांनी चौथ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांना महाराष्ट्राचे चाणक्य, लोकनेते वगैरे पदव्याही मिळाल्या. पण पंतप्रधानपद गेले ते गेलेच.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात आज डिकोडिंग इंडिक लीडरशीप कार्यशाळा

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

सोलापुरातील केगाव येथील एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ कॅम्पस मध्ये शनिवार दि. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५:३० वाजता ''डिकोडिंग इंडिक लीडरशिप''वर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. नवीनता आणि ज्ञानाच्या देवाणघेवाणीसाठी सहयोगी वातावरण निर्माण करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. यावेळी डॉ. बालसुब्रमण्यम यांचे नेतृत्वाच्या विकसित होत असलेल्या लँडस्केपशी संबंधित विषयांवर मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी ते उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन चर्चाही करणार आहेत. याप्रसंगी उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि शिक्षण तज्ञ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या उपक्रमाद्वारे व्यावसायिकांसाठी आणि उत्साही लोकांसाठी एक शिकण्याची संधी मिळणार आहे. नेटवर्किंग, सहयोग आणि ज्ञान-सामायिकरणासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करण्यात आले आहे. मुख्य सत्रात उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठित तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. डॉ. गोपाळकृष्ण जोशी आणि राजेश दमाणी यांचा डीकोडिंग इंडिक लीडरशिपवर परिसंवाद होणार आहे. संवादात्मक प्रश्नोत्तरात उपस्थित मार्गदर्शकांसमवेत थेट संवाद साधता येणार आहे. परिवर्तनशील शिक्षण अनुभवांसाठी या उपक्रमाचा लाभ विद्यार्थी आणि व्यावसायिकांनी घ्यावा, असे आवाहन एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

### बसमधून उतरताना गर्दीचा फायदा घेत ६.६ ग्रॅमचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

बसमधून खाली उतरत असताना एका महिलेच्या पर्समधून ६.६ ग्रम वजनाचे सोन्याचे कानातील फुले झुबे अज्ञात चोरट्याने लंपास केलेत. ही घटना गुरुवार दि ७ रोजी दुपारी सव्वा तीन च्या सुमारास सोलापूर बस स्थानकात घडली आहे. याबाबत कोमल अनिल बडके (वय २७, रा. कर्णिक नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. कोमल बडके या तुळजापूरच्या दिशेने जाणाऱ्या इचलकरंजी ते लातूर बसमधून सोलापूर बस स्थानकात उतरत होत्याा. उतरत असताना त्याा महिलेच्या पर्समधील ६.६ ग्रॅ म वजनाचे कानातील फुले अज्ञात चोरट्याने लंपास केली आहेत. यावरून अज्ञाताविरुध्द पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे.

### सुनिल नगरात दोन लाखांची घरफोडी

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

देवदर्शनासाठी गेलेल्या घरात अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करीत घरातील सोने-चांदी व रोख रक्कम असा एकुण १ लाख ९९ हजाराचा ऐवज लंपास केला आहे. याबाबत चंद्रशेखर पांडुरंग गुंडला (वय ३९, रा. ५५ ए सुनिल नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ४ नोव्हेंबर रोजी सकाळी साडे दहा ते ६ नोव्हेंबर च्या दरम्यान सुनिल नगर, एमआयडीसी सोलापूर या ठिकाणी घडली आहे.गुंडला हे कुटुंबासह बिदर येथे देवदर्शनासाठी गेले होते. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या घराचे मुख्य दरवाज्याचे कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील बेडरूममधील लाकडी कपाटातील असणारे लॉकर मधील पाच ग्रॅम सोन्याची अंगठी, २.५ ग्रॅम वजनाची अंगठी, ४.५ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र, १ ग्रॅमची नथ, १ ग्रॅमची कानातील जोडी, १ ग्रॅम लहान मुलाची अंगठी,५ ग्रॅम सोन्याची रिंग, १० तोळे पायातील पैंजण, ५ तोळे लहान मुलाच्या पायातील पैंजण,२ तोळे वजनाचे चांदीचे जोडवे असा एकुण १ लाख ९९ हजाराचा ऐवज व रोख रक्कम लंपास केला आहे अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव पुढील तपास करीत आहेत.



# कार्तिकीसाठी राज्यातून ९१० एसटी बसेस धावणार पंढरपूरकडे

## सोलापूर एसटी विभागाचे १७५ ज्यादा बसेसचे नियोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ नोव्हेंबर -**

राज्याची दक्षिण काशी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र श्री पंढरपूर कार्तिकीवारी साठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. कार्तिकीवारीला पांडुरंगाच्या दर्शनासाठी राज्यभरातून येणाऱ्या वारकऱ्यांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी, एस टी महामंडळाच्या वतीने राज्यभरातून जादा एसटी बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यातून तब्बल ७३५ तर सोलापूर विभागातून १७५ असे एकूण ९१० जादा एसटी बसेस पंढरपूर मार्गावर धावणार आहेत.

दरम्यान महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ( एसटी ) यांच्यावतीने दरवर्षी कार्तिकीवारीच्या अनुषंगाने वारकऱ्यांच्या सेवेसाठी जादा बसेसचे नियोजन केले जाते. त्याप्रमाणे यंदाच्या वर्षीही नियोजन करण्यात आले आहे. राज्यातील आणि सोलापूर एसटी विभागातून सदरचे जागा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

**कार्तिकी यात्रा ज्यादा बसेसचे नियोजन याप्रमाणे**

| सोलापूर विभाग | एसटी संख्या |
|---|---|
| सोलापूर | १८ |
| पंढरपूर | १६ |
| बार्शी | ३४ |
| अक्कलकोट | २३ |
| करमाळा | १६ |
| अकलूज | २५ |
| सांगोला | १६ |
| कुर्डूवाडी | १० |
| मंगळवेढा | १७ |
| **एकूण** | **१७५** |

| राज्यातील विविध विभाग | एसटी संख्या |
|---|---|
| कोल्हापूर | ११५ |
| पुण | १०० |
| सांगली | १३० |
| सातारा | ११० |
| बीड | ६० |
| जालना | २० |
| लातूर | ३० |
| नांदेड विभाग | ६० |
| धाराशिव | ५५ |
| अहिल्यानगर | ५५ |
| **एकूण** | **७३५** |

**जादा एसटी बसेसचा लाभ घ्यावा**

राज्यातील विविध एसटी विभागाच्या ज्यादा बसेस कार्तिकी यात्रेसाठी पंढरपूरकडे धावणार असून वारकऱ्यांनी आणि भाविकांनी महामंडळाच्या सवलतीच्या दरातील प्रवासाचा लाभ घ्यावा. त्याचप्रमाणे अमृत ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाड्यात १०० टक्के सवलत तर महिलांसाठी ५० टक्के सवलत, जेष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत योजनाचा देखील लाभ घ्यावा.

**- अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक सोलापूर एसटी विभाग.**

# महिलेवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर -**

महिलेवर जबरदस्तीने अत्याचार करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या २३ वर्षीय युवकांवर पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. त्यास शुक्रवारी (८ नोव्हेंबर) न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यास एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.


इस्माईल निसार शेख (वय २३, रा. सोलापूर)असे पोलिस कोठडी मिळालेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पीडिताने फिर्याद दिली असून एमआयडीसी पोलिसांत गुरुवारी मध्यरात्री गुन्हा दाखल झाला आहे.

पीडिता व आरोपी एका ठिकाणी कामास होते, त्यातून त्या दोघांची ओळख झाली होती. ओळखीमुळे शेख हा पीडितेच्या घरी जात होता. एकेदिवशी आरोपीने पीडितेच्या घरी जावून जबरदस्तीने दुष्कर्म केले. संबंध करण्यास पीडिताने विरोध केल्यास तीस शिवीगाळ करून पीडिता व मुलास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर



२३ नोव्हेंबर २०२३ ते १५ ऑक्टोबर २०२४ या दरम्यान वारंवार पिडीतेवर अत्याचार केला. म्हणून याबाबत एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक बनसुडे हे करीत आहेत.

# घरातून 10 हजारांची रोकड लंपास



**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर -**

लक्ष्मीनारायण टॉकीजच्या पाठीमागे असलेल्या स्वामी समर्थ नगरात राहणाऱ्या मेघा राजू चौगुले (वय २२) या महिलेच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटाचे लॉक तोडून १० हजारांची रोकड चोरून नेली. ही घटना ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ या कालावधीत घडली असून याबाबत एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पाटील पुढील तपास करीत आहेत.

# कोठेंनी तगड्या पुढाऱ्यांना घेवून काढली पदयात्रा

**खा. धैर्यशील मोहिते-पाटलांचा सहभाग**

**पत्रा तालीमही कोठेंच्या पाठीशी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

पत्रा तालीममध्ये भांडण लावून फूट पडण्याचे काम मालकांनी आजवर केलं, आता पत्रा तालीमचे सर्व पदाधिकारी एकत्र झाले आहेत, मला भरघोस मतांनी ते निवडून देणार असल्याचा निर्वाळा महेश कोठे यांनी आज माध्यमांशी संवाद साधताना दिला. दरम्यान, कोठेंनी आज अनेक खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि इतर काही पुढाऱ्यांना घेवून पदयात्रा काढत नागरिकांशी थेट संपर्क साधला.

शहर उत्तर विधानसभेंचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार महेश कोठे यांच्या पदयात्रेत आज नागरिकांचा मोठा सहभाग दिसून आला. प्रभाग ७ मध्ये देखील ठिकठिकाणी महेश कोठे यांचे जोरदार स्वागत करण्यात आले, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवाजी महाराजांना अभिवादन करून पदयात्रेस सुरुवात करण्यात आली, यानंतर पदयात्रा पत्रा तालीम, सळई मारुती, पंजाब तालीम, चौपाड, नवजवान गल्ली, माळी गल्ली, काळी मस्जिद, उमानगरी, निराळी वस्ती, अवंती नगर, यश नगर परिसरात काढण्यात आली. या पदयात्रेत ठिकठिकाणी महेश कोठे यांचे जोरदार स्वागत करण्यात आले तर यावेळी हजारोंच्या संख्येने महिला, युवक व नागरिकांचा सहभाग दिसून आला.

आजच्या पदयात्रेत खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह मनोहर सपाटे, नानासाहेब काळे, बिजू प्रधाने, आप्पासाहेब सपाटे, प्रताप सिंह चौहान, सतीश कोल्हारकर, नवनाथ बन्ने, अक्षय वाकसे, निशांत साळवे , गुरुशांत मोकाशी, नलिनीताई चंदेले, प्रतीक्षा चव्हाण, मनीषा माने, रेखाताई सपाटे, प्रमोद मोकाशी, विजय पुकाळे, एकनाथ घाडगे, राजू कुरेशी, सुनिता रोटे, गणेश वडणे आदींसह महाविकास आघाडीतील मित्रपक्षाचे पदाधिकारी, पत्रा तालीम मंडळाचे पदाधिकारी-कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभाग सात मध्ये देखील ठिकठिकाणी महेश कोठे यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

# ३५ वर्ष महापालिकेत असताना कोठे यांनी कोणता विकास केला?

**भाजपाचे ज्ञानेश्वर कारभारी यांचा प्रतिसवाल**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

३५ वर्षे महापालिकेवर सत्ता गाजवणाऱ्या महेश कोठे यांनी कोणता विकास केला? असे म्हणत आ. विजयकुमार देशमुख यांनी शेळगी, मित्रनगर परिसराचा कसा कायापालट केला आहे तो येऊन प्रत्यक्ष पहावा. मग कळेल, तुम्हाला विकास म्हणजे काय असे म्हणत शेळगी, दहिटणे, मित्र नगर परिसर एकतर्फी मतदान करून दाखवू, असे आवाहन भाजपचे ज्ञानेश्वर कारभारी यांनी पदयात्रेदरम्यान केले.

या पदयात्रेला मित्र नगर येथून सुरुवात झाली. शेळगी भागातील प्रत्येक वसाहतीत आ. देशमुख यांचे स्वागत ढोल, ताशा आणि फटाक्यांच्या आतिषबाजीने करण्यात आले. या भागातील माता भगिनींनी आ. देशमुख यांचे औक्षण केले. पदयात्रेदरम्यान माता-भगिनी फेर धरला, आ. देशमुख यांचे स्वागत वाजत गाजत नाचत झाले. मागील सात आठ वर्षात शेळगीमध्ये शेकडो कोटींची कामे झालीत. यामुळे येथील जनता समाधानी आहे. आमदार देशमुख यांच्या माध्यमातून शेळगी भागातील प्रत्येक नगरामध्ये मूलभूत सोयी सुविधांची पूर्तता करण्यात आली आहे, असे सोमनाथ रखबले, वीरेश उंबर्जे यांनी सांगितले. शहर राष्ट्रवादी पक्षाची (अजितदादा) संपूर्ण ताकद आमदार देशमुख यांच्या प्रचारामध्ये आम्ही लावली आहे. विकास कामाच्या जोरावरच विजय साध्य करून दाखवू असे प्रकाश जाधव यांनी सांगितले. समाजातील प्रत्येक वर्गाशी आ. देशमुख यांचा संपर्क आहे. अडीअडचणीला धावून जाणारा माणूस म्हणून आमदार देशमुख हे सर्वश्रुत आहेत. घरकुलपासून बाळे, कोंडीपर्यंत त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. या सर्व भागात केलेल्या कामाच्या जोरावरच आमदार देशमुख हे पाचव्यांदा विक्रमी मतांनी विधानसभेत पाऊल ठेवतील, असे बाजार समितीचे माजी संचालक बसवराज इटकळे यांनी सांगितले.

# धर्मराज काडादी यांच्या विजयाचा संकल्प गावभेट दौऱ्यास मोठा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील प्रमुख अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांच्या गावभेट दौऱ्यास नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. दक्षिण सोलापूर तालुक्यातील घोडा तांडा, मद्रे, सिंदखेड, संजवाड, औराद, राजूर, बिरनाळ आणि होनमूर्गी या गावांमध्ये नागरिकांनी काडादी यांचे जल्लोषात स्वागत केले.

गेल्या दहा वर्षांपासून टक्केवारीच्या राजकारणाला कंटाळलो असून आता परिवर्तनासाठी अपक्ष उमेदवार काडादी यांना विजयी करण्याचा संकल्प व्यक्त केला.

मद्रे येथे झालेल्या बैठकीत माजी सरपंच मुजीब शेख यांनी गेल्या दहा वर्षांत दक्षिण सोलापूरच्या अधोगतीचे पाढे वाचले. दहा वर्षे आमदार आणि कॅबिनेट मंत्री असलेले सुभाष देशमुख यांनी गोड बोलून लोकांची फसवणूक केल्याचा टोला शेख यांनी लगावला.

काडादी यांनी कारखाना चालवताना सचोटी जपल्याने आमच्या अनेक पिढ्यांवर त्यांचे उपकार आहेत. त्यामुळे विकासात कधीही राजकारण न केलेल्या धर्मराज काडादी यांना विजयी करण्याचा एकमुखी संकल्प मद्रे येथील गावकऱ्यांनी केला. यावेळी गेनसिध्द मोटे, भीमाशंकर गावडे, अमीन चांदसाहेब पटेल आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीशैल माळेवाडी तर राघवेंद्र माळेवाडी यांनी आभार मानले.

**काडादी हे सर्वसंमतीचे उमेदवार : हसापुरे**


सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील धर्मराज काडादी यांची उमेदवारी एका व्यक्तीची अथवा एका पक्षाची नाही. काडादी हे सर्व संमतीचे उमेदवार आहेत. ज्येष्ठ नेतेमंडळींच्या आग्रहानुसार काडादी यांनी निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांना निवडून आणण्याची आपल्या प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन सुरेश हसापुरे यांनी केले.







**Bhool Bhulaiyaa 3 (Hindi) (U/A):** 9.45 am, 12.45, 3.30, 6.30 & 9.30 pm
**Singham Again (Hindi) (U/A):** 9.30 am, 3.45, 6.45 & 9.45 pm
**Amaran (Hindi) (U/A):** 12.30 pm
*Schedule subject to change




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## २० नोव्हेंबरला कामगारांना मतदानासाठी पगारी सुट्टी

### सुट्टीमुळे मताचा टक्का वाढणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने मतदान क्षेत्रात मतदार असलेले उद्योगातील कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याबाबत उद्योग विभागातंर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनांना कळविले आहे. यामुळे मताचा टक्का वाढणार आहे.

अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदान केंद्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी सुट्टीऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देण्यात यावी. मात्र त्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक



अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना किमान दोन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहील. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. उद्योगातील मतदार हे मतदानापासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता जिल्हा प्रशासन, निवडणूक विभागाचे अधिकारी घेत असल्याने यंदा मताचा टक्का वाढण्याची शक्यता आहे.

दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860

## ▸▸ संक्षिप्त वृत्त...

### रंगसंवादतर्फे आज 'नटरंग'चे आयोजन

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

रंगभूमी दिनानिमित्त शनिवार ९ नोव्हेंबर रोजी रंगसंवाद प्रतिष्ठान जुळे सोलापूर या संस्थेच्या वतीने नटरंग हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहे. चारचौघी, फुलराणी, झोपी गेलेला जागा झाला, कामवाल्या बाया, नटसम्राट, घाशीराम कोतवाल, माझा खेळ मांडू दे या नाटकातील प्रवेश, एकपात्री, भारूड, नक्कला, याशिवाय नाट्यपदे, गायन रंगसंवाद चे प्रौढ कलाकार सादर करणार आहेत. याच वेळी काही रंगकार्मिंचा सत्कारही केला जाणार आहे. सदर कार्यक्रम पद्माकर देव हॉल मोदी येथे दुपारी ठीक ४.३०वाजता असून कार्यक्रमाचा कालावधी एक तास दहा मिनिटे आहे. सर्व रसिक प्रेक्षक व कलावंतांसाठी प्रवेश खुला असून प्रेक्षकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन रंगसंवादच्या डॉ. मीरा शेंडगे, अमोल धाबळे, गुरु वठारे, मृणाल देशपांडे यांनी केले आहे.

### मृणाल कुलकर्णींच्या उपस्थितीत 'सागा ऑफ एन्सियंट फेदर्स'

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

फिनिक्स मार्केटसिटी पुणेने दिवाळी साजरी करण्यासाठी एक खास 'सागा ऑफ एन्सियंट फेदर्स नावाचा सुंदर उत्सव सुरू केला आहे.या उत्सवात परंपरेची,साहित्याची आणि कलेची सुंदर सादरीकरणं आहेत.अंशुमान भारद्वाज म्हणाले,आम्हाला आमच्या ग्राहकांना हे अद्वितीय अनुभव देण्याचा आनंद आहे.या कार्यक्रमस अभिनेत्री मृणाल कुलकर्णी,इशिता राज आणि सृष्टी मुनका या लोकप्रिय चेहऱ्यांनी हजेरी लावली.

### शिंपी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा १७ नोव्हेंबरला पुण्यात

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

समस्त शिंपी समाज महाराष्ट्र व राज्यातील ज्ञाती संस्था तसेच प्रभात जनप्रतिष्ठान पुणे यांच्या वतीने शिंपी समाजातील सर्व पोटजातीचा वधू-वर पालक परिचय मेळावा १७ नोव्हेंबर रोजी आयोजित केला आहे. इच्छुकांनी समस्त शिंपी समाज महाराष्ट्राचे अध्यक्ष रामचंद्र होमकर (मो.९५२७७४६२५८) अथवा जयेश महाजन(९७६६७०९३०९) यांच्याशी संपर्क साधावा.

### नितीन कांबळे हिंदुस्थानी अवाम मोर्चा लेबर सेलेचे राष्ट्रीय सचिव

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

येथील शिवशक्ती भीमशक्ती ग्राहक संरक्षण संघचे महाराष्ट्रप्रदेश अध्यक्ष व कामगार नेते नितीन कांबळे यांची हिंदुस्थानी अवाम मोर्चा सेक्युलरचे राष्ट्रीय सचिवपदी निवड झाली. निवडीचे पत्र राष्ट्रीय प्रधान महासचिव राजेशकुमार पांडेय व कार्यकारी अध्यक्ष लेबर सेल राजजी सिंह यांनी दिले.



दलित, अदिवासी, ओबीसी, अल्पसंख्याक, गरीब कष्टकरी कामगार समाजातील शेवटच्या घटकांसाठी असणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना नागरिकांपर्यंत पोहचवून पक्षीय संघटन मजबूत करण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.

### माजी सैनिकाच्या मेळाव्याचे १३ नोंव्हेबर रोजी आयोजन

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नेव्ही मधील सेवा निवृत्त माजी सैनिकांचा मेळावा आयोजित केला असून, जिल्हयातील नेव्ही मध्ये सेवाकरुन निवृत्त झालेल्या माजी सैनिक/विधवांना तसेच त्यांच्या अवलंबितास कळविण्यात येते की, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर येथे दिनांक १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता आय एन एस शिवाजी लोणावळा ए. एस. दोंडले हे आपल्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सोलापूर येथे येणार आहेत. जिल्हयातील नेव्हीमधील निवृत्त झालेल्या माजी सैनिक/विधवा तसेच त्यांच्या अवलंबितांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.





# उदासीन लोकप्रतिनिधींमुळे सोलापूरचा विकास १० वर्षांपासून खुंटला

### आ. रोहित पवार यांचा स्थानिक नेत्यांवर आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

सोलापूर शहर-जिल्ह्यात भाजपाचे ६ आमदार २ खासदार होते...सत्ताही त्यांच्याच हाती होती...काही जणांनी राज्य मंत्रीमंडळात मंत्रीपदे भूषविली आहेत मात्र त्यांची विकासकामे करण्याची उदासिनता वाढल्याने शहर-जिल्ह्याचा विकास १० वर्षांपासून खंटला असल्याचा आरोप आ. रोहित पवार यांनी केला. दरम्यान, यावेळी राष्ट्रवादीच्या हाती सत्ता द्या आणि मग पहा विकास कसा असतो ते. असे ओपन चॅलेंजही पवार यांनी केले. दरम्यान, भाजपाच्या सर्व्हेमध्येसुध्दा महेश कोठे आमदार होणार असल्याचे संकेत मिळत असून, मालकांचे २० वर्षे संपल्याचेही त्यांनी जाहीरपणे सांगितले.

सोलापूर शहर उत्तर विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार महेश कोठे यांच्या प्रचारार्थ पत्रा तालीम परिसरात आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत गुरुवारी जाहीर सभा पार पडली. यावेळी आमदार रोहित पवार बोलत होते. यावेळी शहर उत्तर विधानसभेचे उमेदवार महेश कोठे, सुधीर खरटमल, महेश गादेकर, नाना काळे, भारत जाधव, मनोहर सपाटे, जनार्दन कारमपुरी, चेतन नरोटे, विनोद भोसले, प्रथमेश कोठे, प्रशांत बाबर, अक्षय वाकसे, शेरू कुरेशी, सरफराज शेख, सुनीता रोटे, रेखा सपाटे, प्रतीक्षा चव्हाण, लताताई फुटाणे, नलिनी चंदेले आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते. आ. पवार यांनी भाजपच्या उत्तरमधील उमेदवारांचे नाव न घेता विजय देशमुख यांना चांगलेच फैलावर घेतले, भाजपचे आमदार स्वतःहून लोकांना सांगतात मला मालक म्हणा, ज्या मालकांना स्वतःच्या मुलाची चिंता आहे त्यांना आता घरी बसवलं पाहिजे आणि आता खऱ्या अर्थाने महेश कोठे यांच्यासारख्या सेवकाला आमदार बनवण्याची वेळ आली आहे. शहरातील युवकांचा लोंढा पुणे, मुंबई, हैद्राबाद, नवी मुंबईकडे जाताना या लोकप्रतिनिधींना दिसत नाही का? या सत्ताधाऱ्यांनी स्मार्ट सिटी बनवितो असे खोटे आश्वासन दिले. कोट्यवधी रूपये खर्चूनही शहर विकास त्यांना करता आला नाही. आयटी पार्क करणाऱ्यांनाही आवश्यक ती कागदपत्रे दिली नसल्याने हे कामही पेंडिंग पडले आहे. नवीन एमआयडीसी नाही, नवीन उद्योजक शहरात येत नाहीत आणि येथील २ उड्डाणपुलांचे काम तर गेली अनेक वर्षे रखडले आहे. या ठिकाणी लोकांना हाताला काम नसल्याची त्यांची खंत आहे. यामुळे भविष्यात महेश कोठे आमदार झालेतर या सर्व समस्या दूर करतील, असाही आशावाद पवार यांनी शेवटी व्यक्त केला.

#### आता तुतारीचीच हवा : कोठे

राष्ट्रवादी नेते शरद पवारांनी गेल्या अडीच वर्षांपूर्वी मला आमदारकीचे स्वप्न दाखविले होते. त्यांच्या शब्दाखातर मी अडीच वर्षे जनहिताची कामे करीत राहिलो आणि त्यांनी कसलीही अपेक्षा न ठेवता या निवडणुकीत दिलेला शब्द पाळत मला आमदारकीचे तिकीट दिले. या मतदारसंघातील जनताही आता माझ्या पाठीशी उभी असल्याने सध्या तुतारीची हवा आहे. यामुळे मी कसल्याची परिस्थितीत आमदार होवून दाखविणार आहे आणि जनहिताची कामेही करून दाखविणार आहे.

**-महेश कोठे, महाविकास आघाडी उमेदवार**



## सासऱ्यांना निवडून आणण्यासाठी सुनबाई डॉ. उर्वशीताई देशमुख उतरल्या प्रचारात!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०८ नोव्हेंबर-**

सोलापूर शहर उत्तरचे महायुतीचे अधिकृत उमेदवार विजय देशमुख यांच्या प्रचारार्थ त्यांच्या सुनबाई डॉ. उर्वशीताई किरण देशमुख यांनी प्रभाग १० व ११ मधील विडी कामगारांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. भाजपा व महायुतीने महिलांना सक्षम व सन्मान करणारे अनेक निर्णय घेतलेले आहेत. या निर्णयाचीही माहिती डॉ. उर्वशीताईंनी दिली.



यावेळी विडी कामगार महिलांनी महायुती सरकार व आमदार विजय देशमुख यांनी आमच्या भागात मूलभूत सोयीसुविधेची मोठी विकासकामे केलेली आहेत असे सांगितले. तर लाडली बहीण सारख्या योजना देऊन सन्मान करणाऱ्या भाजपालाच मतदान करणार करण्याचे अभिवचन या महिलांनी दिले. आमदार विजय देशमुख यांच्या प्रचारार्थ सुनबाई सहभागी झाल्याने महिलावर्गात कुतूहलाने चर्चा सुरू होती. यावेळी महिला मोर्चाच्या अध्यक्षा विजयाताई वड्डेपल्ली, माजी नगरसेविका इंदिराताई कुडक्याल, माजी नगरसेविका सोनालीताई मुटकिरी, संगीताताई खंदारे, कु. रुचिराताई मासम, लताताई नराल, भाग्यलक्ष्मीताई म्हंता, शिल्पाताई देशमुख, प्रतिभाताई पसारे आदींसह प्रभाग १० व ११ मधील महिला मोर्चाच्या पदाधिकारी उपस्थित होते.

## आडम मास्तर वरिष्ठ नेते, मी बॅग घेऊन गेलोच नाही

### काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांचे स्पष्टीकरण

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

माकपाचे माजी आ. नरसय्या आडम हे वरिष्ठ नेते आहेत. मी बॅग घेऊन गेलोच नाही. आडम यांनी असे वक्तव्य का केले माहित नाही, असे स्पष्टीकरण काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा शहर मध्यचे उमेदवार चेतन नरोटे यांनी पत्रकार परिषदेत दिले.



माकपाचे माजी आ. नरसय्या आडम यांनी काही दिवसांपर्वी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेसच्या खा. प्रणिती शिंदे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्यासह इतरांवर आरोप केले होते. सोलापूर लोकसभा निवडणुकीत चेतन नरोटे, निंबर्गी यांना माझ्या घरी दोनदा पाठविण्यात आले होते. लाखो रुपयाची ऑफर दिली मात्र मी ती धुडकावून लावली. लोकसभा निवडणूक पाच दिवसांवर असताना त्यांनी ऑफर दिली होती. सीपीएम हा क्रांतिकारक पक्ष आहे असे सांगून दिलेली ऑफर मी धुडकावली होती. चहाही न घेता आम्ही काँग्रेसचा प्रचार केला असे सांगत काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांनी केसाने गळा कापला असा खळबळजनक आरोप माजी आ. नरसय्या आडम यांनी केला होता. या संदर्भात काँग्रेसचे चेतन नरोटे यांना विचारले असता त्यांनी आरोप फेटाळून लावले. माजी आ. नरसय्या आडम हे वरिष्ठ नेते आहेत मी बॅग घेऊन गेलोच नाही आडम यांनी वक्तव्य कसे काय केले? हे मला माहीत नाही असे स्पष्टीकरण नरोटे यांनी यावेळी दिले.

## विकासाची दृष्टी नसलेल्यांना घरी बसविण्याची गरज : काडादी

**● अपक्ष उमेदवार काडादी यांच्या गावभेट दौऱ्यास मोठा प्रतिसाद । गावोगावी काडादी यांचे जल्लोषात स्वागत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**



विकासाची दृष्टी नसलेल्या लोकप्रतिनिधींमुळे गेल्या दहा वर्षांत दक्षिण सोलापूर तालुक्याचे वाटोळे झाले. संस्थात्मक काम करणे दूरच अनेक सहकारी संस्था मोडकळीस आणण्याचे काम केले असा आरोप करत दक्षिण सोलापूर तालुका आणि जुळे सोलापूर विकासापासून वंचित ठेवणाऱ्यांस आता घरी बसविण्याची गरज असल्याचे आवाहन अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांनी केले.

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील प्रमुख अपक्ष उमेदवार काडादी यांच्या गावभेट दौऱ्यास नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. दक्षिण सोलापूर तालुक्यातील घोडा तांडा, मद्रे, सिंदखेड, संजवाड, औराद, राजूर, बिरनाळ आणि होनमुर्गी या गावांमध्ये नागरिकांनी काडादी यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी श्री स्वामी समर्थ सूत गिरणीचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांच्यासह सिध्देश्वर परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहकारी क्षेत्रामध्ये श्री सिध्देश्वर साखर कारखान्याने यशाचा मापदंड निर्माण केला आहे. शेतकऱ्यांच्या उसाला चांगला दर देण्याची परंपरा सिध्देश्वर कारखान्याने निर्माण केली आहे. हा कारखाना बंद पाडल्यानंतरच आपले खासगी कारखाने चांगल्या पध्दतीने चालतील हा कुटील डाव मांडणाऱ्यांना आपण सारे चांगलेच ओळखून आहोत. शेतकऱ्यांना नडणारे भाजप सरकार आणि गेल्या दहा वर्षांपासून सुडाचे राजकारण करणाऱ्या आमदारांना जागा दाखविण्याची गरज असल्याचे काडादी यांनी सांगितले.

ज्येष्ठ नेते शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, विजयसिंह मोहिते-पाटील आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्या शुभेच्छा आणि आशीर्वादासोबत तालुक्यातील सर्वपक्षीय नेतेमंडळींची आपल्याला साथ आहे. आपल्या उमेदवारीला माजी आमदार दिलीपराव माने यांनीही पाठिंबा दिला आहे. दक्षिण सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी जनतेची ही लढाई आहे. ही लढाई तडीस नेण्यासाठी आपल्याला विजयी करण्याचे आवाहन काडादी यांनी केले.


#### महालिंगराया यांच्या पालखीचे दर्शन

औराद येथे माजी सभापती अशोक देवकते यांच्या निवासस्थानी धर्मराज काडादी यांच्या प्रचारासाठी बैठक सुरू असतानाच ग्रामदैवत महालिंगराया यांच्या पालखीचे आगमन झाले. हा शुभसंकेत असून काडादी यांच्या उमेदवारीला ईश्वरी अधिष्ठान असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या. याप्रसंगी धर्मराज काडादी यांनी पालखीचे पूजन करून श्रींचे मनोभावे दर्शन घेतले.

# जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर असणार ४ हजार ६८४ सीसीटीव्हींची करडी नजर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघांत २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. ही मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी यंदा ३ हजार ७२३ मतदान केंद्रे निवडली आहेत. मतदान प्रक्रियाच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मतदान प्रक्रियेवर नजर ठेवण्यासाठी ४ हजार ६८४ सीसीटीव्हींची करडी नजर राहणार असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून मिळाली.



सध्या जिल्ह्यातील विविध पक्षातील उमेदवारांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. ११ विधानसभा मतदारसंघांत ३३४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या दिवशी १५० उमेदवारांनी माघार घेतली. निवडणुकीच्या आखाड्यात १८४ उमेदवार आहेत. मतदान प्रक्रियेसाठी जिल्ह्यामध्ये ३ हजार ७३८ मतदान केंद्रे, तर ३ हजार ७२३ मतदान अधिकारी काम करणार आहेत. जिल्ह्यातील ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदार यंदा मतदान करणार आहेत. त्यामध्ये १९ लाख ७१ हजार ८३१ पुरुष मतदार आहेत. महिला मतदार १८ लाख ७६ हजार ७२८ आहेत, तर ३१० तृतीयपंथी मतदार आहे. तर सैनिकांचे आणि शासकीय कर्मचाऱ्यांचे पोस्टल मतदानाची यामध्ये भर पडणार आहे. २० नोव्हेंबरला होणाऱ्या मतदान प्रक्रियेवर नजर ठेवण्यासाठी प्रत्येक बूथवर २ याप्रमाणे ४ हजार ६८४ सीसीटीव्ही बसवण्यात येणार आहेत. यासाठी निवडणूक कार्यालयाकडून मक्तेदारांची नियुक्ती केली आहे.



#### मतदानाच्या २ दिवस अगोदरच सर्व यंत्रणा सज्ज

मक्तेदारांकडून पाच हजार सीसीटीव्ही खरेदी करण्यात आले आहेत. सीसीटीव्हींची तपासणी चालू आहे. मतदारसंघनिहाय लागणारे सीसीटीव्ही एकत्र करुन पॅकिंग करण्याचे काम चालू आहे. १६ ते १९ नोव्हेंबरपर्यंत सीसीटीव्ही बसवण्याचे काम पूर्ण केले जाणार आहे. बुथनिहाय बसवण्यात आलेल्या या सीसीटीव्हीचे नियंत्रण मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी आणि ११ विधानसभा मतदारसंघांतील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या दालनात राहणार आहे. मतदानाच्या २ दिवस ही सर्व यंत्रणा सज्ज करण्यात येणार आहे.



## सफाई मजदूर काँग्रेसचा महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसचा महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना पाठिंबा आहे, अशी माहिती राष्ट्रीय अध्यक्ष चरणसिंह टाक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सफाई मजदूर काँग्रेसचे सोलापुरात सुमारे आठ हजार कर्मचारी आहेत. या कर्मचाऱ्यांसह सर्व कुटुंबीय महाविकास आघाडीच्या सोबत राहणार आहेत. महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ कर्मचाऱ्यांचा मेळावा घेण्यात येत आहे. सोलापूर शहर मध्य मधून काँग्रेसचे उमेदवार चेतन नरोटे, शहर उत्तर मधील उमेदवार महेश कोठे आणि दक्षिण सोलापूर मधील शिवसेना उबाठाचे उमेदवार अमर पाटील यांचा प्रचार करण्यात येणार आहे. महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहन चरणसिंह टाक यांनी केले आहे. महायुती सरकारने सफाई कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावले नाहीत. कामगार कपात, ठेकेदारी या प्रश्नी महायुतीने झुलवत ठेवले असल्याचा आरोपही यावेळी टाक यांनी केला. या पत्रकार परिषदेस काँग्रेसचे उमेदवार चेतन नरोटे, ललित टाक, श्रीनिवास रामगल आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९३८

**म्हणोनी ऐकें पांडवा । हा स्वधर्म कवणे न संडावा ।**
**सर्वभावें भजावा । हाचि एकु ॥**

विहीत कर्माची, स्वधर्मस्वरुप यज्ञाची आचरण पध्दती भगवंत सांगत आहेत. स्वधर्माचरणरुपी, विहित, शास्त्रोक्त पध्दतीचे कर्म मनुष्याने कधीही सांडू नये. कारण नितिनियमाला, स्वधर्माला अनुसरुन वागणे म्हणजेच माणुसकी सांभाळणे होय .लोकसंख्या खूप वाढत चालली आहे पण माणसांची संख्या खुप कमी होत चालली आहे. कारण व्यक्ति हा माणूस होऊन वागण्याकडे दुर्लक्ष करीत आहे. निती नियमाला, सत्याला धरुन वागणे म्हणजेच स्वधर्म आहे. पण आज अधर्माप्रमाणे म्हणजेच नितीनियमाच्या विरुध्द वागण्याचा जास्त प्रसार होत आहे. धर्माचा अर्थ माणूस जातीयते मध्ये विभागत आहे. माणुसकी प्रमाणे वागणे म्हणजेच धर्माप्रमाणे वागणे हा धर्माचा अर्थ माणूस विसरत आहे. माणसाला तू माणूस आहेस का? जरा माणसारखे वाग? असे म्हणण्याची वेळ येत आहे. याचाच अर्थ माणूस हा माणूस असुनही माणसाप्रमाणे वागत नाही. म्हणून त्याला तु कोण आहेस, हे दाखवुन देण्याची वेळ येत आहे.



स्वधर्माचे आचरण न करता मनाला वाट्टेल तसे वागून माणूस इंद्रियांचे लाड पुरविण्यात आनंद मानत आहे. इंद्रियांच्या हट्ट पुर्तीसाठी त्याच्या हातुन नको ते घडत आहे. अधर्माने प्राप्त केलेले कर्म हे निष्फळ असते. हे कर्म म्हणजे अयोग्य वेळी आकाशात आलेल्या ढगाप्रमाणे असते. त्या ढगाचा कांही उपयोग होत नसतो. एखादया शेळीच्या गळयाला स्तन असतात. त्या स्तनातून दूध निघत नसते. त्या स्तनाचा काहीही उपयोग नसतो. तसे स्वधर्माव्यतिरिक्त केलेले कर्म कांही कामाचे, उपयोगाचे नसते. म्हणून अर्जुनाने कसे वागावे हे सांगतांना भगवंत म्हणाले, म्हणोनी ऐकें पांडवा । हा स्वधर्म कवणे न संडावा । सर्वभावें भजावा । हाचि एकु ॥. अर्जुना स्वधर्माचरण कोणीही टाकू नये. एकनिष्ठपणाने सर्वांनी स्वधर्माची सेवा करावी. त्याप्रमाणे अर्जुना तु पण स्वधर्माचरण करावे. आपण देहधारी आहोत. आपल्या देहाबरोबरच अर्थात, जन्माबरोबरच काही कर्मही आलेली आहेत. हा देह आहे तोपर्यन्त कर्तव्य/कर्म हे करावेच लागणार आहेत. करणार नाही म्हटले तरी कांही कर्म आपोआप घडली जाणारच आहेत. म्हणून देहधारी माणसाने स्वधर्माचा त्याग करणे म्हणजे वेडेपणा, मूर्खपणा आहे, असेही भगवंत अर्जुनाला म्हणाले.

या देहात, इंद्रियांकडून स्वाभविक कर्म चालू असतांना जो त्या कर्माच्या फलाने माखला जात नाही. तो निरंतर आत्मस्वरुपाच्या आनंदात तल्लीन असतो. आत्मज्ञानाने जो संतुष्ट होतो, तो ख-या अर्थाने कृतार्थ झालेला असतो. म्हणून अशा आत्मज्ञानी व्यक्तिला कर्माचा संग घडत नसतो. जेवण झाल्यानंतर स्वयंपाकाची साधणे आपोआप संपत असतात, त्याप्रमाणे आत्मानंद प्राप्ती झाल्यावर कर्माचा विनाश होतो. जोपर्यन्त अंत:करणाला आत्मज्ञानाचा लाभ होणार नाही, तोपर्यन्त स्वधर्म आचरणाची साधना ही करावीच लागते. म्हणून अर्जुना तू इंद्रिय निग्रह करुन, नि:स्वार्थ बुध्दीने युध्दरुपी स्वधर्माचरण कर असे भगवंत म्हणाले. अर्जुनाला मोहग्रस्त होण्याने त्याचा स्वधर्म काय आहे, हे लक्षात येत नाही. म्हणून अर्जुनाला भगवंत त्याच्या स्वधर्माची आठवण करुन देत आहेत. आम्हालाही स्वार्थाने, आपलेपणाने, मीपणाने एखादया वेळेस आपला स्वधर्म आठवत नसेल तर, माऊलींच्या या ओव्या आपणाला आपल्या स्वधर्माची आठवण करुन देतील. आठवण व आचरणात एकवाक्यता आली तर आनंदलहरी निश्चीतच वाढतील यात शंका नसावी.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. ९ नोव्हेंबर २०२४ | शंकर महा प्रकट दिन पुणे |
| विक्रम संवत् २०८०-८१ | दुर्गाष्टमी, गोपाष्टमी |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. अष्टमी (२२.४४) | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - श्रवण (११.४७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वृध्दि (२८.२२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टी (११.२४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दाम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा.

**वृषभ :** व्यावहारिक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. व्यापार, नोकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफिकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. काही घटनांमध्ये आपल्याला आज मनस्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा.

**कन्या :** लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार-व्यवसायात विस्तार होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल.

# पूर्वभागातील श्री वेंकटेश्वर देवस्थानात आजपासून ब्रह्मोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

पूर्व भागातील श्री. व्यंकटेश्वर नगर दाजीपेठ येथील श्री वेंकटेश्वर देवस्थानच्या शनिवार ९ नोव्हेंबर ते गुरुवार १४ नोव्हेंबर पर्यंत ५२ वा ब्रह्मोत्सव कार्यक्रम होईल. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थानने केले आहेत.

**विविध कार्यक्रम असे :** शनिवार ९ नोव्हेंबर : सायं. ६.३० ते ९ स्वस्तीवाचन, विश्वसेनाराधनम्, पुण्याहवाचन, मृत्संग्रहणम्, वास्तुपूजा, रक्षाबंधन, अंकुरारोपणम्, शातुमुरै, तिर्थप्रसाद गोष्टी.

रविवार १० नोव्हेंबर : पहाटे ५.३० श्री चे मुळमूर्ती अभिषेक सकाळी ९.०० ते ११.३० पालखी सेवा, ध्वजपट प्रतिष्ठापना ध्वजारोहणम्, होमहवन, आराधना, शातुमुरै, सायंकाळी ६.३० ते ९ भेरी पुजा, देवताआवाहन, होमहवन, शेषवाहन सेवा, तिर्थप्रसाद गोष्टी.

सोमवार ११ नोव्हेंबर : पहाटे ५.३० श्रींचे उत्सवमूर्ती अभिषेक सकाळी ८ द्वारतोरणा, ध्वजकुंभ, गजवाहन सेवा, आराधना, तिर्थप्रसाद गोष्टी, सायंकाळी ६ ते ९ होमहवन, स्वागत समारंभ (येदुरुकोल्लू), कल्याणोत्सवम्, तिर्थप्रसाद गोष्टी.




मंगळवार १२ नोव्हेंबर : पहाटे ५.३० वा. श्रीं उत्सवमुर्ती अभिषेक, सकाळी ९.३० वा. होम हवन, पूर्णाहूती, हनुमान वाहन सेवा, तिर्थप्रसाद गोष्टी, दुपारी ४.३० वा होमहवन, रथोत्सवम् (शहरातून मिरवणूक) ही रथ मिरवणूक दुपारी ४.३० वाजता देवस्थानापासून निघणार असून जोडबसवण्णा चौक, राजेंद्र चौक, कन्नाचौक, औद्योगिक बँक, मार्कंडेय चौक, जोडबसवण्णा चौक, भद्रावती पेठ, दत्तनगर, पद्मशाली चौक ते परत दाजी पेठ देवस्थानात रात्रौ ९.३० वा. येणार आहे.

बुधवार १३ नोव्हेंबर : सकाळी ७ वा. होमवन, अश्ववाहन सेवा, तीर्थप्रसाद गोष्टी, सकाळी ९ ते १२ वा. श्री चे मुळमुर्ती ८१ उत्तमोत्तम कळशस्नपनम् (८१ कळशाभिषेक) तिर्थप्रशाद गोष्टी, सायंकाळी ६रात्रौ ९ गरुडवाहन सेवा, तिर्थप्रसाद गोष्टी.

गुरुवार १४ नोव्हेंबर : सकाळी ७.३० होमहवन सुर्यप्रभा वाहन सेवा, सकाळी ९ ते १२ होमहवन, चक्रस्नानम् (चक्रतीर्थ), आराधना, शातुमुरै, तिर्थप्रसाद गोष्ट, सायंकाळी ५ ते ९ आराधना, चंद्रप्रभा वाहन सेवा, होमहवन, महापुर्णाहूती, देवतोउद्वासनम्, श्री पुष्पयागम्, द्वादशाराधना, वसंतोत्सवम् (वनविहार), ध्वजपट अवरोहणम्, शातुमुरै, कुंभप्रोक्षणम, तिर्थप्रसाद गोष्टी.




## हिंदुराष्ट्र स्थापनेचे कार्य करताना हिंदूंनी खोट्या नरेटिव्हपासून सावध रहावे : बुणगे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

देशात अनेक प्रकारचे नरेटिव्ह पसरवले जात आहेत. त्यामुळे हिंदुराष्ट्र स्थापनेचे कार्य करणाऱ्यांनी अश्या प्रकारच्या खोट्या नरेटिव्हपासून सावध रहावे, असे प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक राजन बुणगे यांनी केले.

हिंदु जनजागृती समितीच्या वतीने एक दिवस शिवरायांच्या सान्निध्यात या मोहिमेच्या समारोपीय व्याख्यानात ते बोलत होते. येथील भुईकोट किल्ला येथे या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

ते पुढे म्हणाले, छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी ज्याप्रमाणे काळाची पावले ओळखून निर्णय घेतले आणि प्रयत्न केले त्याप्रमाणे राष्ट्रभक्त आणि धर्मप्रेमी यांनी हिंदु राष्ट्र स्थापनेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

या मोहिमेची सुरुवात छ. शिवरायांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या वेळी सर्व धर्मप्रेमींनी मिळून किल्याची स्वच्छता केली. त्यानंतर स्वसंरक्षण प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके दाखवण्यात आले. त्यात कराटे, लाठी- काठी आणि दंडसाखळीचे प्रकार दाखवण्यात आले.

## दि. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

आय.ई.आय ही भारतातील प्रोफेशनल इंजिनियर्सची संस्था असून गेली १०२ वर्षे इंजिनिअरींगच्या १५ शाखेअंतर्गत विविध कार्यक्रम व प्रकल्प राबवित असून १ लाखाहून अधिक सभासद आहेत. आयईआय सेंटरच्या १५व्या सर्वसाधारण सभेचे उद्घाटन इंजि. दादासाहेब रोंगे यांच्या हस्ते विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दीपप्रज्वलनाने झाले.



सभेच्या सुरुवातीस उद्योगपती, इंजिनियर रतन टाटा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. आय.ई.आय सेंटरचे अध्यक्ष अभियंता डॉ. मोहन देशपांडे यांनी स्वागतपर भाषण केले. डॉ. उमेश मुगळे यांनी २०२३-२४ वर्षातील कार्यक्रमाचा अहवाल सादर केला. यावेळी २०२४-२५ वर्षासाठी नेमलेल्या कमिटी सदस्यांच्या निवडणुकीचा अहवाल बोर्ड ऑफ स्क्रुटीनर्सचे अभियंता डॉ. बी.पी.रोंगे यांनी जाहीर केला.

**निवडून आलेले सदस्य याप्रमाणे :** ॲग्रीकल्चर विभाग : डॉ. सुहास उपाध्ये, आर्कीटेक्चरल विभाग : ओम दरक, कॉम्प्युटर विभाग : इंजि. स्वाती पवार, मनोज ढोबळे. सिव्हिल अभियंता : शशीकांत गोसावी, अविनाश कोकरे, चेतन कोनापुरे. इलेक्ट्रीकल अभियंता : डॉ. दीप्ती तांबोळी, इनव्हायनमेंट अभियंता : रोहन देशमुख. इलेक्ट्रॉनिक्स अभियंता : पी.आर. नागणसुरे, डॉ. मीनाक्षी पवार. एअरोस्पेस अभियंता : डॉ. प्रशांत पवार. मेकॅनिकल अभियंता : डॉ. यशपाल खेडकर व डॉ. श्रीकांत जोशी. प्रॉडक्शन अभियंता : डॉ. संदीप वांगीकर. बोर्ड ऑफ स्क्रुटिनर्स सभासद अभियंता डॉ. बी.पी. रोंगे, इजि. सी.बी. नाडगौडा, अभियंता डॉ. एस.एस. पवार, अभियंता शेखर जेऊरकर, अभियंता डॉ. प्रशांत मगदुम.

त्यांचा आणि अभियंता गोकुळ चितारी, संजय धनशेट्टी, डॉ. एन.डी. मिसाळ, डॉ. व्ही.के. पत्की, डॉ. प्रदीप तपकिरे, कल्पेश मालू, शेखर जेऊरकर, गजानन कुलकर्णी यांचा उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रतिभावान सदस्य म्हणून सत्कार करण्यात आला.

सभा यशस्वी करण्यासाठी आय.इ.आय. चे संस्थापक अध्यक्ष एच.एन. सोमाणी, माजी अध्यक्ष डॉ. जी.के. देशमुख, डॉ. बी.पी.रोंगे, सी.बी. नाडगौडा, डॉ. एस.एस. पवार, प्राचार्य एस.एम. शेख, नागेश पवार, काशीद महाराज यांनी परिश्रम घेतले.

## जीवनावर भाष्य करणाऱ्या हृदयस्पर्शी कवितांनी रसिक श्रोते भारावले

### कवी रा. ना. पवार यांचा स्मृतिदिन; मराठी रंगभूमी दिनानिमित्त रंगले काव्य संमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

प्रेमकवितेतून व्यक्त झालेला प्रियकर.. भाव कवितेतून व्यक्त होणारी तरुणी.., निसर्गाच्या विविध रूपांना शब्दांचे कोंदण देऊन कवितेच्या माध्यमातून उभे केलेल्या निसर्ग चित्रणाबरोबरच, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर त्याचे गुणगान गाणारी कविता सोलापुरातील मान्यवर कवींनी काव्य संमेलनाच्या माध्यमातून जीवनावर भाष्य करणाऱ्या हृदयस्पर्शी कवितां सादरीकरणातून रसिक श्रोते भारावले. या काव्य संमेलनाच्या माध्यमातून नाट्य आणि साहित्य रसिकांना अस्सल सोलापुरी भाषेतल्या कविता ऐकण्याची संधी मिळाली.



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरच्या वतीने मराठी रंगभूमी दिनाचे औचित्य साधून येथील नामवंत कवी स्व. रा.ना.पवार यांच्या स्मृतिदिना निमित्त काव्य संमेलनाचे आयोजन केले होते. या काव्य संमेलनास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांची प्रमुख उपस्थिती होती. यात नामवंत कवी माधव पवार, कवी मारुती कटकधोंड, राजेंद्र भोसले, रामचंद्र धर्मसाले, रेणुका बुधारम या मान्यवर कवींनी सहभाग घेतला होता.

रेणुका बुधाराम या तेलुगु भाषिक कवियत्रीने ''राहून गेले रक्षाबंधन, भाऊबीजेला तरी येऊन जा'' ही भाऊ आणि बहिणींच्या प्रेमाची आगळीवेगळी महती सांगणारी कविता सादर करून सभागृहाचा नूर अत्यंत भावनिक करून टाकला, तर ''कधी नाही केली पंढरीची वारी'' हा अभंग सादर करून त्यांनी वातावरण भक्तिमय करून सोडले. कवी रामचंद्र धर्मसाले यांनी प्रियकर आणि प्रेयसीच्या भेटीची ओढ किती निर्मळ पातळीवरची असू शकते याचा प्रत्यय या कवितेतून करून दिला तर ''आसवे''.. या कवितेतून तिच्या भेटीची ओढ किती सुखद असू शकते याचे वर्णन त्यांनी केले.

कवी राजेंद्र भोसले यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर ''माझ्या मराठीचा बाज, जणू सुवर्णाचा ताज, तिचे गुणगान गाया मन उल्हासित आज'' हे माय मराठीचे गौरव गीत सादर केले तर ''बाय-बाय'' या कवितेतून ''जसजसे प्रेम रंगू लागले लोक चर्चा फार करू लागले, जगास साऱ्या टाळत टाळत प्रेम बाळसे धरू लागले.'' या कवितेने उपास्थित रसिकांची दाद मिळवली.

कवी मारुती कटकधोंड यांनी मीच मला सापडलो या कवितेतून छिन्नी हातोडी घेऊन मी स्वतःचीच शकले काढली, मीच मला शोधायला तरी नाही सापडलो मला या कवितेतून जीवनाचे सत्य शोधण्याचा प्रयत्न केला. शेवटी कवी संमेलनाचे अध्यक्ष माधव पवार यांनी काव्यसंमेलनाचे सूत्रसंचालन अत्यंत खुमासदार शैलीमध्ये करत करत त्यांनी आपल्या कविता सादर केला केल्या, शापित कलावंत ही कलावंतांची व्यथा सांगणारी कविता सादर करत असताना कलावंतांच्या वेदना त्यांनी आपल्या कवितेत मांडल्या ''हे शापित कलावंता रंगमंचावर कुबेराची भूमिका करताना, घरात अर्ध्या भाकरीची तरी व्यवस्था करीत जा'' या शब्दात त्यांनी कलावंतांच्या वास्तविक जगण्यावर अचूक बोट ठेवले. त्याचबरोबर ''सरणावरचे फुल का तोडलेस तू बाबा, सरणावरची फुले वाढवी शवाची शोभा'' या कवितेने रसिकांना अंतर्मुख केले.

नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाहक प्रा. जोतिबा काटे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पद्माकर कुलकर्णी यांनी केले.



## चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय पतसंस्थेचे २०० कोटी ठेवीचे उद्दिष्टपुर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

कन्ना चौक येथील श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतपेढी या पतसंस्थेच्या ठेवीमध्ये वाढ होऊन २०० कोटी रुपये ठेवीचे उद्दिष्ट पुर्ण झाले आहे. तसेच या पतसंस्थेतील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात ४५% भरीव वाढ करुन त्यांच्या वेतनात वाढ करण्यात आली.

या पतसंस्थेतील कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना दिलेला तत्पर सेवा व परिश्रमाची दखल घेऊन संस्थेच्या संचालक मंडळाने ही वाढ केली आहे. त्याबद्दल कर्मचारी वर्गामध्ये समाधान व्यक्त करुन चेअरमन विठ्ठल बडगंची, व्हा. चेअरमन चंद्रकांत रंगम, संचालक अरुण चिंता, लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी, अरविंद पुडूर, नरेंद्र बत्तुल, मल्लिकार्जुन खंडे, विलास बडगंची, शंकर कोंतम, विष्णु म्याकल, अजय रंगम, सौ. उमा पुडूर, अंबिका उदगिरी, विजयकुमार शिंपी, रुपसिंग राठोड, भगवंत फलमारे, ॲड. अंबादास कंदीकोंडा यांचे आभार मानले आहेत.


ही पतसंस्था जिल्हातील अग्रणी पतसंस्था असून सध्या या संस्थेत एकूण ठेवी रु. २ कोटी १ लाख रुपये, एकूण कर्जे रु १ कोटी ६४ लाख व संस्थेचा एकूण व्यवसाय रु ३ कोटी ६५ लाख इतका आहे. स्थापनेपासून ऑडीट वर्ग ''अ'' असून एनपीए प्रमाण ० टक्के आहे. ९९ टक्के सुरक्षित कर्जे असलेल्या या पतसंस्थेला आतापर्यंत महाराष्ट्र शासनाच्या ''सहकारनिष्ठ'' पुरस्कारासह १९ पुरस्कार मिळाले आहेत. या यशात सभासद, ठेवीदार, कर्जदार, कर्मचारी व आजी माजी संचालक मंडळाचे योगदान आहे.

**गणेश मनोहर कुलकर्णी रुळानुबंध या पुस्तकाचे लेखक शनिवारी प्रिसिजन वाचन अभियान कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या याच पुस्तकाविषयी.**

गणेश, त्याची सखी, या दोघांचा स्वप्नील हा तरुण छोकरा मिळून एका त्रिकोणी कुटुंबाचं सामान्यातलं असूनही अजब असं रसायन आहे. ' यांना हे , सगळं कसं काय जमतं ? ' हा प्रश्न त्यांना ओळखणाऱ्या प्रत्येकाला पडलाच पाहिजे.

'रुळानुबंध' या गणेशच्या पुस्तकाच्या निमित्ताने वाचकांसाठी काही गोष्टी सांगायचा मोह टाळणं अवघड आहे. एखाद्याच्या मनातली उत्कटता आणि ती तितक्याच जिद्दीने. पाठपुरावा करत शब्दांत मांडायचा मोकळेपणा हा जर गणेश कुलकर्णी या व्यक्तीइतका कोणाकडे असेल तर तुम्ही लेखक आहात की नाही हा मुद्दाच आपसूक दूर होतो.

रुळानुबंध या पुस्तकाचं अंतरंग त्याच्या शीर्षकाइतकंच देखणं आहे आणि बोलकंही. गणेश, त्याच्या बोलण्याच्याच द्रुत लयीत लिहूही शकतो हे वाचताना शब्दोशब्दी जाणवतं. यातले सर्व लेख वेगवेगळ्या मान्यवर मासिकांतून आगोदरच प्रकाशित झालेले असल्यामुळे या लेखनाच्या गुणवत्तेबद्दल लिहिण्याऐवजी लेखकाबद्दल लिहावं, एका साध्या, उत्कट आणि पराकोटीच्या कलाप्रेमी माणसाबद्दल लिहावं असं निश्चित वाटतं. या पुस्तकातले सर्व लेख वाचून झाले वाचकाला हे नक्की जाणवेल की ही नुसती एका रेल्वे इंजिन चालकाची अनुभवमालिका नाही, तर आपण एका चतुरंगी व्यक्तीमत्वाचं बोलणं ऐकतो आहोत, वाचतो आहोत.




## रुळानुबंध : एक समांतर संवादी काव्य



एका रुळावरून हा चालक जीवन मृत्यूचा प्रवास कोरत जातो तर समांतरपणे , दुसऱ्या रुळावरून, एका काव्य, गझल , संगीत , रंगचित्र , झाडे , प्राणी , पक्षी , निसर्ग आणि एकूणातच समग्र जीवनाच्या रसरशीतपणावर फिदा झालेल्या माणसाचं मनोगत चित्रमय भाषेत निरखत जातो. मुखपृष्ठ, मांडणी इ. तांत्रिक रेखीव आणि ठाशीवपणाव्यतिरिक्त या पुस्तकाचा एक अभिनव विशेष मनात भरला तो म्हणजे , संदर्भसूचीच्या जागी, अखेरच्या पानावर, संदर्भ म्हणून दिलेली नावांची यादी.

या यादीत पृष्ठक्रमांकानुसार त्या त्या कवी, शायरांची नावं आहेत ज्यांच्या ओळींची अवतरणं गणेशनं जागोजागी उधृत केली आहेत. आभाराच्या सूचीपेक्षा हे असं व्यक्त होणं यात लेखकाचा मोठेपणा तर आहेच पण संबंधित (हयात)कवींची मनंही यामुळे सुखावली जातात. एकूणच 'रुळानुबंध' वाचन म्हणजे पोलादी दैनंदिनीआड दडलेला एक मनोरम पुष्पगुच्छ उलगडत जाणं. या प्रक्रियेत आपण गणेश कुलकर्णी या रसिक अवलियाला भेटता भेटता स्वतःतल्या लेखकालाही नकळत भेटतो.

- प्रल्हाद देशपांडे, डोंबिवली.

## शहर-जिल्ह्यात शिधापत्रिकाधारकांचे ५५ टक्के ई-केवायसी प्रमाणीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**



सार्वजनिक वितरण व्यवस्था प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी व त्याअनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी शहर-जिल्हयातील १०० टक्के लाभार्थी ई-केवायसी प्रमाणिकरण होणे आवश्यक आहे. सध्या शहर-जिल्ह्यात ५५ टक्के कार्डधारकांनी ईकेवायसी केली असून, उर्वरित ४५ टक्के कार्डधारकांनीही आपली ईकेवायसी वेळेत करून घ्यावी, असे आवाहन शहर पुरवठा अधिकारी ओंकार पडुळे यांनी केले.

लाभार्थ्यांना एक देश एक शिधापत्रिका योजनेप्रमाणेच त्यांच्या स्वगृही राज्यात न जाता कोणत्याही ठिकाणाहून ई-केवायसी प्रमाणिकरण प्रक्रिया पुर्ण करण्याची सुविधा केंद्र शासनाने उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार सुविधा ई-पॉस मशिनवर कार्यान्वित करण्यात आली आहे. ही केवायसी केल्यावरच पुढील राशनचा माल प्रत्येकांना मिळणार आहे. यामुळे शहर-जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या राशन दुकानदारांकडे जावून ईकेवायसी माहे नोव्हेंबर २०२४ अखेर करून घ्यावी.

अन्यथा ज्या लाभार्थ्यांचे ई-केवायसी प्रमाणीकरण पुर्ण होणार नाही, अशा लाभार्थ्यांचे धान्य वाटप थांबविण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### मैंदर्गी रोड, भीमनगर परिसरात ड्रेनेज पाणी, कचरा रस्त्यावर

**अक्कलकोट, दि. ८ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तीर्थक्षेत्री दिपावली सुट्टीत दत्तअवतार श्री स्वामी समर्थ महाराजाच्या दर्शनार्थ लाखो भाविक येत असताना सर्वात वर्दळीचा भाग भिमनगर भक्त निवास मैंदर्गी रस्त्यावर सार्वजनिक स्वच्छतेकडे नगर पालिकेचे मोठे दुर्लक्ष होत आहे सांडपाणी गटार तुंबल्याने गटाराची दुर्घधीयुक्त सांडपाणी रस्त्यावर, कचरा रस्त्यावर पडत आहे. डासांचा प्रादुभाव वाढत आहे. सर्दी, ताप, डेंग्यूसदृष्य आजार, ताप यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. नगरपालिका आरोग्य विभाग यंत्रणा योग्य ती खबरदारी घ्यावी अशी मागणी शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे, पंकज मडीखांबे, अय्याज शेख यांनी केली आहे. दिपावली सुट्टीमुळे रोज अक्कलकोट तीर्थक्षेत्री स्वामी दर्शनार्थ १ लाखापेक्षा अधिक भाविक येत आहेत. विशेषतः वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर परिसर, मैंदर्गी रोड भक्त निवास या भागात भाविकांचा वावर अधिक आहे. यामुळे परिसरात कचरा, ड्रेनेज तुंबणे, दुर्गंधी, सार्वजनिक स्वच्छता, बाधीत होणे असे चित्र निदर्शनास येत आहे. या परिसरात ड्रेनेज, सफाई, कचरा उचलणे, जंतुनाशक फवारणी, डास निर्मूलन उपाययोजना, हिवताप, डेंग्यू, हत्ती रोग रुग्ण रक्त तपासणी, कोरडा दिवस पाळणे, टायर, नारळाची करवंटीत पाणी साचलेले नष्ट करणे, सार्वजनिक स्वच्छता राखणे, उपाय योजना कराव्यात, अशी मागणी ठाकरे गट शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे या नी केली आहे.



### माळशिरस राज्य उत्पादन शुल्कची कारवाई;१२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अकलूज, दि. ८ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीत आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगानेराज्य उत्पादन माळशिरस विभागाच्या निरीक्षकांनी कारवाई केली आहे. १ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर या कालावधीत ४८ गुन्हे नोंद करून ४५ आरोपींना अटक करुन, ९ वाहनांसह एकूण अकरा लाख ८० हजार ४४६ किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाईमध्ये ३८७० लि. हातभट्टी रसायन, १५९२ लि. हातभट्टी दारु, ५८५ लि. ताडी, ७४.९८ लि. देशी दारु, १०.०८ लि. विदेशी दारु असा एकूण ६,१३२ लि. अवैध मद्य जप्त करण्यात आले आहे. सदरची कारवाई आयुक्त विजय सूर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त सागर धोमकर, सोलापूरच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव यांच्या म ार्गदर्शनाखाली निरीक्षक एस. जी. भवड, बी. बी. नेवसे, एस. अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक या संदर्भात कोणतीही तक्रार असल्यास १८००८३३३३३३ व व्हॉटस् ॲप क्र. ८४२२००११३३ तसेच दूरध्वनी क्र. ०२१७-२३१२३७६ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### विकासासाठी 'राणादादां'नी भरघोस निधी दिला : दीपक आलुरे

**अणदूर, दि. ८ नोव्हेंबर-**

अणदूर परिसरात राणा दादांनी भरघोस निधी देऊन सर्वांना न्याय देण्याचा व विकासाचा रथ कायम ठेवला असून येणाऱ्या काळात हाच विकासाचा ओघ कायम राहावा. गावोगावी भरघोस निधी आणता यावा यासाठी आपला हक्काचा आमदार असणे आवश्यक आहे, असे मत दीपकदादा आलुरे यांनी व्यक्त केले. ते अणदूर येथील ग्रामदैवत खंडोबा मंदिरात महायुतीचे उमेदवार राणादादा पाटील यांच्या प्रचाराच्या शुभारंभप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी घुगे होते. काशिनाथ शेटे सावकार उपस्थित होते. दीपक दादा आलुरे यांनी अवघ्या अडीच वर्षाच्या कारकिर्दीत नभूतो निधी देऊन सर्वांगीण विकासाला चालना दिली असून राज्यातील प्रथम बसव सृष्टी साकारली, लिंगायत, बंजारा समाजाचे स्वप्न पूर्ण होणार असून दादांनी सर्व समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.



### प्रस्थापिताच्या लढाईत विजयी होणारच : युवराज राठोड

**मंद्रुप, दि. ८ नोव्हेंबर-**

दक्षिणमध्ये प्रस्थापित कारखाना व संस्था वाचविण्यासाठी व स्वताच्या स्वार्थासाठी निवडणुक लढवित आहेत. ओबीसी व वंचित समाज विकासापासून वंचित आहे, म्हणून विकासापासून वंचितांच्या न्याय हक्कासाठी मतदार मला साथ देणार असल्याने विजयी होणार असे प्रतिपादन दक्षिण सोलापूर परिवर्तन आघाडीचे अपक्ष उमेदवार युवराज राठोड यांनी केले. हत्तुर येथे प्रचारशुभारंभ प्रसंगी राठोड बोलत होते. यावेळी पिंटू चव्हाण, नाना चव्हाण, अशोक चव्हाण, नाम पवार, रायमल पवार, दशरथ पवार, प्रमोद पवार, बंडू कदम, सिध्दू गणियार, प्रशांत कुराडे, शाम गायकवाड, राम पवार, प्रदीप सुरवसे, गणेश कुराडे, माळप्पा गणियार, आशिष बिराजदार, अकबर शेख आदी उपस्थित होते.

# मंदिर परिसर, दर्शन रांगेत १२० सीसीटीव्ही कॅमेरे

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके : यात्रा कालावधीत विविध घटनांच्या घडामोडीवर करडी नजर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ नोव्हेंबर-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिसर, श्री संत तुकाराम भवन, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, संपूर्ण दर्शन रांग, पत्रा शेड आदी ठिकाणांतील घटना , घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी मंदिर समितीच्या वतीने कायम स्वरुपी व तात्पुरत्या स्वरूपात असे एकूण १२० ठिकाणी अत्याधुनिक पद्धतीचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

संबधित ठिकाणच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे परीक्षण करण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आणि श्री संत तुकाराम भवन येथे असे दोन नियंत्रण कक्ष (कंट्रोल रुम) तयार करण्यात आले आहेत. या नियंत्रण कक्षामध्ये २४ तास सीसीटीव्ही ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आली असून,



### डाटा सुरक्षित राहणार

भाविकांना केंद्रबिंदू मानून भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ज्या ज्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची गरज होती, त्या त्या ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये आयपी, अनॉलॉग व मेगापिक्सल नाईट व्हिजनचे अत्याधुनिक कॅमेरे आहेत. या सर्व कॅमेराद्वारे चित्रित केलेला डाटादेखील सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था निर्माण केलेली आहे.

या यंत्रणेची श्र जबाबदारी अनुभवी संगणक तज्ञ तथा विभाग प्रमुख राजेंद्र घागरे यांना देण्यात आली आहे. याशिवाय, पोलीस प्रशासनाकडून देखील कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्यात आलेली असून सीसीटीव्हीरुपी तिसऱ्या डोळ्याचा वॉच परिसरावर राहणार आहे.

### मदत करणे शक्य

संबधित कॅमेरे सर्व दिशेस कव्हर करीत असल्याने कोणताही परिसर त्याच्या नजरेतून सुटत नाही. त्यामुळे भाविकांमध्ये सुरक्षितता निर्माण होणार असून, आवश्यक ठिकाणी भाविकांना तात्काळ मदत देखील करता येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

कार्तिकी वारीच्या निमित्ताने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहे, या सर्व भाविकांचे सुलभ व जलद गतीने दर्शन व्हावे, यासाठी आवश्यक त्या उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत. दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये, भाविकास काही शारीरिक त्रास झाल्यास तात्काळ आरोग्य व्यवस्था उपलब्ध करून देणे, कोणत्याही स्वरूपाचा अनुचित प्रकार घडू नये व इतर अनुषंगिक घडामोडींवर सीसीटीव्हीची नजर असणार आहे. मंदिर, मंदिर परिसर, दर्शन रांग व इतर ठिकाणी काही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास किंवा काही सूचना द्यावयाच्या असल्यास नियंत्रण कक्षातून वॉकीटॉकीद्वारे संवाद साधून तात्काळ आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सीसीटीव्हीची खूप मोठी मदत होत आहे. याशिवाय, कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापक यांच्या कार्यालयात देखील या कॅमेऱ्यांचा अक्सेस दिला असल्याने त्यांना मुख्यालयात बसून सर्व घडामोडी पाहता येत आहेत.

# तब्बल २६ वर्षानंतर पुन्हा वाजली घंटा

## माजी विद्यार्थ्यांची पुन्हा भरली शाळा; वर्गमित्रांच्या सहवासाने, कित्येक आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ नोव्हेंबर-**

दीपावली सुट्टीचे औचित्य साधून बार्शी टेक्निकल हायस्कूलच्या दहावी १९९७-९८ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा टेक्निकल हायस्कूलमध्ये संपन्न झाला. २६ वर्षानंतर सर्व मित्रमैत्रिणीं एकत्र जमले व पुन्हा शाळा भरली. घंटा वाजली, सर्वांनी गेटमधून शाळेत प्रवेश केला, गुरुजनांनी सर्वांसोबत राष्ट्रगीत गायले. हायस्कूलच्या सभा हॉलमध्ये प्रतिमा पूजन झाले. शिक्षकांचा माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते सत्कार झाला. आलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी स्वतःचा परिचय दिला.

सर्वांच्या एकत्र येण्यानं



कित्येक आठवणी, प्रसंग आणि किस्से डोळ्यासमोर तरळल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टकले व व्यासपीठावर तत्कालीन शिक्षक भोसले, चव्हाण, नांदवटे, कदम, देशमुख सर, रमेश पाटील व रजपूत, पाटील, घोलप यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

त्यानंतर सर्वच गुरुवर्यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून सचिन जाधवर सध्या सहा.पोलीस आयुक्त, मुंबई व सारीका जाधवर सध्या पत्रकार, शिक्षिका या दोघांनी आपल्या मनोगतातून शालेय आठवणींना उजाळा दिला. आपला मित्र अशोक पालके देशसेवेसाठी भारतीय सीमेवर मेजर म्हणून कार्यरत आहे, त्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. दुसरा मित्र रामभाऊ जगदाळे उद्योजक, पुणे त्यांचा ही सत्कार करण्यात आला. सामाजिक उत्तरदायित्व म्हणून शाळेला दोन सायकल भेट देण्यात आल्या.

दिवंगत शिक्षक व विद्यार्थ्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.स्ध हभोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. तत्कालीन मुख्याध्यापक राजगुरू यांनी ईतनी शक्ती हमे देना दाता हे गीत गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश शिंदे तर आभार रामेश्वर भालेराव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### बेंगळुरूमध्ये रंगणार मराठी काव्य मैफिल

**सोलापूर, दि. ८ नोव्हेंबर-**

बेंगळूरू येथे रविवारी १० नोव्हेंबर रोजी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ मुंबई, कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद कलबुरगी, बेंगळुरू विभाग आणि महाराष्ट्र मंडळ बेंगळुरूतर्फे बेंगळुरू येथेसाहित्यिक कार्यक्रम होणार आहे.

बेंगळुरु गांधीनगर येथील महाराष्ट्र मंडळात होणाऱ्या या कार्यक्रमास लेखक प्रा. मनोज बोरगांवकर आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक वि. ग. सातपुते, करामसापचे अध्यक्ष गुरय्या रे. स्वामी, कार्यवाह प्रभाकर सलगरे, रेखा नाईक उपास्थित राहणार आहेत, असे करामसाप बेंगळुरू विभागाच्या अध्यक्षा दीपाली वझे यांनी सांगितले. यावेळी नदिष्टचे लेखक प्रा. मनोज बोरगांवकर यांची प्रकट मुलाखत डॉ. अनुराग लव्हेकर घेणार आहेत. काव्य वि. ग. सातपुते यांचा सत्कार, कर्नाटकात मराठी साहित्यसेवा केलेल्या ज्येष्ठ मराठी साहित्यिक डॉ. राजेंद्र पडतुरे, डॉ. युवराज सोनटक्के, प्रा. विजयकुमार चौधरी, रेखा नाईक, करामसाप राज्य कार्यकारणीवर निवड झाल्याबद्दल डॉ. संध्या राजन अणवेकर, विजयपूर जिल्हाध्यक्ष दीपक शिंत्रे, बागलकोट जिल्हाध्यक्ष सुधा बेटगेरी यांचा सन्मान करण्यात येणार आहे. त्यानंतर नदी विषयावर काव्य मैफिल होणार असून बेंगळुरू आणि परिसरातील कवी सहभागी होणार आहेत.



### प्रबोधन मंचातर्फे मतदान जनजागृतीसाठी बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ नोव्हेंबर-**

आण्णासाहेब पाटील म हामंडाळाचे अध्यक्ष नरेंद्रजी पाटील यांचे बार्शी तालुक्यातील मतदरांना मार्गदर्शन लाभले. नरेंद्रजी पाटील यांनी यावेळी अशी भूमिका मंडळी की हिंदु हितामध्येच राष्ट्रहीत आहे. त्यांनी महमंडळाच्या म ाध्यमातून कशा योजना राबविल्या जातात त्याची माहिती दिली व महामंडळातर्फे आतातर्यंत लाखो तरुणांना उद्योजक बनवले, मराठा समाजातील तरुणांना लाभ मिळवून दिला व आगामी काळात देखील याची टक्केवारी वाढेल. सुमारे पाच लाख तरुणांना उद्योजक करायचं आहे, असा त्यांनी या वेळी उपस्थितीना विश्वास दिला.

तसेच प्रबोधन मंचाने १००% मतदान हे राष्ट्रहिताला योगधान असा संदेश दिला. तसेच मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली. ही बैठक बार्शी येथील पोफळे मंगल कार्यालय तसेच वैराग, उपळे दुमाला अशा ठिकाणी पार पडली. सदर बैठकीस मतदारांचा व लोकांचा उत्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी समाजातील काही मान्यवारांनी, मतदरांनी नरेंद्रजी पाटील यांना समाजातील विविध प्रश्न उपस्तिथ केले. यावर पाटील यांनी योग्य असे मार्गदर्शन केले. या बैठकीस प्रबोधन मंच बार्शीचे प्रमुख सरेश हालमे, मोहनजी श्रीरामे, अरुणजी ग्रामोपाध्याय, तुषार म हाजन, बालाजी शिंदे, तात्यासाहेब घावटे, जयंत बुरगुटे, शिवाजी सुरुवसे, सत्यवान ताटे, बापू कदम, सूर्यकांत देशमुख, अजय आरगडे, दीपक ढगे, समाधान ताटे, पांडुरंग नायकवाडी, खनदारे सर व मोठ्या प्रमाणात संघ स्वयंसेवक व सम ाजातील मान्यवर उपस्थित होते.

# चंद्रभागेच्या तीरावर महिला भाविकांसाठी १० चेंजिंग रूम

## कार्तिकी यात्रा तयारी; भाविकांसाठी मोठ्या प्रमाणात सोयीसुविधा उपलब्ध




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ नोव्हेंबर-**

कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. येणाऱ्या भाविकांना मंदिर समितीकडून मुबलक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच विठुरायाचे दर्शन घेण्यापूर्वी अनेक भाविक चंद्रभागेमध्ये स्नान करतात. महिला भाविकांसाठी चंद्रभागा वाळवंटात स्नान केल्यानंतर कपडे बदलण्यासाठी दहा चेंजिंग रूमची उभारणी करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली

कार्तिकी एकादशीचा मुख्य सोहळा १२ नोव्हेंबरला संपन्न होत आहे. त्याआधी वारकरी आणि भाविक श्री क्षेत्र पंढरपुरात दाखल होत आहेत. वारीला येणारे बहुतेक सर्व भाविक विठुरायाच्या दर्शनापूर्वी चंद्रभागा नदीमध्ये स्नान करीत असतात. सदर ठिकाणी महिला भाविकांना कपडे बदलण्याची सोय करण्याच्या दृष्टीने चंद्रभागा नदीपात्रात १० ठिकाणी चेंजिंग रूम बसविण्यात आलेल्या आहेत. याशिवाय, महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चेंजिंग रूमजवळ २४ तास महिला सुरक्षा कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. मंदिर प्रशासनाकडून उभारण्यात आलेल्या चेंजिंग रूमद्वारे एकावेळेस ३० ते ४० महिला भाविक कपडे बदलू शकतात.

### दर्शनरांगेत चार ठिकाणी हिरकणी कक्ष

कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेसाठी श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप, पत्राशेड व श्री विठ्ठल सभामंडप येथे चार ठिकाणी हिरकणी कक्षाची (स्तनपान गृह) उभारणी करण्यात आली आहे. याशिवाय, दर्शनमंडप येथे सॅनिटरी नॅपकिनचीदेखील उपलब्धता करण्यात आली असून श्रींच्या दर्शनरांगेत महिला भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त मंदिर समिती मार्फत महिला स्वयंसेवक नियुक्त करण्यात आलेले आहेत. या यात्रेला येणाऱ्या सर्व वारकरी भाविकांची सेवा करण्यास मंदिर प्रशासन सदैव तत्पर असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

# यंदा जनता कर्तृत्ववान नेतृत्वाला संधी देणार

## पंढरपुरात मनसेचे इंजिन सुसाट धावणार : तीन दादांना पडणार एक बापू भारी; राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ नोव्हेंबर-**

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील जनता यंदा कर्तृत्ववान सर्वसामान्य नेतृत्वाला संधी देणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात चौरंगी लढत होत आहे. याम ध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे बापू, भाजपाचे दादा, कॉंग्रेसचेदादा आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षचेदादा अशी तीन दादा आणि एक बापू मध्ये थेट लढत होत आहे.

निवडणूक रिंगणात असलेल्या चारही उमेदवारांच्या कामाची तुलना मतदारांकडून केली जात आहे.यामध्ये विद्यमान भाजपा आमदारांकडून तीन कोटीची विकास



कामे केल्याचा दावा केला जात आहे. मात्र हा विकास कागदावरच असल्याचा आरोप होत आहे. तर कॉंग्रेसचे उमेदवार निवडणुकीपुरतेच जनतेच्या संपर्कात असतात अशी टीका होत आहे. तर राज्यात शरद पवारांची क्रेझ असलीतरी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून नवख्या उमेदवाराला संधी दिल्याने ते जनतेपर्यंत पोहोचू शकणार नाहीत असा दावा केला जात आहे. मात्र मनसेकडून देण्यात आलेले उमेदवार निवडणुका डोळ्यासमोर ठेवून न काम करता सर्वसाम ान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कायमच उपलब्ध असतात. आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे दिलीपबापू धोत्रे यांनी मागील अनेक वर्षांपासून मतदार संघातील नागरिकांचे हित डोळ्यासमोर ठेवून त्यांनी काम केले आहे. पंढरपुरातील नागरिकांचा वाढीव कर माफ करणे, हिंदू, मुस्लिम स्म शानभूमी दुरुस्ती , रस्ते खड्डे मुक्त करणे, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आर्थिक मदत करणे, बेरोजगार तरुणांना नोकरी उपलब्ध करून देणे, महिलांना सक्षम बनवण्यासाठी लघुउद्योग उभा करून देणे याचबरोबर कोरोना काळात त्यांनी रुग्णांना बेड उपलब्ध करून देण्यासाठी पल्स कोविड हॉस्पिटलची निर्मिती तसेच एकही नागरिक उपाशी झोपणार नाही याची काळजी त्यांनी घेतली होती. त्यामुळे दिलीप बापू धोत्रे यांच्याकडे सर्वसामान्यांना मदत करणारे नेतृत्व म्हणून पाहिले जाते.

### जनतेचा निर्धार पक्का

सध्या पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली रस्ते, वीज, पाणी आणि विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी तसेच बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी लवकरात लवकर एमआयडीसी उभा करणे, महिलांना सक्षम बनवण्यासाठी लघुउद्योग निर्माण करणे, शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी दिलीपबापू धोत्रे यासाठी कर्तृत्ववान आणि सर्वसामान्यांच्या नेतृत्वाला विधानसभेत पाठवण्याचा निवडून आणण्याचा निर्धार मतदारसंघातील नागरिकांनी केला आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जेऊरच्या विवान गरडची राष्ट्रीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ८ नोव्हेंबर-**

करमाळा तालुक्यातील भारत हायस्कूल जेऊर येथील विवान विनोद गरड याची छत्तीसगढ येथे होणाऱ्या १४ वर्षांखालील मुलांच्या गटात राष्ट्रीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. भारत हायस्कूल जेऊर हे हॅन्डबॉल खेळासाठी नामांकित विद्यालय आहे. विवानची राष्ट्रीय पातळीवर निवड सिद्ध केल्याने



करमाळ्याचा शिरपेचात मानाचा तुरा लावला आहे. त्यास क्रीडा शिक्षक जी.आर. पाटील, बी. सी. सरक आणि डी. बी. वाघमोडे यांचे मार्गदर्शन लाभले. विवान हा जेऊर ग्रामपंचायत सदस्य विनोद गरड यांचे चिरंजीव आहे. त्याच्या निवडीबद्दल संस्था अध्यक्ष नारायण आबा पाटील, उपाध्यक्ष अनिलकुमार गादीया, सचिव प्रा. अर्जनराव सरक, जेऊर गावचे सरपंच पृथ्वीराज पाटील तसेच मुख्याध्यापक ए.जी. सरोदे, उपमुख्याध्यापक कांबळे एन. डी.,पर्यवेक्षक शिंदे बी.एस. यांनी आणि त्याला मार्गदर्शन करणारे शिक्षकांचे अभिनंदन केले.



## स्वच्छ, सुंदरी वारी... नगरपरिषदेची जंगी तयारी

**कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर यंत्रणा कार्यान्वित; महिला-पुरुषांसाठी स्वतंत्र ५०० स्वच्छतागृहे**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ नोव्हेंबर-**

महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असलेल्या श्री. क्षेत्र पंढरपूर येथे १२ नोव्हेंबर रोजी कार्तिकी यात्रा भरत असून येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना चांगल्या सेवासुविधा पुरविण्याकामी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ, सुंदर वारीसाठी पंढरपूर नगरपरिषदेच्या यंत्रणेने मोठी तयारी केली आहे.

विविध कामांची पाहणी प्रशासक सचिन इथापे, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव व अधिकाऱ्यांनी केली. स्वच्छता, अतिक्रमणे काढणे, बॅरिगेटिंग करण्याबरोबरच १३ ठिकाणी पार्किंगची सोय, चंद्रभागा वाळवंटात पाण्याचे टँकर, जेटिंग मशीन, आरोग्य विभागाची वाहने जाणे-येणेसाठी जुना पूल ते पुंडलिक मंदीरापर्यंत रस्त्याची आखणी करण्यात आली आहे. तसेच पुंडलिक मंदीर ते दगडी पुलापर्यंत ९ हायमास्ट दिवे, प्रत्येक घाटासमोर २०० वॅट एलईडी दिवे, ६५ एकर भक्ती सागरमध्ये १२ युनिटमध्ये असलेल्या १ हजार ४०० शौचालयामध्ये विजेची व्यवस्था, भक्ती सागरसह वाळवंटामध्ये ७४ नळ, २४ तास अग्निशमन वाहने, मंदिराच्या दक्षिण बाजूस फायर हायड्रेट यंत्रणा, दर्शन बारी पत्रा शेडमध्ये पिण्याचे पाणी नळ, स्वच्छतागृहे, शहरात ६५ हातपंप, मंदिर परिसरातील १२ विद्युत पंपाद्वारे पिण्याचे पाणी देण्यात येणार आहे. स्वच्छतेसाठी १ हजार १०० सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती, ४१ घंटागाडी, चार टिपर, २ कॉम्पॅक्टर, १ डंपरप्लेसर, ४ डंपिंग ट्रॉली व जेसीबी असणार आहे. दररोज ८० ते १०० टन कचरा उचलण्यात येणार आहे. सर्वत्र व गर्दीच्या ठिकाणी कंटेनर सर्व्हे, औषध फवारणी व फॉगिंग मशीनद्वारे धूर फवारणी करण्यात येत आहे.



**कार्तिकी यात्रेमध्ये करण्यात आलेल्या विशेष बाबी**

- संपूर्ण पंढरपूर शहरातील पथदिव्यांवर एलईडीच्या माळ्याद्वारे सुशोभिकरण
- नवीन पूल, चंद्रभागा वाळवंटात लेझर लाईट
- प्रत्येक मुख्य चौकांमध्ये बसविण्यात आले वारकऱ्यांचे पुतळे
- प्रत्येक चौकांचे सुशोभिकरण
- प्री फॅब्रिकेट टॉयलेटस् लावून त्याची निगराणी, स्वच्छता राखणे
- ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट येथे शौचालयाच्या वापरासाठी वेगळी व्यवस्था करुन पाणी टँकरची सोय

## अक्कलकोट विधानसभेची मॉडेल मतदारसंघाकडे वाटचाल

**तीर्थक्षेत्र विकासाकरिता ३६५ कोटींच्या विकास आराखड्याला मंजुरी; उजनीच्या पाण्यामुळे सिंचन क्षेत्रात वाढ, ७० वर्षांत विकासकामे नाहीत, आता अडीच हजार कोटींची विकासकामे मार्गी**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तीर्थक्षेत्रासह अक्कलकोट विधानसभाक्षेत्र मॉडेल विधानसभाक्षेत्र म्हणून वाटचाल करीत आहे. विकसित होत आहे. महाराष्ट्रातील टेल एंड सीमवर्ती अक्कलकोट तालुक्याकडे गेल्या ७० वर्षात फार मोठे दुर्लक्ष झाले होते. गेल्या अडीच वर्षाच्या कालावधीत गेली ७० वर्षात जी विकासकामे मार्गी लागली नाहीत ती विकासकामे अडीच वर्षात मार्गी लागली आहेत. सुमारे अडीच हजार कोटींची विकासकामे प्रगतीपथावर आहेत. येत्या अडीच वर्षात अक्कलकोटचे चित्र मोठ्या प्रमाणात पालटलेले दिसेल. या विकासकामांच्या जोरावर अक्कलकोटची जनता पुन्हा एकदा विकासकामांची पोहच म्हणून भाजपालाच मोठ्या प्रमाणात विजयी करणार आहेत. महाराष्ट्रातही पुनश्च भाजपा-सेना-राष्ट्रवादी महायुती शासनाचीच सत्ता येणार असल्याचा ठाम विश्वास भाजपाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष तथा २५० अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे भाजपाचे उमेदवार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला.



२५० अक्कलकोट विधानसभा निवडणूक निमित्ताने पत्रकारांशी बोलताना आ. सचिन कल्याणशेट्टी बोलत होते. अक्कलकोट विधानसभा क्षेत्रात अडीच हजार कोटींच्या विकासकामांना मंजुरी मिळाली आहेत. अनेक विकासकामे प्रगती पथावर आहेत. मॉडेल विधानसभा विकसित क्षेत्र म्हणून अक्कलकोटची वाटचाल चालू आहे. ३६५ कोटींच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भाजपा-सेना-राष्ट्रवादी महायुती शासनाने मंजुरी दिली. ग्रामीण रुग्णालय श्रेणी वर्धन करुन वीस खाटावरून १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, मोठ्या प्रमाणातील तीर्थक्षेत्र विकासकामे, भूमिगत ड्रेनेज लाईन, अक्कलकोट शहरात पाणीपुरवठा नवी जलवाहिनी, नवीन बसस्थानक निर्मिती, मल्लिकार्जुन मंदिर जीर्णोद्धार, एकरुख उपसा सिंचन योजना, देगाव कालवा, न्यायालय नवीन इमारत, उत्तर पोलीस चौकी, दक्षिण पोलीससाठी नवीन पोलीस चौकी निर्मितीसाठी मंजुरी, अक्कलकोट शहरासाठी अमृत योजनेतून पाणीपुरवठाकरिता ७५ कोटी, मैंदर्गी, दुधनी नगरपालिका पाणीपुरवठा योजनाकरिता मंजुरी, अक्कलकोट तालुक्यात मोठ्या प्रमाणात रस्ते विकास, पूल बांधणीकरिता मंजुरी अशी अडीच हजार कोटींची विकासकामे चालू आहेत. कामे प्रगती पथावर आहेत.

**महायुती सरकारमुळे उजनीचे मिळाले पाणी**

गेल्या ७० वर्षांत अनेक योजना मार्गी लागल्या नाहीत. तालुक्याच्या विकासात महत्त्वाचे योगदान देणारे एकरुख उपसा सिंचन योजनेसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यतेसह मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध देण्याचे काम महायुती शासनाने केले. यामुळे उजनीचे पाणी कुरनूर धरणात पोहोचले. अनेक राष्ट्रीय महामार्ग मंजुरीमुळे तालुक्यात दळणवळणाचे मोठे जाळे निर्माण झाले. यामुळे विधानसभा निवडणुकीत भाजपालाच मोठ्या मताधिक्याने जनता पुनश्च निवडून देणार असल्याचा ठाम विश्वास आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला आहे.

## महिलांचा सर्वांगिण विकास करणे उद्दिष्ट

**अॅड. मीनल साठे : उसाचे ज्यादा दर सांगून विरोधकांकडून शेतकऱ्यांची फसवणूक**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ८ नोव्हेंबर-**

माढा विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार अॅड. मीनलताई साठे यांच्या प्रचारार्थ पंढरपूर तालुक्यातील रोपळे, नारायण चिंचोली, ईश्वर वठार येथे प्रचार सभा व रॅली संपन्न झाली. महिलांच्या सर्वांगिण विकासाचा नारा त्यांनी यावेळी दिला.

अॅड. मीनल साठे यांनी तालुक्यात उसाच्या भावावरून राजकारण केले जाते. परंतु आ. शिंदे यांनी जनतेची उसाच्या नावावर ३० वर्षांपासून फसवणूक केली आहे. अभिजीत पाटील यांना महायुती सरकारने कारखान्यासाठी शेकडो कोटी रुपयांची मदत केली असून त्या पैशावर कारखान्याचे कर्ज न फेडता ही निवडणूक पैशाच्या जोरावर जिंकण्याचा प्रयत्न करत आहेत व शेतकऱ्याची दिशाभूल करत आहेत.



आमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांनी सोलापूर जिल्ह्यात एकमेव लाडकी बहीण म्हणून अॅड. मीनलताई साठे यांना पक्षाची उमेदवारी दिली आहे. हा पक्षाने केलेला महिलांचा सन्मान आहे. नक्कीच या माढा मतदारसंघातून एक महिला आमदार म्हणून ताईच्या विजयासाठी आम्ही पक्षाचे सर्व पदाधिकारी प्रयत्न करणार आहे. **- वर्षाताई शिंदे, जिल्हाध्यक्षा, महिला राष्ट्रवादी कॉंग्रेस**

नारायण चिंचोली येथे प्रचार दौऱ्यानिमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला जिल्हाध्यक्षा वर्षाराणी शिंदे, अभिजित कोल्हे नवनाथ कोल्हे, अमोल हाडमोडे, अप्पा गुंड, समाधान बचुटे, महादेव बनसोडे, ईश्वर वठार येथे तानाजी हळणवर, सद्गुरू मेटकरी, सुनील तरंगे, अजिंक्य सरवदे, युवराज पाटील, संभाजी सरवदे तर रोपळे येथे रफिक मुलाणी, रघुनाथ शितोळे, अनिल नागटिळक यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.





## महायुती सरकारने सर्वसामान्यांना न्याय दिला : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ नोव्हेंबर-**

महायुती सरकारने सर्वसामान्य माणसाला न्याय देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, लेक लाडकी लखपती योजना, तीर्थदर्शन योजना, वयोश्री योजना अशा अनेक योजना सुरू केल्या. शेतकऱ्यांना साडेसात एचपीपर्यंत वीजबिल माफ केले आहे.

आता लाडकी बहीण योजनेत, ज्येष्ठांच्या निवृत्ती योजनेत वाढ करून एकवीसशे रुपये देण्यात येतील असे नमूद करत महायुतीच्या दहा कलमांची माहिती दिली. तसेच आचारसंहिता संपताच लाडकी बहीण योजनेचा डिसेंबर महिन्याचा हप्ता महिला भगिनींच्या खात्यात जमा केला जाईल असे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी सांगितले.

बार्शी शहरातील भगवंत मैदान येथे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची शिवसेना,भाजपा,राष्ट्रवादी कॉंग्रेस,आरपीआय (आ.) व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार राजेंद्र विठ्ठल राऊत यांचा प्रचारार्थ जाहीर सभा झाली, यावेळी ते बोलत होते. बार्शी तालुक्यातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी लागेल तेवढा निधी देऊ अशी ग्वाही दिली. त्याचप्रमाणे भगवंत तिर्थक्षेत्र विकास, बार्शी उपसा सिंचन योजना टप्पा-३, पाझर तलावांचे साठवण तलावात रूपांतर करणे, वैराग एमआयडीसी, उपळाई ठोंगे एमआयडीसी, वैराग येथील संतनाथ कारखान्याला मदत तसेच विविध विकासकामे करण्यासाठी मदत करण्यात येईल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



## सहकार महर्षिच्या ६३ व्या ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ नोव्हेंबर-**

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचा सन २०२४-२०२५ चा ६३ वा ऊस गळीत हंगाम शुभारंभ शुक्रवारी कारखान्याचे मार्गदर्शक संचालक विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

कारखान्याने गळीत हंगाम २०२४-२०२५ मध्ये ९ लाख मे.टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. सर्व मशिनरी गाळपासाठी सज्ज असून प्रतिदिवशी ८,५०० मे. टनापेक्षा जास्त ऊस गाळप करण्यासाठी ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणा भरलेली असून सर्व सभासद व बिगर सभासद यांनी नोंदीचा व बिगर नोंदीचा सर्व ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे असे आवाहन कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांनी केले.

याप्रसंगी अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील, संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षीरसागर, अमरदिप काळकुटे, गोविंद पवार, सुभाष कटके, जयदिप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक प्रकाशराव पाटील, रामचंद्रराव सावंत-पाटील, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक रणजित रणनवरे, कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, माजी संचालक सुरेश मेहेर, बाळासाहेब पवार-तरसे, भीमराव काळे, विजय माने-देशमुख, विजय हेगडे, महादेव घाडगे, मोहनराव लोंढे, धनंजय चव्हाण, राजेंद्र मोहिते, चांगदेव घोगरे, केशवराव ताटे, शिवाजी सिद, सुनिल एकतपुरे, महादेवराव चव्हाण, रामचंद्र चव्हाण, पांडुरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, दत्तात्रय चव्हाण, धनंजय सावंत, हर्षाली निंबाळकर उपस्थित होते.



## मीनलताई साठेंची लेक डॉ. कनिष्का प्रचाराच्या मैदानात

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ८ नोव्हेंबर-**

माढा विधानसभा महायुती राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवार अॅड. मीनलताई साठे यांच्या प्रचारासाठी त्यांची लेक डॉ. कनिष्का या मतदारसंघातील घरोघरी जाऊन आपल्या आईचा प्रचार करत आहेत.

आईने माढा नगरपंचायतीच्या माध्यमातून माढा शहरात केलेला विकास व विधानसभा निवडणुकीत निवडून आल्यानंतर माढा मतदारसंघात करणार असलेल्या विकासकामांचा जाहीरनामा मतदारापर्यंत पोचवत असून आपल्या आईला निवडून देण्यासाठी मतदारांना आवाहन करत आहेत. डॉ. कनिष्का यांना मतदारांकडून चांगला प्रतिसाद लाभत असल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक गावात मतदारांच्या घरी जाऊन महिलांशी, मुलींशी संवाद साधून या माढा मतदारसंघांमध्ये व माढा शहरांमध्ये ताईंनी केलेल्या विकासकामांचा आढावा या माध्यमातून सांगत आहेत. तसेच प्रत्येक कुटुंबातील महिला जेष्ठ मतदारांचा आशीर्वाद घेऊन या मतदारसंघातून महिला व मुलींचे सबलीकरण व सशक्तीकरण करण्यासाठी व महिला चूल आणि मूल या संकल्पनेतून बाहेर काढून महिलांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी अॅड. मीनलताईंना निवडून द्या असे आवाहन या माध्यमातून करत आहेत.

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर वाहनांची कडक तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील वागदरी-हिरोळी या मुख्य मार्गावर दोन्ही राज्यांचे अधिकारी रात्रंदिवस वाहनांची कडक तपासणी करत आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या कर्मचारी भाग्यवंती मंदिरासमोरील तात्पुरत्या शेडमध्ये कर्नाटकातून महाराष्ट्र राज्यात येणाऱ्या वाहनांची तपासणी केली जात आहे. संशयास्पद वाहनांचे चित्रीकरण केले जात आहे. एक ग्रामसेवक, दोन पोलीस हवालदार, पाच उत्पादन शुल्क अधिकारी, एक पोलिस निरीक्षक, एक एएसआय, एक कॅमेरामन अशा नऊ जणांचे पथक दोन शिफ्टमध्ये कार्यरत आहे. शेड, झाडाच्या सावलीत बसून वाहनांना बॅरिकेडद्वारे थांबवून वाहनांची तपासणी करत आहेत. ग्रामसेवक राजेंद्र कळमुसे, रतनसिंग चव्हाण, उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक शुभम अस्वार, एएसआय सुरेश चव्हाण, समर्थ हरणे, योगेश पाटील, सचिन भोसले, अक्षय उदागडे, समाधान राऊत, कॅमेरामन संदीप बिराजदार हे शुक्रवारी कर्तव्यावर होते.



तपासणीच्या नावाखाली कर्नाटकातील कर्मचारी वाहने थांबवून दंड वसूल करत आहेत. दंड वसूल अधिकार फक्त अधिकाऱ्यांनाच आहे असे असताना दोन पोलीस कर्मचारी वाहन थांबवून तपासणीच्या नावाखाली दंड आकारात आहे. वरिष्ठअधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन तपासणीच्या नावाखाली जनतेवर होणारा पिळवणूक थांबावा.
**- मोहन नवले, चालक**

## निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे

**निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे : राजकीय पक्ष, उमेदवारांच्या प्रतिनिधींची बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ नोव्हेंबर-**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणुकीची प्रक्रिया राबविली जात असून, २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात राजकीय पक्षाचे उमेदवार व अपक्षांनी आदर्श आचार संहितेचे पालन करुन, ही निवडणूक प्रक्रिया निर्भय, मुक्त आणि पारदर्शी पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

पंढरपूर विधानसभा मतदार संघातील राजकीय पक्षांच्या उमेदवारांच्या प्रतिनिधींची व अपक्ष उमेदवार, प्रतिनिधींची बैठक प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे घेण्यात आली यावेळी उमेदवार व उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी इथापे म्हणाले, दिनांक १० ते १४ नोव्हेंबर या कालावधीत बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट मशीन उमेदवारांची नावे व चिन्हांसह तयार करण्यात येतील.या प्रक्रियामध्ये उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी हजर रहावे. ईव्हीएम संदर्भात कोणती शंका राहू नये यासाठी पारदर्शक पद्धतीने कामकाज केले जाईल तसेच याबाबतची माहिती पुस्तिका सर्व उमेदवारांना देण्यात आली. तसेच अशा प्रकारे तयार मशीन्स स्ट्रॉगरूमला सीसीटीव्ही कॅमेरा व सुरक्षा रक्षकांच्या



निगराणीखाली सुरक्षितपणे ठेवल्या जातील. दिनांक १४, १५ व १७ नोव्हेंबरला दिव्यांग आणि ८५ वर्षावरील वृद्धांचे घरी जाऊन मतदान घेतले जाईल. यामध्ये मतदान अधिकारी व त्यांच्यासोबत उमेदवारांचे प्रतिनिधी असतील. उमेदवारांना हा कार्यक्रम तसेच यादी आगाऊ दिली जाईल.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निवडणूक प्रक्रिया पार पडावी यासाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी सहकार्य करावे. उमेदवार आणि उमेदवारांच्या प्रतिनिधींनी प्रचारासाठी नियमाप्रमाणे परवानगी घ्यावी. सभा, पदयात्रा, रॅलीबाबत निर्धारित वेळ पाळावी. उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासूनच्या खर्चाचा दैनंदिन लेखा त्यांना उपलब्ध करून दिलेल्या विहित नमुन्यातील नोंदवहीमध्ये नियमितपणे लिहावा. तसेच मतदानापूर्वी तीन वेळा होणाऱ्या निवडणूक खर्च तपासणी प्रसंगी याबाबतचे रजिस्टर लेखे सादर करावेत.

**उमेदवारांनी ही घ्यावी काळजी**

बॅनर, पोस्टर, पत्रके आदी प्रचार साहित्यांवर मुद्रकाचे व प्रकाशकाचे नाव प्रतींची संख्या छापावी. तसेच ज्या उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे, अशा उमेदवारांनी त्याबाबत मतदानापूर्वी तीनवेळा वृत्तपत्र, वृत्तवाहिनीवर जाहिरात प्रसिद्ध करावी. मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधींना चांगल्या प्रकारे प्रशिक्षण व ओळखपत्र याबाबतही सूचना यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी इथापे यांनी दिल्या.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तुळजाभवानी मंदिरात दर्शन रांगेतून ४० हजारांची बोरमाळ चोरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ नोव्हेंबर -**

तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी आलेल्या महिलेच्या गळ्यातील ४० हजार रुपये किमतीची सोन्याची बोरमाळ अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना ७ नोव्हेंबर रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या सुमारास निंबाळकर दरवाज्यासमोरील होमच्या ठिकाणी घडली.

विजया नंदकुमार हत्तीकर (वय ५७, रा. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली) यांनी याप्रकरणी तुळजापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यांच्या फिर्यादीनुसार, त्या दर्शनासाठी रांगेत उभ्या असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील बोरमाळ चोरून नेली.



या बोरमाळेमध्ये ३५ मणी असून तिचे वजन ६ ग्रॅम आहे. बोरमाळेची किंमत ४० हजार रुपये असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मात्र, अद्याप चोरटा हाती लागलेला नाही. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे का, याचा तपास पोलिस करत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### कदम यांना कामधेनू सेवा पुरस्कार

**तेर, दि.८ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुरेखा कदम यांना कामधेनू सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कामधेनू सेवा परीवार शाखा भातागळी (ता. लोहारा) यांच्या वतीने तेर येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुरेखा कदम यांना शैक्षणिक सेवा कार्याबद्दल कामधेनू सेवा पुरस्कार हभप. महेश महाराज कानेगावकर, कामधेनू सेवा परीवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. लक्ष्मण आसबे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

### सुशीला केसकर यांचे निधन

**धाराशिव, दि.८ नोव्हेंबर -**



शहरातील जुनी गल्लीतील रहिवाशी सुशीला शिवाजीराव केसकर (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने गुरूवार, ७ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरूवारी रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, असा परिवार आहे. पत्रकार रवींद्र केसकर यांच्या त्या मातोश्री होत.

# चौगुलेंच्या विजयाचा गुलाल उधळायला २३ तारखेला नक्की येणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन...





**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ नोव्हेंबर -**

महायुतीच्या सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू केली आणि महाविकास आघाडीच्या पोटात दुखू लागले. ते आमच्या विरोधात कोर्टात गेले. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने चांगलीच थोबाडीत दिली. लाडक्या बहिणींच्या मुलांच्या तोंडचा घास पळविण्याचे काम महाविकास आघाडी करीत असल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला आहे.

महायुतीमधील शिवसेनेचे उमेदवार ज्ञानराज चौगुले यांच्या प्रचारासाठी उमरगा येथील जुन्या जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात झालेल्या सभेत ते म्हणाले, आम च्या सरकारने आणलेल्या योजनाच त्यांनी ढापल्या आहेत. एकीकडे आम्ही आणलेल्या योजनांना विरोध करायचा, दुसरीकडे आम च्या योजना स्वतःच ढापायच्या, असा हा प्रकार आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या विरोधात हीच मंडळी न्यायालयात गेली होती. आता नाव बदलून ते ही योजना देऊ पहात आहेत.ते फेक नरेटिव्ह पसरवणारे आहेत. आमचे सरकार प्रिंटिंग मिस्टेक वालेनाही, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली.

यावेळी माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, माजी सभापती जितेंद्र शिंदे, भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉ.चंद्रकांत महाजन, माजी जि.प. सभापती अभय चालुक्य, युवा सेना मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड, भाजपा तालुकाध्यक्ष शाहजी पाटील, भाजपा जिल्हा उद्योग आघाडी अध्यक्ष श्रीकांत मणियार, भाजपाचे दिलीप गौतम, माजी सभापती हरीश डावरे, शेतकरी सेना विलास भगत, संतोष सगर, माजी सभापती मदन पाटील, सुभाष सोनकांबळे, सुधाकर महाराज, माधव पवार, राहुल पाटील, अरुण इगवे, सुशिल दळगडे, दत्ता पाटील, युवराज जाधव, बाळासाहेब किस्से, ॲड. वैजीनाथ आडसकर, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पनुरे, सिद्रामप्पा चिंचोळे, प्रा. शौकत पटेल आदी उपस्थित होते.

शिंदे म्हणाले मी शेतकरी कुटुंबातून आलेला आहे. शेतकरी, गरिबांच्या वेदनांची जाणीव मला आहे. तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्मलेल्यांना दीड हजाराची किंमत काय कळणार? कल्याणकारी योजनांना विरोध करणारी ही मंडळी त्यांचे सरकार सत्तेत आल्यास आम्हाला जेलमध्ये टाकू असे म्हणत आहेत.

शेतकरी बहिणींसाठी दहा वेळासुद्धा जेलमध्ये जायला आम्ही तयार आहोत. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार, विकासाच्या मारेकऱ्यांना कायम घरी बसवणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी गुंजोटीचे माजी सरपंच विलास व्हटकर, महिला आघाडी तालुकाप्रमुख उबाठा तथा पंचायत समिती सदस्य उमरगा, माजी पंचायत समिती सदस्य उमरगा विष्णू पाटील, जितेंद्र पोतदार, विभाग प्रमुख उबाठा महादेव म्हात्रे बलसुर, माजी सरपंच जेकेकुर दत्ता पाटील, आकाशराजे कांबळे, बळीराम मोरे यांनी शिवसेना शिंदे गटामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे च्या उपस्थितीमध्ये प्रवेश केला.

या प्रसंगी महायुतीचे कार्यकर्ते पदाधिकारी मतदार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

### मेंढा येथे एक दीप शहीदो के नाम कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील मेंढा येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी एक दीप शहीदो के नाम कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात गावातील शेकडो तरुण महिला सहभाग घेतला. गावातील तरुण एकत्र येत कार्यक्रमासाठी वर्गणी करून गोळा करुन शहीद उमेश पांडुरंग जावळे यांच्या स्मरणार्थ आयोजित केला जातो.

# हे सरकार शेतकऱ्यांचे नाही, तर उद्योगपतीच्या हिताचे

## आमदार कैलास पाटील यांचा घणाघात...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ नोव्हेंबर -**

शेतकरी देशोधडीला लागला तरी हे सरकार उद्योगपतीचेच हित बघताना दिसत आहे. सोयाबीनचे दर वाढले पण डीओसी आयात करून शेतकऱ्यांपेक्षा यांना कोंबडया महत्वाच्या वाटू लागल्यात आता मत पण कोंबड्यानाच मागा असा टोला आमदार कैलास पाटील यांनी सरकारला लगावला. धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास पाटील यांनी बारातेवाडी येथे प्रचारार्थ जाहीर सभा घेतली. या सभेत बोलताना त्यांनी सत्ताधारी महायुती सरकारवर शेतकरी विरोधी धोरणांचा आरोप केला.

आ. पाटील म्हणाले, गेल्या अडीच वर्षांत महायुती सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत आहे. केंद्रातील मोदी सरकारने सोयाबीन तेलाची आयात केल्यामुळे सोयाबीनचे बाजारभाव गडगडले असून, आजचे दर फक्त चार हजार रुपये प्रति क्विंटलपर्यंत खाली आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे.

दुधाचे दरही कमी असल्यामुळे पशुधन जोपासणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही, असेही त्यांनी सांगितले.

महायुती सरकारवर टीका करताना ते म्हणाले की, एका बाजूला लाडक्या बहिणींना दीड हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले जात असताना, दुसऱ्या बाजूला त्याच पैशांच्या वसुलीची प्रक्रिया सुरु आहे. कांद्याच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आल्यामुळे कांद्याचे दरही



घसरले असल्याचा मुद्दा आ. पाटील यांनी मांडला. त्यांनी हेही अधोरेखित केले की, शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन महायुती सरकारने पूर्ण केले नाही.

मात्र, महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाईल, असे आश्वासन आमदार पाटील यांनी दिले. यावेळी उपजिल्हाप्रमुख विजयकुमार सस्ते, हनुमंत आव्हाड, रामलिंग आव्हाड, तुषार वाघमारे, रामहरी बाप्पा मुंडे, नेताजी जावळे, भारत सांगळे, सागर बाराते, संदीप पायाळ, सुनील पाटील, श्याम देशमुख, प्रशांत धोंगडे, कांबळे, खंडू भातलवंडे, अनिल पवार, चरण पाटील मारुती देशमुख, राहुल पाटील, बालाजी भातलवंडे, विलास थोरबोले, समाधान बाराते, दिलीप बाराते, अक्षय बाराते, भाऊसाहेब ताकमोगे, उमेश बाराते आदीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नगर पालिकेचा दुटप्पीपणा
## आ.कैलास पाटील यांचे बॅनर हटविले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ नोव्हेंबर -**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महायुतीचे उमेदवार यांच्या प्रचारासाठी शुक्रवारी धाराशिव शहरात आले होते. दरम्यान आ. कैलास पाटील यांचे सर्व परवानग्यासह शहरातील मुख्य रस्त्यावरील पोलवर प्रचाराचे बॅनर लागले होते. हे विरोधी गटाचे मुख्यमंत्री यांच्या नजरेस पडू नये यासाठी धाराशिव नगरपालिकेने ते काढून टाकले, असा आरोप न.प. चे गटनेते सोमनाथ गुरव यांनी केला आहे. यातून नगरपालिकेचा दुटप्पीपणा दिसून आला असल्याची चर्चा दिवसभर शहरवासियांतून चर्चिली जात होती.

सध्या विधानसभेचा प्रचार जोरात सुरु आहे. शहरात विविध ठिकाणी आ.कैलास पाटील यांचे प्रचाराचे बॅनर लावण्यात आले होते. त्यासाठी सर्व विभागांच्या परवानग्या घेण्यात आल्या होत्या. महायुतीचे उमेदवार यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री शिंदे धाराशिव शहरात येणार असल्याचे माहिती होताच नगरपालिकेकडून राजकीय दबावापोटी हे बॅनर काढून टाकण्यात आल्याचे गुरव यांनी म्हटले आहे. यानंतर शिवसेना उबाठा गटाच्या वतीने काढण्यात आलेले बॅनर परत बसविण्यात आले. मात्र, रितसर सर्व परवानग्या असताना नगरपालिकेने ही केलेली दुटप्पीपणाची वागणूक यामुळे लोकशाहीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे असल्याचेही ते म्हणाले.

# तानाजीरावांना आमदार करा; नामदार मी करतो : मुख्यमंत्री शिंदे

## तुमचे हक्काचे ७ पीएमसी पाणी गुढीपाडव्याला सिना-कोळेगाव धरणात पडणार...




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ नोव्हेंबर -**

२४३ परंडा-भूम-वाशी विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी, आरपीआय महायुतीचे अधिकृत उमेदवार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या प्रचारार्थ परांडा येथे दि.८ नोव्हेंबर शुक्रवार रोजी महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांची महाविजय संकल्प जाहीर सभा दुपारी पार पडली. यावेळी विराट अशा सभेत बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले तानाजीराव सावंत म्हणजे जादूगर, त्यांना आमदार तुम्ही करा नामदार मी करतो, हे प्रचाराची नाही तर तानाजीराव सावंत यांच्या महाविजयाची सभा आहे, असे उदगारही मुख्यमंत्री शिंदे यांनी काढले.

महायुतीचे उमेदवार तानाजी सावंत यांनीही उपस्थित मतदारांना मार्गदर्शन केले व मला म तदारसंघाचा विकास करण्यासाठी प्रचंड मतांनी विजयी करावे असे आव्हान केले.

यावेळी व्यासपीठावर शिवसेना महायुतीचे उमेदवार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत, भाजपचे नेते तथा विधान परिषदेचे माजी आम दार सुजितसिंह ठाकुर, माजी जि.प. उपाध्यक्ष धनंजय सावंत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख दत्ता साळुंके, शिवसेना जिल्हासह संपर्क प्रमुख प्रा. गौतम लटके, सुभाषराव मोरे, सुभाषसिंह सद्दीवाल, आरपीआयचे संजय बनसोडे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, भाजपाचे तालुकाध्यक्ष गणेश खरसडे, भाजपाचे शहराध्यक्ष उमाकांत गोरे, भाजपाचे तालुका सरचिटणीस धनंजय गायकवाड, शिवसेना तालुकाप्रमुख अण्णासाहेब जाधव, शिवसेनेचे युवक तालुका अध्यक्ष कंडारीचे सरपंच राहुल डोके, शिवसेना तालुका संघटक जयदेव बाप्पा गोफने, पंचायत समितीचे माजी सदस्य गुलाब शिंदे, माजी नगराध्यक्ष जाकिर सौदागर, माजी नगरसेवक रत्नाकांत पापा शिंदे, वाजिद दखनी, संजय घाडगे, आरपीआयचे उत्तम ओव्हाळ आदींची उपस्थिती होती.

## विरोधकांवर शिंदेंचा घणाघात...



यावेळी पुढे बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, या मतदारसंघाचा ३५ वर्षाचा बॅकलॉग भरून काढा, मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

तर तुमचे हक्काचे ७ पीएम सी पाणी गुढीपाडव्याला सिना कोळेगाव धरणात पडणार म्हणजे पडणारच असे आश्वासन त्यांनी दिले. वाघाचे कातडे पांघरल्याने कोणी लांडगा वाघ होत नाही. योजना राबवण्यासाठी आणि पैसे आणण्यासाठी मनगटात बळ असावे लागते असा टोलाही विरोधकांना मुख्यमंत्री शिंदे यांनी लगावला आहे.

महायुतीला सरकारला पुन्हा संधी द्या, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विराट जनसम दायाला केले आहे.

# आ.ज्ञानराज चौगुले यांना गावागावात उत्स्फूर्त प्रतिसाद

## आमदार ज्ञानराज चौगुले यांचा येळी, काटेवाडी, चिंचोली भू., जगदाळवाडी, पारसखेडा, गुरुवाडी येथे गावभेट दौरा संपन्न





**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ नोव्हेंबर -**

उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघातील बदलत्या परिस्थितीचे आपण सर्वजण साक्षीदार आहात. मागील १५ वर्षाच्या काळात मतदारसंघातील प्रत्येक अडचण समजुन घेत अनेक अडचणी मार्गी लावण्यासाठी मी प्रमाणिक प्रयत्न केले आहेत. म तदारसंघातील विकास कामासाठी हाजारो कोटी रुपये खेचून आणत दर्जेदार कामे करून घेतली आहेत. अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत, या सर्व निधीचाही योग्य वापर व्हावा यासाठी तालुक्यातील म ायबाप जमतेने मला पुन्हा संधी द्यावी असे आवाहन आ. ज्ञानराज चौगुले यांनी केले.

यावेळी पुढे बोलताना चौगुले यांनी सांगितले की, उमरगा-लोहारा मतदारसंघातील येळी, काटेवाडी, भुयार चिंचोली, जगदाळवाडी, गुरुवाडी, पारसखेडा परिसरातील अशा अनेक मोठ्या रस्त्यासाठी मी प्रमाणिक प्रयत्न करीत हाजारो कोटी निधी खेचून आणलेला आहे. हे सगळे रस्ते दर्जेदार करुन घेण्यासाठीच तसेच भविष्यातही आणखी खूप काम करायचे आहे. येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणावर सिंचनाची कामे करायची आहेत. यातून तालुक्यातील शेतकरी सदन झाला पाहिजे हेच आपले स्वप्न असल्याचे त्यांनी सांगितले.

या मेळाव्याला येळी येथील विठ्ठल साई साखर कारखाना संचालक शिवलिंग आप्पा माळी, सरपंच निवृत्ती पवार, उपसरपंच रामलिंग बिराजदार, पतंग पवार शहाजीकर येळेकर, व्यंकट म ाशाळकर, संतोष माळी, विजय सजगुरे, बाळासाहेब मोरे, मदार शेख, लक्ष्मण कांबळे, गुलाब शेख, अमोल कांबळे, बाळू मोरे, राम कांबळे, शोभा जाधव, रत्नकला स्वामी, शैलजा बिराजदार, भालचंद्र भोसले, लक्ष्मण मारकड, अर्जुन भोसले, विकास गोरुळे, सतीश भोसले, अविनाश गोरुळे, चंद्रकांत सूर्यवंशी, गणेश पाटील, भीम पाटील, गजानन भोसले, म ुकिंद भोसले, रत्न मारकड, नितीन भोसले, किसन भोसले, फुलचंद पाटील, प्रदीप सूर्यवंशी, अरुण भोसले, देविदास मारकड, मधुकर मुगळे, शिवाजी भोसले, भगवान साठे, श्रावण वाकळे, राजेंद्र साठे, गुंडराव इंगोले, लालडेसाळ मुल्ला, सुधाकर जाधव, आशिष गोरुळे, उर्मिला साठे, विमलबाई मुगळे, सारिका गोरुळे, सोनाली पाटील, सुमन गोरुळे, पुष्पा सूर्यवंशी, अर्चना भोसले, बबीता भोसले, दलिंताबाई भोसले, सविता वाकडे, मनीषा गोरुळे, सुनीता मारकड, मनीषा मारकड, रणजीत गायकवाड, दत्ता चौधरी, इंद्रजीत गायकवाड, विजय पाटील, महादेव गायकवाड, प्रमोद गायकवाड, रुद्रप्पा लाकडे, राजेंद्र झोंमगे, नेताजी गायकवाड, भालचंद्र भोसले, आनंद गायकवाड, कुमार गायकवाड, बबन गायकवाड, गुलचर पठाण, नवनाथ गायकवाड, अशोक गायकवाड, बाबुराव त्रिकोळे, व्यंकट गायकवाड, दत्ता गायकवाड, बलभीम गायकवाड, जगन्नाथ गायकवाड, भास्कर झोंमदे, जगदीश कांबळे, राम कांबळे, राम गायकवाड, अशोक शिंदे, निखिल शिंदे, उत्तम शिंदे, राहुल थोरे, शंभू गायकवाड, अर्जुन कांबळे, आकाश कांबळे, संदीप कांबळे, प्रकाश कांबळे, राहुल कांबळे, शंकर गायकवाड, केशव सुरवसे, बलभीम कांबळे, संभाजी गायकवाड, सरपंच श्रीराम जगदाळे, तंटामुक्त अध्यक्ष सुधाकर जगदाळे, अजय मोरे, अनंत नामदेव हाक्के, प्रकाश जगदाळे, विलास चव्हाण, गुंडू मुगळे, दाम ोदर चव्हाण, सुरज चव्हाण, लखन खैरे, विठोबा जगदाळे, किसन चव्हाण, खंडू चव्हाण, तुकाराम शिंदे, माणिक चव्हाण, बाजीराव जगदाळे आदींसह परिसरातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व मतदार उपस्थिती होती.

# तुळजापुर विधानसभा मतदारसंघातील ७३ हजार ३०७ लाडक्या बहिणींची मते कुणाच्या पारड्यात?

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.८ नोव्हेंबर -**

तुळजापुर विधानसभा मतदार संघातील ७३ हजार ३०७ लाडक्या बहिणी कुणाच्या पारड्यात आपले मतदान टाकतात यावर या मतदार संघातील कोणत्या पक्षाचा आमदार होणार हे अवलंबुन आहे. सध्या तरी लाडक्या बहिणींचा कल हा महायुतीकडे असल्याचे दिसुन येत आहे.

या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र सरकारने नव्याने सुरु केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणही योजना महायुतीसाठी गेमचेंजर ठरणार असल्याचे दिसुन येत आहे. कारण ही योजना राज्यातील महायुतीच्या सरकारने सुरु केली आहे. ही योजना सुरु केल्यानंतर महाविकास आघाडीचे नेते या योजनेवर शंका उपस्थित करुन ही योजना बंद पडणार असे वक्तव्य करू लागले होते.

मात्र या निवडणुकीत ही योजना महायुतीसाठी फायदेशीर ठरत असल्याचे पाहुन महाविकास आघाडीने आपल्या जाहीरनाम्यात महिलांसाठी दरमहा ३ हजार रुपये देणारी महालक्ष्मी योजना सुरु करणार असल्याचे म्हटले आहे त्याचबरोबर महिलांसाठी मोफत बस प्रवास योजना सुरु करण्याचे आश्वासनही त्यांच्या जाहीरनाम्यात दिले आहे.

तुळजापुर विधानसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. धीरज पाटील यांच्यात अतिशय तुल्यबळ लढत होत असल्याचे दिसुन येत आहे.

त्यामुळे या मतदार संघात महायुतीच्या उमेदवाराला लाडक्या बहिणींचे मतदान तारणार का? की लाडक्या बहिणींचे मतदान आणखी कुणाच्या पारड्यात पडणार हे पाहणे गरजेचे आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मुस्लिम व मागासवर्गीय मतदारांनी तारले होते.

महायुतीच्या परभवाला हा फॅक्टर कारणीभुत ठरला होता.



त्यामुळे विधानसभा निवडणुकीत धोका होऊ नये यासाठी राज्यातील महायुतीच्या सरकारने महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना सुरु करुन या योजनेतील पात्र प्रत्येक महिलांच्या खात्यावर पाच महिन्यांचे ७ हजार ५०० रुपये जमा केले आहेत.

त्यामुळे महायुती सरकारवर लाडक्या बहिणी जाम खुश आहेत. आता या खुशीचे रूपांतर मतदानामध्ये किती होते यावर महायुतीच्या विजयाची भिस्त आहे.

तुळजापुर विधानसभा मतदार संघात १ लाख ८२ हजार ४५ इतके महिलांचे मतदान आहे, यापैकी ७३ हजार ३०७ इतके मतदान लाडक्या बहिणींचे आहे. या लाडक्या बहिणींच्या मतदानावरच या मतदार संघातील महायुतीच्या उमेदवाराच्या विजयाची भिस्त आहे.

महाविकास आघाडीनेही महिलांना खुश करण्यासाठी महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर महिलांसाठी महालक्ष्मी योजना सुरु करणार असल्याचे आपल्या जाहीरनाम्यात म्हटले आहे.त्यामुळे महिलांचे विशेष करून लाडक्या बहिणींचे मतदान कुणाकडे जाणार यावर विजयी उमेदवार ठरू शकतो.

त्यामुळे या मतदार संघात महायुतीचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, महाविकास आघाडीचे ॲड. धीरज पाटील या प्रमुख उमेदवारांनी आपले लक्ष महिला मतदानावर केंद्रीत केले आहे.

त्यामुळे महिलांचे मतदान या निवडणुकीत कुणाला तारणार व कुणाला मारक ठरणार हे निवडणुक निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

# माळी मोबाईलमध्ये दिवाळीनंतरही ऑफर

## विजेत्यास मोटारसायकल जिंकण्याची सुवर्णसंधी...

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.८ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील माळी बंधूच्या, माळी मोबाईल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक भव्य शोरूममध्ये अनेक प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू व विविध कंपन्यांचे मोबाईल एकाच छताखाली मिळत आहेत. ग्राहकांच्या आग्रहास्तव दिवाळीनंतरही दिवाळीच्या ऑफर चालू आहेत. यामुळे ग्रामीण भागातील ग्राहकांनी या मोटारसायकल जिंकण्याच्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. या इलेक्ट्रॉनिक व मोबाईल शोरूममध्ये फ्रीज, डी फ्रीज, वाशिंग मशिन, एलईडी टीव्ही, मोबाईल, कुलर, पाणी फिल्टर आदी इलेक्ट्रॉनिक




साहित्य एकाच ठिकाणी मिळत आहेत. माळी मोबाईल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक दुकाना तर्फे दिवाळीनिमित्त सण एक ऑफर अनेकची ग्राहकांना यंदा खास ऑफर दिली असून या दुकानातून वस्तू खरेदी करणाऱ्या प्रत्येक ग्राहकांना लकी ड्रॉ कुपन दिले जाणार असून या कुपनद्वारे प्रथम बक्षिस हिरोची एच.एफ. १०० मोटरसायकल, द्वितीय बक्षीस वाशिंग मशिन, तृतीय बक्षीस एलईडी टिव्ही, चतुर्थ बक्षीस कुलर, पाच नंबर बक्षीस ते वीस नंबर बक्षीस प्रत्येकी ५००० किंमतीची पैठणी आदी आकर्षक बक्षिसांची ऑफर देण्यात आली आहे.

माळी मोबाईल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्समध्ये सण एक ऑफर अनेक या दिवाळी ऑफर्सच्या माध्यमातून प्रत्येक खरेदीवर ग्राहकांना आकर्षक भेटवस्तू दिली जात आहे. त्यामुळे प्रत्येक खरेदीवर लकी ड्रॉ कूपन आणि आकर्षक भेटवस्तू मिळणार आहे. फायनान्सद्वारे कमीत कमी मासिक हप्ताचीही सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

माळी मोबाईल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स शोरूमचा दिवाळी धमाका ऑफर, व लकी ड्रॉ मेळाव्याचा लाभ ग्राहकांनी घ्यावा, असे आवाहन दुकानाचे मुख्य व्यवस्थापक लक्ष्मण माळी यांनी केले आहे.

# निसर्गप्रेमी करतायेत टँक्टरच्या पाण्यावर झाडांचे संवर्धन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ नोव्हेंबर -**

शहराच्या मुख्य रस्त्यावरील दुभाजकात लावण्यात आलेल्या झाडांना जगविण्यासाठी निसर्गप्रेमी ग्रुपच्या सदस्यांनी पुढाकार घेतला आहे.

ग्रीन उमरगा करण्याचे स्वप्न मनी बाळगणाऱ्या या निसर्ग प्रेमी मंडळीनी जीवापाड जपलेली झाडे सुकू नयेत या करिता गुरुवारी स्वखर्चातून टँकरने पाणी देऊन झाडे जगविण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. उमरगा येथील निसर्गप्रेमी ग्रुपच्या वतीने ग्रीन उमरगा करण्याचा संकल्प केला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून या ग्रुपच्या वतीने शहरातील रस्त्यावर असलेल्या दुभाजकावर, शाळा, महाविद्यालय परिसर सार्वजनिक



खुल्या जागा, शासकिय निमशासकिय रुग्णालये या विविध सार्वजनिक ठिकाणी वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाचा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमा अंतर्गत जवळपास पाच हजार झाडे लावण्यात आली आहेत. विशेष म्हणजे या झाडांचे संवर्धन निसर्ग प्रेमी मंडळी कडून केले जात आहे.

गेल्या पंधरा दिवसापासून शहर आणि परिसरात पावसाने ओढ दिल्या मुळे लावण्यात आलेली व वाढीस लागलेली डोलणारी झाडे पाण्या अभावी सुकून जाऊ नयेत या साठी या ग्रुपच्या वतीने झाडांना टँकरने पाणी देऊन संजीवनी दिली जात आहे.

या उपक्रमात स्त्रीरोग तज्ञ डॉ. लक्ष्मण सातपुते, डॉ. उदयसिंह मोरे, सुशिल दळगडे, ॲड. अरुण सुर्यवंशी, महेश कवठे, सचिन खमितकर, सचिन माशाळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत भराटे, डॉ. तानाजी दुधभाते, राहूल शिंदे, ॲड. वैभव जाधव, संदीप पांचाळ, श्रीकांत भोसले, रवि अंकलकोट्टे, राहूल पोतदार, गणेश माने, राहूल पोतदार आदि सह निसर्ग प्रेमी मित्र मंडळाचे सर्व सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत.

# राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार डॉ. राहुल घुले यांची परंडा येथे प्रचार रॅली



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ नोव्हेंबर -**

२४३ परंडा विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रीय समाज पक्षाचे अधिकृत उमेदवार आरोग्य दूत डॉ. राहुल भीमराव घुले यांनी दि.७ नोव्हेंबर गुरुवार रोजी सांयकाळी ७ वाजता परंडा शहरात प्रचार रॅली काढून प्रचारात चांगलीच रंगत आणली आहे. शहरातील विविध मार्गावरून ही रॅली काढण्यात आली.

'जनतेच्या आरोग्यासाठी' भूम-परंडा-वाशीतील कोणत्याही नागरिकाला ऑपरेशनची गरज पडली तर कोणत्याही प्रकारचे मोठे ऑपरेशन मोफत करून देणार, भूम-परंडा-वाशी येथे १०० बेडचे अत्याधुनिक रुग्णालय स्थापन करणार, भूम येथे बी.ए.एम.एस कॉलेज, नर्सिंग कॉलेज, डी. फॉर्मसी कॉलेज सुरु करणार, तरुणांसाठी भूम-परंडा-वाशी मधील सुशिक्षित किंवा अल्पशिक्षित बेरोजगार तरुणांना तात्काळ रोजगार उपलब्ध करून देणार, एम.आय.डी.सी. नवीन उद्योग आणून या भागातील तरुणांना येथेच रोजगाराची संधी उपलब्ध करून देणार, शेतकऱ्यांसाठी दुधाला १० रुपये भाव वाढ मिळवून देण्यासाठी १००% प्रयत्न करणार, सोयाबीनला व इतर शेतमालाला जास्त भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असे जाहीरनाम्यात सांगण्यात आले आहे.

यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे पदाधिकारी व मतदार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणूक निरीक्षक गोपाल चंद यांची माध्यम कक्षाला भेट

## समाज माध्यमांवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देश...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ नोव्हेंबर -**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय येथे कार्यरत असलेल्या माध्यम कक्षाला आज ८ नोव्हेंबर रोजी भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक (सामान्य) गोपाल चंद यांनी भेट दिली.

माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी तथा जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांनी चंद यांचे स्वागत करून माध्यम कक्षाच्या आणि या कक्षाअंतर्गत कार्यरत असलेल्या माध्यम प्रमाणीकरण व माध्यम संनियंत्रण समितीच्या कामकाजाची माहिती दिली. यावेळी समितीचे उपाध्यक्ष तथा उपजिल्हाधिकारी संतोष भोर प्रामुख्याने उपस्थित होते. माध्यम कक्षात लावण्यात आलेल्या टीव्हीच्या माध्यमातून विविध वृत्तवाहिन्यांमध्ये जिल्ह्यातील प्रसारित होणाऱ्या बातम्यांवर देखरेख करण्यात येत असल्याचे सांगून खडसे माहिती देतांना म्हणाले, बातम्यांची नोंद घेऊन दखलपात्र वृत्त वरिष्ठांच्या लक्षात आणून देण्यात येते. माध्यम कक्षातून समाज माध्यमांवर देखील समाज माध्यम चमुकडून देखरेख करण्यात येत आहे. कोणत्याही उमेदवारांच्या आक्षेपार्ह पोस्ट कोणी करणार नाही याबाबत प्रसिध्दी माध्यमातून पूर्वकल्पना देण्यात आली असून आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्यावर कठोर कारवाई सायबर सेलच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे खडसे



यांनी सांगितले. उपजिल्हाधिकारी तथा समितीचे उपाध्यक्ष भोर यांनी एमसीएमसी समिती अतिशय दक्ष राहून उमेदवारांच्या व्हिडिओ व ऑडिओ प्रचारविषयक बाबींचे बारकाईने व काटेकोरपणे तपासणी करून त्यानंतरच त्यांना प्रचारविषयक प्रसारण प्रमाणपत्र देण्यात येते तसेच पेडन्यूजवर देखील समितीचे लक्ष असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माध्यम कक्षाचे प्रा.बी.एस उडचण, प्रा. संतोष भांडेकर, सहकार अधिकारी अमोल सोलणकर, परीविक्षा अधिकारी अरविंद थोरात, व्यंकट देवकर, अतुल कुलकर्णी, नंदू पवार, ए.एस.कस्तुरे, शिक्षक सुनील माळी, संदीप उंडे, विनोद जानराव, प्रमोद राऊत, कविता राठोड, चित्रा घोडके, शैलेश खारगे, अनिल वाघमारे व श्रीकांत देशमुख यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.



# अध्यात्मिक प्रवचनास नळदुर्गमध्ये भक्तीमय वातावरणात प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ नोव्हेंबर -**

सुक्षेत्र नळदुर्ग येथील राजगुरू श्री शिवलिंगेश्वर हिरेमठ निर्विकल्प समाधीस्त राजगुरू श्री. ष. ब्र. १०८ शिवलिंगेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पुण्यस्मरणोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या अध्यात्मिक प्रवचनास दि.७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.३० वा. मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात प्रारंभ करण्यात आले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी कार्यक्रम स्थळी भेट देऊन महाराजांचे आशिर्वाद घेतले.

नळदुर्ग येथील राजगुरू श्री शिवलिंगेश्वर हिरेमठ निर्विकल्प समाधीस्त राजगुरू श्री.ष.ब्र. १०८ शिवलिंगेश्वर शिवाचार्य महास्वामीजी पुण्यस्मरणोत्सवा निमित्त दि.७ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत या मठाचे मठाधीपती श्री.ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली आध्यत्मिक प्रवचन, श्री जगद्गुरू रेणुकाचार्य पंच धातु मुर्ती प्रतिष्ठापना, गुरुमाता अमृतमहोत्सवा निमित्त तुलाभर, शहरातील सर्व समाजातील जेष्ठ नागरीकांचा सत्कार, अक्कमहादेवी अक्कनबळग अमृतमहोत्सव, श्री.ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी जन्मदिन सुवर्ण महोत्सव व तुलाभार तसेच सहस्त्र सुहासिनी कुंभ मुरवणुक व शिला मंडप उदघाटन व धर्मसभा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता श्री.ष.ब्र.डॉ. चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी संस्थान हिरेमठ हारकुड, श्री.म.नी.प्र. महांत महास्वामीजी विरक्त मठ मैंदर्गी, श्री.ष.ब्र. डॉ. शांतवीर शिवाचार्य महास्वामीजी हादगीलिंगेश्वर मठ, गडी गौडगाव, मनवळीचे मुगेंद्र महास्वामीजी, नळदुर्ग येथील राजगुरू श्री. शिवलिंगेश्वर हिरेमठाचे मठाधीपती श्री.ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी व इतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन या सर्व कार्यक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. दीपप्रज्वलनानंतर श्री.ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांनी सर्व उपस्थित महाराजांचा सत्कार केला.

यावेळी श्री.ष.ब्र.डॉ. शांतवीर शिवाचार्य महास्वामीजी यांचे अध्यात्मिक प्रवचन झाले. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी रात्री उशिरा कार्यक्रमस्थळी भेट देऊन महाराजांचे आशिर्वाद घेतले.

यावेळी त्यांच्या सोबत भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य नितीन काळे उपस्थित होते. यावेळी मठाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर नळदुर्ग शहरातील ब्राम्हण व राजपुत समाजातील जेष्ठ नागरीकांचा राजगुरू श्री शिवलिंगेश्वर हिरेमठाच्या वतीने सत्कार करुन त्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये बाबुराव वैद्य, पांडुरंग कुलकर्णी, उत्तम रामदासी, सुधीर पुराणिक, बाळासाहेब कुलकर्णी, शशिकांत नाईक, सुभाष भुमकर, नंदकुमार जोशी, नळदुर्ग शहर ब्राम्हण समाजाचे अध्यक्ष विनायक अहंकारी, नळदुर्ग शहर राजपुत समाजाचे अध्यक्ष सुधीर हजारे, सरदारसिंग ठाकुर, छबुसिंग बिसेनी, मनोज हजारे, बलदेवसिंग ठाकुर, राहुल हजारे व रणजितसिंग ठाकुर यांचा समावेश आहे. नळदुर्ग शहरातील सर्व समाजातील जेष्ठ नागरीकांचा सत्कार करुन त्यांचा गौरव करण्याची श्री.ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांची संकल्पना अतिशय चांगली व सर्व धर्म समभाव ही संकल्पना प्रत्येक्षात अंमलात आणणारी आहे. अशा प्रकारचा सत्काराचा होणारा कार्यक्रम हा नळदुर्गच्या इतिहासातील पहिलाच आहे.

या कार्यक्रमास भाविक व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मठाचे मठाधीपती श्री.ष.ब्र. बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तात्रय कोरे, मह्लिनाथ माळगे, महेश कोप्पा पाटील, ज्योती बचाटे, बंडप्पा कसेकर, दयानंद स्वामी, सुभाष कोरे यांच्यासह लिंगायत समाज बांधवांनी परीश्रम घेतले. कार्यक्रमानंतर भाविक व नागरीकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## ॲथलेटिक्स स्पर्धेत एकलव्य आश्रम शाळेचे सुयश

**धाराशिव, दि.८ नोव्हेंबर -**

नुकत्याच विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धा नांदेड येथील पोलीस ग्राउंडवर चौदा व सतरा वर्षाखालील मुला मुलींची स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यमगरवाडी येथील विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी करून यश संपादन केले. ८० मी हर्डल्स स्पर्धेत करण पवार तृतीय, ५ किमी चालणे मंगेश झोडपे द्वितीय, ४०० मी हर्डल्स अश्विनी चव्हाण प्रथम, मनीषा राठोड द्वितीय, क्रॉस कंट्री ६ किमी धावणे, ज्योतीराम पवार सहवा असे क्रमांक मिळवून यश संपादन केले. रत्नागिरी डेरवण येथे होणाऱ्या व मुलांची पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुल येथे होणाऱ्या चार खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# मनोज जरांगे यांच्यावर आक्षेपार्ह पोस्ट लिहिणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यास मराठा कार्यकर्त्यांकडून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.८ नोव्हेंबर -**

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्यावर आक्षेपार्ह फेसबुक पोस्ट लिहिल्यामुळे कळंब शहरातील एका सरकारी कर्मचाऱ्याला सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांकडून चांगलाच धडा शिकविण्यात आला. या घटनेत संबंधित कर्मचाऱ्याच्या तोंडाला काळे फासून त्याला बेदम मारहाण करण्यात आली.



कृषी सहाय्यक पदावर कार्यरत असलेले भारत शिंदे यांनी मनोज जरांगे यांच्या विरोधात आक्षेपार्ह पोस्ट सोशल मीडियावर लिहिली होती. ही पोस्ट पाहून सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला. त्यानंतर शिंदे यांना पकडून त्यांना चोप दिला व तोंडाला काळे फासून सार्वजनिकरीत्या त्यांची नाचक्की करण्यात आली. या प्रकरणाची माहिती पोलिसांना देण्यात आली असून संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध तक्रार नोंदविण्यात आली आहे. मारहाणीनंतर, भारत शिंदे यांनी समाजाची माफी मागत आपला माफीनामा सादर केला.

या घटनेवर शहरातील विविध नेत्यांनी आपापल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. मराठा समाजाच्या काही नेत्यांनी सांगितले की, जरांगे-पाटील यांच्यासारख्या व्यक्तीवर अशा आक्षेपार्ह टिप्पणी करणे अत्यंत चुकीचे आहे. त्यांनी समाजासाठी मोठा त्याग केला आहे, आणि त्यांचा अपमान सहन केला जाणार नाही.

## साधना सरवडे हिचा सत्कार

**लोहारा, दि.८ नोव्हेंबर -**

लोहारा तालुक्यातील कास्ती येथील अत्यंत सामान्य कुटुंबातील मुलगी कु. साधना सरवडेचा उदगीर येथील धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालयात प्रवेश मिळाल्याबद्दल कास्ती गावात सत्कार करण्यात आला.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत असताना सुध्दा कोणत्याच क्लासेसला प्रवेश न घेता तीने हे यश मिळवले आहे. श्री साई श्रध्दा एज्युकेशनच्या मुलींच्या वस्तीगृहात राहून तीने नीट परीक्षेची तयारी केली. या नीट परीक्षेच्या तयारीसाठी प्रा. सोमनाथ लांडगे यांचे तीला बहुमोल मार्गदर्शन मिळाले. या सत्कार समारंभास प्रा. सोमनाथ लांडगे, डॉ. हेमंत श्रीगीरे, डॉ. गुणवंत वाघमोडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# आई-वडिलांचे योगदान मोठे : वसंत हंकारे

## आलूरच्या व्याख्यानात अनेकांनी ढाळले अश्रू

**तभा वृत्तसेवा**
**आलुर/जळकोट दि.८ नोव्हेंबर -**

येथून जवळच असलेल्या आलुर येथे ग्रामदैवत श्री.सोमेश्वर व श्री. गुरू शांतेश्वर यात्रा व दिपावलीनिमित्त समाज प्रबोधनकार व्याख्याते डॉ. वसंत हंकारे यांचे व्यापारी महासंघ, आलुर यांच्या पुढाकाराने आई वडील समजून घेताना या विषयावर व्याख्यान झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवराज पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून वेदमूर्ती महांतय्या स्वामी, स्वातंत्र्यसैनिक वसंत पोतदार, नागणप्पा ब्याळीकुळे, उपसरपंच जितेंद्र पोतदार, माजी सरपंच राजकुमार माने, उल्हास घुरघुरे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सिद्धप्पा ब्याळीकूळे, उपाध्यक्ष कल्याण लाटे, रत्नाकर माने, सचिव सोमनाथ



काशेट्टी, विजयकुमार बिराजदार, लातुर येथील व्यापारी निजाम हूच्चे आदि उपस्थित होते. वसंत हंकारे यांचा आलुर व्यापारी महासंघाच्यावतीने सत्कार करण्यात आला. डॉ. वसंत हंकारे यांनी बोलताना म्हणाले की, प्रत्येकाच्या जीवनात आई-वडिलांचे योगदान खूप मोठे आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात आई वडिलांचे काय कष्ट आहेत. किती यातना सोसाव्या लागतात. त्यांचे योगदान काय याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. वसंत हंकारे बोलताना कार्यक्रमाच्या संपूर्ण प्रांगणातील प्रत्येक महिला, मुली, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने रडत होते.अक्षरशः अनेक मुली आपल्या वडिलांना कवटाळून हंबरडा फोडुन रडत होत्या. आलूरच्या इतिहासात असे समाज प्रबोधनपर व्याख्यान प्रथमच झाल्याने या कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी पंचक्रोशीतून अनेक नागरिक, महिला, विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यापारी महासंघाचे बसवराज लाटे, दिलीप पोतदार, मह्लिनाथ नारळे, हणमंत शंके, जब्बार लोहारे, संतोष कलशेट्टी, ब्रम्हा उमशट्टे, राजेंद्र मंटगे, परवेझ सौदागर, प्रवीण पोतदार, संतोष भालके, गझिबक्ष सन्नाटे, संजय कासार, एम.डी. टेलर, बसवराज धमगुंडे, शेट्टप्पा धुत्तरगे, अनिल मरबे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद देशटे तर आभार सिद्धाराम भालके यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांची आज लोह्यात सभा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०८ नोव्हेंबर**

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघात शिवसेना उबाठा गट, भारतीय काँग्रेस पक्ष , राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट, आम आदमी पार्टी, रिपाइं महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ शिवसेनाचे पक्षप्रमुख तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची आज शनिवारी सकाळी ११:०० वाजता मोंढा परिसर बैल बाजाराच्या मैदानावर जाहीर सभेचे आयोजन केल्याची माहिती माजी आ.रोहिदास चव्हाण यांनी दिली .यावेळी शिवसेनेचे लातुर जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख



संजय ढेपे,काँग्रेस लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, काँग्रेसचे कंधार तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोहा तालुकाध्यक्ष प्रा. प्रभाकर पाटील पवार,शिवसेनेचे लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे, माजी पं.स. सदस्य बापू चव्हाण, भिमराव पाटील शिंदे,माजी जि.प.सदश्य बालाजी परदेशी, कंधार न.पा.चे माजी नगरसेवक शाहू नळगे, भाऊसाहेब पाटील कदम, सुरेश पाटील हिलाल, विक्रम कदम , संजय पाटील ढाले, विठ्ठल शेटकर, सचिन पेटकर, खंडू पाटील पवार, अतुल पापीनवार, योगेश पाटील नंदनवनकर, सतीश पाटील बाबर, गजानन पाटील मोरे, बाबासाहेब बाबर,रूद्रा पाटील भोस्कर, रामेश्वर पाटील पवार, बाबाराव पाटील, दत्ता शेटे, सुभाष पाटील भालेराव, प्रकाश चव्हाण आदी उपस्थित होती. लोहा -कंधार मधील वातावरण हे महाविकास आघाडी सोबत आहे. माजी आ.रोहीदास चव्हाण यांचे स्वागत करतो त्यांनी माझ्यावर मुलाप्रमाणे प्रेम केले त्यांनी १९८८ पासून लोहा -कंधार तालुक्यात गाव वाडी तांड्यावर शिवसेना पक्ष वाढविला. त्यांच्यामुळे मतदारसंघात शिवसेना आहे हि त्यांच्या कामाची पावती आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा विजय होणार आहे. यापुढे सर्वच निवडणुका महाविकास आघाडी एकत्रितपणे लढविणार आहोत म्हणाले.

# भाजपाने केलेल्या ऐतिहासीक कामगिरीमुळे देश दहशतवादमुक्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**

देशातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पार्टीच्या सरकारने केलेल्या ऐतिहासिक कामगिरीमुळे देश दहशतवादमुक्त ,आतंकवादमुक्त, नक्षलवादमुक्त होत आहे . त्यामुळे आगामी काळातही देशात कायदा व सुव्यवस्था कायम राहावी यासाठी आपण सर्व कायदे तज्ञ आहात त्यामुळे भारतीय जनता पार्टी आणि महायुतीच्या उमेदवारास प्रचंड मतांनी विजयी करा अशी विनंती भाजपा लोकसभेचे उमेदवार डॉ.संतुकराव हंबर्डे यांनी केले. ते आज जिल्हा सत्र न्यायालय परिसरात येथील वकील आणि कर्मचाऱ्यांसोबत संवाद साधत होते.



नांदेडलोकसभेच्यापोटनिवडणुकीचे भारतीय जनता पार्टी आणि महायुतीचे उमेदवार डॉ. संततुकराव हंबर्डे यांनी आज विविध कायदे तज्ञांची भेटीगाठी घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. देशात मोदी सरकार तिसऱ्यांदा स्थापन झाले आहे . त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर संपूर्ण भारतवासीयांचा विश्वास आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळेच कलम ३७० रद्द होऊ शकले. जम्मू-काश्मीरमध्ये पहिल्यांदाच भारताचा तिरंगा फडकला. खऱ्या अर्थाने राष्ट्राची एकता आणि अखंडता जपण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाने केले आहे. ही बाब लक्षात घेता आगामी काळातही आपला देश एकसंघ राहिला पाहिजे यासाठी नांदेड लोकसभेचा खासदारही आपला हवा. नांदेड लोकसभेचा खासदार भारतीय जनता पार्टीचा निवडून आला तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात अधिक बळकट होतील आणि आपल्या इथे मोठ्या प्रमाणात विकास साधता येईल त्यासाठी मला पाठबळ द्या असे आवाहनही हंबर्डे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### संकटग्रस्त बालकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन नंबर १०९८ ची मदत घ्या

**नांदेड**-आपल्या आजूबाजूला जर बालकामगार, बाल भिक्षेकरी, लैंगिक अत्याचारग्रस्त बालके, हरवलेली बालके, सापडलेली बालके, सोडून दिलेली बालके, बालविवाह, संकटग्रस्त बालके आढळल्यास अशा बालकांना त्वरीत आवश्यक मदत कुठून कशी मिळवून देता येईल, याकरीता कुठे संपर्क करावा याबाबत सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम असतो. यासाठी आता चाईल्ड हेल्पलाईन नंबर १०९८ कार्यान्वित करण्यात आली आहे. संकटग्रस्त बालकांना त्वरित मदतीसाठी भारत सरकारच्या महिला व बाल विकास विभागामार्फत ० ते १८ वयोगटातील कोणत्याही प्रकारच्या अडचणी व संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्व बालकांसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा १०९८ संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित आहे. या सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकांना २४ तास हेल्पलाइन सेवा उपलब्ध आहे. या सेवेचा लाभ बालक स्वतः घेऊ शकतो किंवा इतर कोणीही सदर सेवेद्वारे बालकांना मदत मिळवून देऊ शकतात. या संबधी माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवले जाते. याद्वारे संकटग्रस्त बालकांना मदत करण्यासाठी संबंधीतांनी १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महिला व बालविकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, महिला व बालविकास अधिकारी श्रीमती आर. पी. रंगारी यांनी केले आहे.

### IMA महास्पोर्ट्स क्रीड़ा प्रतियोगिता नांदेडमध्ये



**नांदेड**-इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने नुकत्याच आयएमए महास्पोर्ट्स स्पर्धा घेण्यात आल्या. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व एसजीजीएस महाविद्यालयाच्या क्रीडा मैदानावर पार पडलेल्या स्पर्धेत विविध जिल्ह्यातून आलेल्या डॉक्टरांनी सहभाग घेतला होता. डॉक्टरांमध्ये क्रीडाप्रेम जागृत करण्याच्या आणि एकात्मता वाढवण्याच्या करण्यात आले होते.. दर वर्षी IM MHSPORTS एका जिल्ह्यात डॉक्टर्स साठी आयोजित केले जाते. यावेळी ही स्पर्धा नांदेड खच तर्फे आयोजित केली होती. यात फायनल सामन्यात डॉ. प्रमोल हंबर्डे यांनी ३३ चेंडूमध्ये नाबाद ७८ धावा काढत संघाला विजय मिळवून दिला. त्यांना 'मॅन ऑफ द मॅच' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्पर्धेदरम्यान आयएमए मावेरिक्सच्या सर्व खेळाडूंनी अपवादात्मक कामगिरी केली. यावेळी हंबर्डे म्हणाले, सर्व सहकाऱ्यांनी दिलेल्या उत्कृष्ट योगदानामुळेच आम्हाला हा विजय मिळवता आला. प्रत्येकाने आपल्या भूमिकेला योग्य प्रकारे न्याय दिला आणि एकत्रित प्रयत्नातून विजेतेपद प्राप्त केले. राज्यभरातील डॉक्टरांनी स्पर्धेत सहभाग घेतल्यामुळे स्पर्धेचा उत्साह द्विगुणित झाला. यासाठी आयएमएचे डॉ. प्रल्हाद कोटकर, डॉ. राजेश नुने, डॉ. राहुल लव्हेकर, डॉ. वीरेंद्र अवधिया, डॉ. तजमूल पटेल आदी पदाधिकाऱ्यांसह मेडिकल असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी पुढाकार घेतला.

# जन आरोग्य अभियानने प्रकाशित केले नांदेडच्या आरोग्य व्यवस्थेचे रिपोर्ट कार्ड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**

जन आरोग्य अभियान, नांदेडच्यावतीने आज दिनांक ८ नोव्हेंबर २०२४ रोजी विसावा हॉटेल येथील कार्यक्रमात 'नांदेडच्या आरोग्य व्यवस्थेचे रिपोर्ट कार्ड व जाहीरनामा' प्रकाशित केला. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष जन स्वास्थ अभियानाचे सह संयोजक डॉ. अभय शुक्ला हे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व नांदेड येथील आरोग्यवस्थेचा आढावा डॉ. राजेश माने सर्वांसमोर सादर केला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शिवाजी गावंडे, डॉ. अशोक बेलखोडे, दीपक जाधव, परमेश्वर पौळ, दत्ता तूमवाड, के.के.जामकर, उपस्थित होते.



नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय येथे ऑक्टोबर २०२३ मध्ये २४ तासात २४ मृत्यू झाल्याची गंभीर घटना घडली होती. त्यामध्ये नवजात बाळांची संख्या ११ इतकी होती. या घटनेचे पडसाद राज्यभर उमटून आरोग्य व्यवस्थेच्या कारभारावर टीकेची झोड उठली होती. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री गिरीश महाजन यांनी इथल्या व्यवस्थेत सुधारणा करण्याची अनेक आश्वासने दिली होती. मात्र या घटनेला एक वर्ष उलटून गेल्यानंतर, प्रत्यक्षात फार बदल झाल्याचे दिसून येत नाही. जन आरोग्य अभियानाच्यावतीने एकूण १० निकषांच्या आधारे नांदेडच्या आरोग्य व्यवस्थेत झालेल्या बदलांचे मूल्यांकन करण्यात आले, त्यामध्ये १०० पैकी केवळ २४ गुण इथल्या आरोग्य व्यवस्थेला मिळू शकले आहेत.

नांदेड शहर व जिल्ह्यासाठी नांदेड हेल्थ क्शन प्लॅन तयार करण्यात यावा. यामध्ये स्थानिक डॉक्टर, सार्वजनिक आरोग्य तज्ञ, सामजिक संस्था व संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश असावा. हेल्थ क्शन प्लॅन मध्ये खालील मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजनांचा समावेश असावा. लोकाधारित देखरेख प्रक्रिया राबविण्यात यावी, नांदेडच्या सिव्हील हॉस्पिटल व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बजेटमध्ये वाढ करावी या मागण्या यावेळी करण्यात आल्या. लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी उभा राहिलेल्या उमेदवारांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्या मध्ये आरोग्याचा प्रश्न किती जणांनी घेतलाय हा देखील प्रश्न जन आरोग्य अभियान तर्फे यावेळी करण्यात आला आहे.

# सोनखेड पोलीस गाडीच्या धडकेत युवक ठार

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. ०८ नोव्हेंबर**

५ ऑक्टोबर रोजी दुपारी एकच्या दरम्यान सोनखेड पोलीस गाडीच्या धडकेत युवक जागीच ठार झाल्याची घटना घडली.

नांदेड बिदर रोडवर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वर किवळा शिवारात दुपारी १ च्या दरम्यान एम एस २६ बी एक्स ५३५९ या क्रमांकाची सोनखेड पोलिसांची गाडी ही उस्माननगर कडून नांदेडकडे भरधाव वेगात जात असताना व समोरून येणारी एम एच २६ बी एल ७६८४ या क्रमांकाच्या दुचाकीची समोरासमोर धडक झाली व त्यानंतर तो दुचाकीस्वार वीस फूटवर उडून खाली पडला व त्यामध्ये दत्ता शंकर हंबर्डे वय २५ वर्ष रा.गुंडेगाव ता. जि.नांदेड हा जागीच गतप्राण झाला

या घटने दरम्यान अपघात स्थळाच्या ठिकाणी पोलीस वाहनाच्या धडकेत युवक ठार झाल्यामुळे काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती परंतु इतवारा विभागाचे पोलीस उपविभागीय अधिकारी सुशील कुमार नायक संजय पाटील घोगरे यांच्या मदतीने वाद निवळलाय. अपघाता वेळी रस्त्याने जाणारा एक हायवा देखील सोनखेड पोलिसांनी ताब्यात घेतला आहे परंतु या चालकाने सांगितले की या अपघाताचा आणि माझा तीळ मात्र संबंध नाही कोणत्याही कारणाशिवाय मला पोलीस ठाण्यात आणून बसवले आहे.

# माहूर ग्रामीण रुग्णालयात अधिकारी डॉ.बिपीन बाभळे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०८ नोव्हेंबर**

माहूर येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयाचे अत्यंत मृदूभाषी मनमिळाऊ स्वभावाचे व्यक्ती मात्र तेवढेच वैद्यकीय कर्तव्यात प्रामाणिक व निष्णात असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ.बिपीन बाभळे (पूर्व प्रभारी वैद्यकीय अधिक्षक ) यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा छोटेखानी अभिष्टचिंतन सोहळा आज गुरुवार दि.०७ नोव्हेंबर रोजी दुपारी वाजता ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. किरणकुमार वाघमारे, पत्रकार बजरंगसिंह हजारी, इव्हेंट प्लॅनर अजयसिंह हजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत अत्यंत साधेपणाने बर्थडेजेंटलमॅन डॉ.बिपीन बाभळे यांना शॉल, श्रीफळ पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन तुम जियो हजारो साल साल के दिन हो पचास हजार! हॅपी बर्थडे टू यू डियर डॉ.बिपीनजी!असे अभिष्टचिंतन करत आपुलकीचा केक भरवून उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रमीण रुग्णालयाचे डॉ.अभिजीत अंबेकर, डॉ.वसीम डॉ.दोनकलवार,बोथींगे सिस्टर,पि.आर. कचकलवार सिस्टर,पि, बि.खरे सिस्टर,१०८ म्ब्युलन्स पायलट (ड्रायव्हर) पांडुरंग धोंगडे,राम केंद्रे,आकाश मुंडे आदिंची उपस्थिती होती. मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जाऊ द्या! पाणी चित्रपट फेम अभिनेत्री माधुरी लोकरे यांचे



प्रतिपादन; पवननगर येथे दीपावली समारोप कविसंमेलन रंगले

नांदेड - आपल्या मुला मुलींचा कल कोणत्या क्षेत्रात आहे हे पाहूनच त्यांना पालकांनी आपले क्षेत्र निवडू द्यावे. प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध होत असतात. पालकांनी आपल्या अपेक्षा, इच्छा किंवा आकांक्षा त्यांच्यावर लादू नयेत. विशेषतः मुलींना अधिक बंधनं घातली जातात. परंतु अभिनय क्षेत्रात मी माझ्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळेच माझे करिअर करु शकले. म्हणूनच मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जाऊ द्या असा सल्ला पाणी चित्रपट फेम अभिनेत्री माधुरी लोकरे यांनी दिला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवी पंडित पाटील बेरळीकर, प्रमुख पाहुणे म्हणून सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा साहित्यिक कवी अनुरत्न वाघमारे, कवी प्रल्हाद घोरबांड, राजेश लोकरे, मीनाक्षी कोकुलवार, संयोजक तथा आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलचे संचालक कवी पांडुरंग कोकुलवार, निमंत्रक प्रज्ञाधर ढवळे आदींची उपस्थिती होती.

येथील आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने शहरातील मालेगाव रोड स्थित पवननगर येथे दीपावली समारोप कार्यक्रम आणि कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने दीपावली निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यानंतर दि. ७ रोजी समारोप कार्यक्रम संपन्न झाला. स्वामी विवेकानंद यांच्या मूर्तीचे पुष्पपुजन केल्यानंतर रीतसर कार्यक्रमास प्रारंभ झाला. मान्यवरांच्या सत्कारानंतर माधुरी लोकरे, नागोराव डोंगरे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर झालेल्या गीतगायन आणि कविसंमेलन कार्यक्रमात पंडित पाटील बेरळीकर, अनुरत्न वाघमारे, प्रल्हाद घोरबांड, गझलकार चंद्रकांत कदम, शरदचंद्र हयातनगरकर, थोरात बंधू, साहेबराव कांबळे, प्रज्ञाधर ढवळे, पांडुरंग कोकुलवार, प्रशांत गवळे, योगेश गच्चे, अशोक कुबडे, रुपाली वागरे वैद्य, पंचफुला वाघमारे, पांडुरंग नलबलवार यांनी स्वरचित कवितांचे सादरीकरण व गीतगायन केले.

# पूर्ण दिवस सुटी अथवा किमान २ तास मतदानाला वेळ द्या !

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**

नांदेड जिल्ह्यातील लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवार २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे या दिवशी अत्यावश्यक सेवेपासून तर कर्मचाऱ्यांपर्यंत आणि कामगारांपासून शेतमजूर, मेकॅनिक, वेटर या सर्वांना एक तर पूर्ण दिवसाची सुट्टी अथवा मतदान करण्यासाठी दोन तासाची सवलत द्या, असे स्पष्ट निर्देश प्रशासनाने सर्व कामगार आस्थापनांना दिले आहे.

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होत आहे. नांदेड विधानसभा मतदान क्षेत्रात असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी बुधवार २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याबाबत शासन परिपत्रक निर्गमित झाले आहे.

ही सुट्टी सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, इत्यादीना लागू राहील. उदा. राज्य शासन, केंद्र शासन व खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्यगृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिग सेंटर, मॉल्स,रिटेलर इ. अपवादात्मक परिस्थीतीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादीना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल.

मात्र त्याबाबत त्यांनी संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची भरपगारी सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

सर्व आस्थापना,कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी , व्यवस्थापनाने या आदेशाचे अनुपालन होईल याची खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानासाठी योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करणे शक्य न झाल्याबाबची तक्रार आल्यास , त्यांच्या विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

# राष्ट्र आणि धर्माच्या रक्षाणासाठी भाजपाला साथ द्याः डॉ. संतुक हंबर्डे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**

विश्वविख्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वामुळे अडीच हजार वर्षांपासून ज्या राम मंदिराची आपण प्रतीक्षा करत होतो . त्या राम मंदिराचा प्रश्न मार्गी लागला आहे. हिंदू धर्म रक्षणासाठी भारतीय जनता पार्टी आणि महायुती सरकार काम करत आहे. शिवाय सर्वांचा समान विकास साधण्याचा प्रयत्न सुरू आहे.त्यानुसार आपणा सर्वांना आता भाजपा महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे लागेल. राष्ट्राचे आणि धर्माच्या रक्षणासाठी आता ही निर्वाणाची वेळ आली आहे . त्यासाठी भाजपा महायुतीच्या प्रत्येक उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन नांदेड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी केले.

नांदेड क्लब, नांदेड व सायन्स कॉलेज मैदान वर सकाळ च्या वेळी फिरायला आलेला जेष्ठ नागरिक व नांदेड क्लब पदाधिकाऱ्यांसह संवाद व भेट करताना लोकसभेचे उमेदवार डॉक्टर संततुकराव हंबर्डे , नांदेड दक्षिणचे उमेदवार आनंदराव बोंढारकर यांच्यासह मतदारसंघातील उमेदवार, प्रविण भाऊ साले, चैतन्यबापू देशमुख, माजी.महापौर अजय बिसेन, बाळु खोमणे, जगंमवाडी मंडळाचे अध्यक्ष आशिष नेरळकर, छत्रपती शिवाजी नगर मंडळाचे अध्यक्ष सुयोग कवडगे, आशितोष धर्माधिकारी बरबडेकर आदी उपस्थित होते. यावेळी नागरिकांशी संवाद साधताना डॉ. संतुकराव हंबर्डे पुढे म्हणाले की, देशात नरेंद्र मोदींचे भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे. भाजपा सरकारमुळे गेल्या दहा वर्षात देशाचा कायापालट झाला आहे. शेतकऱ्यांपासून तर नोकरदारापर्यंत प्रत्येक घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी मोदी सरकारने केलेले कामाची यादी अत्यंत मोठी आहे . भ्रष्टाचार मुक्त प्रशासन भारतीय जनता पार्टीने देऊन या देशातील शोषित पीडित वंचित तळागाळातील लाभार्थ्यांना खऱ्या अर्थाने लाभ मिळाला आहे. हागणदारीमुक्ती पासून ते निराधारापर्यंत प्रत्येक योजना यशस्वीरित्या राबवून देशाची आर्थिक स्थिती जागतिक दर्जावर पाचव्या स्थानापर्यंत नेण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे झाले आहे. येत्या पाच वर्षाच्या काळात देश जागतिक तिसरी अर्थ मात्र महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करणार आहे. त्यामुळे देशाचा चौफेर विकास होणार आहे. यात आपला नांदेड जिल्हा ही मागे राहिला नाही पाहिजे. नांदेड जिल्ह्यात केंद्र सरकारच्या जास्तीत जास्त योजना राबवून आपल्या भागाचा कायापालट करण्यासाठी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत कमळ या निशाणी समोरील बटन दाबून भाजपला प्रचंड मतांनी विजयी करा. एका शेतकरी कुटुंबातील आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी सदैव निस्वार्थपणे काम करणाऱ्या आपल्या लेकराला , भावाला निवडणूकित विजयी करा असे आवाहन डॉ. हंबर्डे यांनी यावेळी केले.

# मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जाऊ द्या!

## अभिनेत्री माधुरी लोकरे यांचे प्रतिपादन; पवननगर येथे दीपावली समारोप कविसंमेलन रंगले

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ नोव्हेंबर**

नांदेड - आपल्या मुला मुलींचा कल कोणत्या क्षेत्रात आहे हे पाहूनच त्यांना पालकांनी आपले क्षेत्र निवडू द्यावे. प्रत्येक क्षेत्रात संधी उपलब्ध होत असतात. पालकांनी आपल्या अपेक्षा, इच्छा किंवा आकांक्षा त्यांच्यावर लादू नयेत. विशेषतः मुलींना अधिक बंधनं घातली जातात. परंतु अभिनय क्षेत्रात मी माझ्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळेच माझे करिअर करु शकले. म्हणूनच मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जाऊ द्या असा सल्ला पाणी चित्रपट फेम अभिनेत्री माधुरी लोकरे यांनी दिला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवी पंडित पाटील बेरळीकर, प्रमुख पाहुणे म्हणून सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा साहित्यिक कवी अनुरत्न वाघमारे, कवी प्रल्हाद घोरबांड, राजेश लोकरे, मीनाक्षी कोकुलवार, संयोजक तथा आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलचे संचालक कवी पांडुरंग कोकुलवार, निमंत्रक प्रज्ञाधर ढवळे आदींची उपस्थिती होती.

येथील आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने शहरातील मालेगाव रोड स्थित पवननगर येथे दीपावली समारोप कार्यक्रम आणि कविसंमेलनाचे



आयोजन करण्यात आले होते. आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या वतीने दीपावली निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यानंतर दि. ७ रोजी समारोप कार्यक्रम संपन्न झाला. स्वामी विवेकानंद यांच्या मूर्तीचे पुष्पपुजन केल्यानंतर रीतसर कार्यक्रमास प्रारंभ झाला. मान्यवरांच्या सत्कारानंतर माधुरी लोकरे, नागोराव डोंगरे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर झालेल्या गीतगायन आणि कविसंमेलन कार्यक्रमात पंडित पाटील बेरळीकर, अनुरत्न वाघमारे, प्रल्हाद घोरबांड, गझलकार चंद्रकांत कदम, शरदचंद्र हयातनगरकर, थोरात बंधू, साहेबराव कांबळे, प्रज्ञाधर ढवळे, पांडुरंग कोकुलवार, प्रशांत गवळे, योगेश गच्चे, अशोक कुबडे, रुपाली वागरे वैद्य, पंचफुला वाघमारे, पांडुरंग नलबलवार यांनी स्वरचित कवितांचे सादरीकरण व गीतगायन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रज्ञाधर ढवळे यांनी केले. भूमिका पांडुरंग कोकुलवार यांनी मांडली. सूत्रसंचालन रणजित गोणारकर यांनी तर आभार शंकर गच्चे यांनी मानले. दरम्यान माधुरी लोकरे यांचा अभिनय क्षेत्रातील यशाबद्दल चॅनलच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी शिवाजी कोकुलवार, मनोहर संगमवार, नागभूषण दुर्गम, गणेश भुसा, राजीव राचा, अभय कुरपतवार, अनंत नातेवार, दिलिप डांगे, गजानन पावडे, संजय मोरे, माधव कांबळे, एकनाथ कार्लेकर, धुसे, गंदेवाड, जयंती ढवळे, युवराज ढवळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश प्रकाशन युट्यूब चॅनलच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

लातूर

# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल




## आ.बाबासाहेब पाटील यांनी साधला लाडक्या बहिणींशी संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. ८ नोव्हेंबर-**

चाकूर अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबासाहेब पाटील हे विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने तिवटघाळ परिसरात देविदास होळदांडगे यांच्या शेतामध्ये अनेक लाडक्या बहिणी काम करत असताना आमदार बाबासाहेब पाटील यांनी बांधावर जाऊन मजुराशी संवाद साधला व महायुती सोबत राहण्याचे आवाहन केले व घड्याळाला मतदान करण्याची विनंती केली. महिलांनी ही आम्ही महायुतीच्या व घड्याळाच्या पाठीमागे भक्कम पणे उभे राहणार असल्याचे सर्व महिलांनी सांगितले.

यावेळी आमदार बाबासाहेब पाटील यांच्या समवेत भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाळ माने, तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, वसंतराव डिगोळे यांच्यासह महायुतीचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### राष्ट्रसंतांची भक्ती स्थळ ते कपिलाधार पदयात्रा मार्गस्थ

**अहमदपूर, दि. ८ नोव्हेंबर-**

गुरुराज माऊली शिवलिंग माऊली च्या नामघोषात श्रीक्षेत्र भक्ती स्थळ ते चापोली ते कपिलाधार पदयात्रा भक्ती स्थळावरून हजारो भक्तगणासह मार्गस्थ झाली. महापदयात्रेचे ७० वे वर्ष असून अहमदपूर येथे राष्ट्रसंतांचे संजीवन समाधी असलेल्या भक्तिसळापासून चापोली, चाकूर, वडवळ, जानवळ, कारेपूर, पानगाव, अंबाजोगाई, लोखंडी, सावरगाव, केज, होळ मार्गे श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी १५ नोव्हेंबर रोजी पोहोचणार आहे. या पदयात्रेत राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज संगणबसप्पा शिवाचार्य महाराज निलंगा मठ शंकर लिंग शिवाचार्य महाराज शिरूरअंत पालकरप भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी राजेश्वर स्वामी कुरळेकर बसवराज स्वामी चिंचोलीकर सहशिवाचार्य सहभागी झाले असून अहमदपूर येथे शिवाजी चौक ते वीरमठ संस्थान पर्यंत मिरवणूक काढण्यात आली भक्ती स्थळ येथे प्रसाद व्यवस्था हैबतपुर तोंडारकर यांच्या वतीने करण्यात आले होते तर वीरमट संस्थान येथे शेटकर महाजन परिवाराच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती या महापद यात्रेत ६० दिंड्या सहभागी झाले असून चापोली व चाकूर या ठिकाणाहून ही अनेक दिंड्या सहभागी होत असतात या पदयात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन पदयात्रेचे अध्यक्ष मनमत आप्पा पालापुरे भगवंतराव पाटील चांबर्गीकर निळकंठ बिराजदार संजय ऊसतुर्गे कपिल मल्लीशे हावगी देवने अशोक शेळगावकर यांनी केले आहे



### खंडाळी जिल्हा परिषद प्रशालेत २००५-२००६ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**अहमदपूर, दि. ८ नोव्हेंबर-**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला खंडाळी सन २००५-२००६ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच पार पडला. आपल्या मित्रा गुरूजनासोबत एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. तब्बल १८ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा त्यांना शिकवणारे गुरूजनासोबत गेट टुगेदर प्रशालेत प्रांगणातील या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमात सर्वांनी परीचय देत मागच्या शालेय जिवनातील आठवणी, गंमती-जमती सांगत उजाळा दिला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेले शाळेचे माजी मुख्याध्यापक घाटीवाले, वर्गशिक्षक टेकले, कासले, श्रीमती राठोड, घोडके, शेख उपस्थित होते. या मेळाव्यासाठी खासकरून प्रेमचंद कुलकर्णी, रवि खोमणे, किरण कुलकर्णी, कैलास शिंदे, दगडू म्हेत्रे, शरद पौळ आदींनी पुढाकार घेत हा कार्यक्रम आनंददायी पार पाडला. सूत्रसंचालन रविकुमार पौळ यांनी तर आभार विनोद कांबळे यांनी मानले.




### निलंगा येथे शरद पवार राष्ट्रवादी महिला आघाडी पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश

**निलंगा, दि. ८ नोव्हेंबर-**

राज्यातील महायुती सरकारच्या सर्वसमावेशक व समतोल विकासामध्ये साथ देण्यासाठी निलंगा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय समोर ठेवून कार्यरत असणाऱ्या माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस महादेवी पाटील व महिला आघाडी निलंगा तालुकाध्यक्ष कोमल देशपांडे यांच्या सोबत अनेक राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला . तुतारीला काडी मोड करून हातामध्ये कमळ घेतले आहे. माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर,हस्ते व माजी खासदार रूपाताई अक्का पाटील निलंगेकर युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर जिल्हा उपाध्यक्ष शेषराव मंमाळे, भाजपा महिला आघाडी तालुका अध्यक्ष मोरे, प्राजक्ता मारवा, डॉ. समिधाअरविंद पाटील-निलंगेकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस महादेवी पाटील व महिला आघाडी निलंगा तालुकाध्यक्ष कोमल देशपांडे यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. यामध्ये उषा मलवाडे, अर्चना गायकवाड, बिलकिस मोरखंडी, स्वाती पवार, मीरा गायकवाड, अनिता जाधव, उज्वला जाधव, मनीषा जाधव, लक्ष्मी पांचाळ, सत्यभामा लंगोटे, राजाबाई लंगोटे, श्रद्धा सुरवशे, गीता सुरवशे, सुनिता सुरवशे, मोहिनी सुरवसे, नाझिया शेख, शाहीन शेख, मीना लंगोटे, प्रिया खोत, सविता जाधव, गोजर सूर्यवंशी, महानंदा पवार, सुनंदा जगदाळे सह शेकडो महिलांनी भाजपात प्रवेश केला.

## आ. अभिमन्यू पवारांना जनतेने संधी द्यावी : बसवराज पाटील

### लामजना येथे आ. अभिमन्यू पवार यांची प्रचारसभा

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ८ नोव्हेंबर-**

केवळ पाच वर्षाच्या काळात विकासाची कामे आपल्या मतदारसंघातकशी आणता येतील. त्याला मुहुर्त स्वरुप कसे देता येईल. जनतेला पायाभुत सुविधा उपलब्ध करुन कशा देता येतील. यासाठी सातत्याने आखंडपणे काम केले आहे. खऱ्या अर्थाने जनतेने कामाच्या माणसाला काम करण्याची संधी दिली असून यापुढील काळात अशीच परंपरा कायम ठेवावी.एका पंचवार्षिकमध्ये आ.अभिमन्यू पवारांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात विकासकामे केली असून अशा लोकप्रतिनिधीला किमान २५ वर्षे संधी द्यावी, असे आवाहन माजी मंत्री बसवराज पाटील यांनी केले.

लामजना येथे महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. अभिमन्यू पवार यांची प्रचारसभा झाली. त्यावेळी माजीमंत्री बसवराज पाटील बोलत होते.राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दतात्रय कोळपे,शिवसेनेचे तालुकाप्रमुख तानाजी सुरवसे, सभापती चंद्रशेखर सोनवणे, माजी जिल्हा परिषद सदस्य महेश पाटील, हाणमंत राचट्टे, सरपंच महेश सगर, संगायो समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे, शिवाजी वाले, बालाजी शिंदे, महादेव कांबळे, यल्लाप्पा दंडगुले, युवराज बिराजदार,आशोक शेळके, सचिन कांबळे यांची उपस्थिती होती.

माजीमंत्री बसवराज पाटील म्हणाले, औसा मतदारसंघाच्या विकासासाठी अनेकांना काम संधी मिळाली. मलाही दहा वर्ष काम करण्याची संधी मिळाली. अन्यही आमदारांना दहा वर्ष काम करण्याची संधी मिळाली. त्यांचे नाव मी घेणार नाही आणि आमदार अभिमन्यू पवार यांनाही पाच वर्ष काम करण्याची संधी मिळाली. या सर्वांच्याच कामाचे मुल्यांकन जनतेने केले पाहिजे. विकासाची दूरदृष्टी व विकासाचा विचारअसलेले नेतृत्व लाभलेअसून त्यांना जनतेसाठी सातत्याने काही तरी करावे असे वाटते. लोकांनी निवडून दिल्यावर कामाच्या रुपाने जनतेला न्याय मिळवून द्यावा. या विचाराने प्रेरित होऊन ते काम करीत असतात. त्यांना



आपण २०१९ ला निवडून दिलात आणि या पाच वर्षांत त्यांनी विकासाची गंगा या मतदारसंघात आणली हि विकासाची गंगा अशीच वाहती ठेवण्यासाठी त्यांना पुन्हा काम करण्याची संधी द्यावी असे आवाहन माजीमंत्री बसवराज पाटील यांनी केले आहे.

माजीमंत्री पाटील पुढे म्हणाले, या मतदारसंघात विकासाचा खुप मोठा अनुशेष होता. तो भरून काढण्याचा प्रयत्न माझ्या काळात मी प्रामाणिकपणे केला. २०१९ च्या निवडणुकीत आ. अभिमन्यू पवार यांना आपण निवडून दिलात. या दरम्यानच्या काळात लातूर - लामजना - उमरगा - गुलबर्गा हा महत्त्वाचा रेल्वे विषय राहून गेला होता.त्या विषयासंदर्भात दिल्ली वरून मला आमदार अभिमन्यू पवार यांचा फोन आला आणि त्यांनी मला सांगितले की आपण सुरुवात केलेल्या या रेल्वेच्या विषयाला मी पुढे घेऊन जात आहे. यामध्ये आपली मदत मला हवी आहे. त्यावेळी मला खात्री झाली. की मी केलेल्या कामापेक्षाही अधिक विकासाची कामेआमदार अभिमन्यू पवार करू शकतात. आणि सातत्याने मतदारसंघातील अशा अनेक प्रश्नांसंदर्भात ते माझ्याशी सातत्याने चर्चा करत असतात. असे उदाहरण क्वचितच पहायला मिळते. असे मत माजीमंत्री बसवराज पाटील यांनी व्यक्त करुन येणाऱ्या काळात आपल्या कामातून औशाला विकासाचे मॉडेल म्हणुन देशात नवी ओळख करून देतील. यासाठी आ.अभिमन्यू पवार यांना विजयी करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यानंतर आ. अभिमन्यू पवार यांनी बुधोडा, सेलू, एरंडी, याकतपूर, कान्हेरी, जयनगर व खरोसा येथे बैठक घेऊन लोकांशी संवाद साधला.



## लाईटच्या शॉर्टसर्किटने उजेड येथील शेतकऱ्यांचा ऊस जळून खाक

### रयत क्रांती संघटनेतर्फे आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा,**
**येरोळ, दि. ८ नोव्हेंबर-**

उजेड (ता. शिरुर अनंतपाळ) येथील शेतकरी राजकुमार माधवराव खांडेकर यांच्या शेतातील साडे तीन एकर ऊस विज तारेच्या शॉटसर्किट मुळे जळून खाक झाला त्यांच्या शेतात तात्काळ पहाणी करुन रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पेठे, उपाध्यक्ष दिलीप भदरगे, तालुका अध्यक्ष गुडेराव चौसष्ठे यांनी भेट देऊन पाहणी केली व शेतकऱ्यांचे नुकसान पाहुण शेतकरी च शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढे येतो हि भावना ठेवून जिल्हा अध्यक्ष शिवाजी पेठे यांनी शेतकरी राजकुमार खांडेकर यांना मदत म्हणून रोख रक्कम आकरा हाजार रुपये दिले.

शेतातून गेलेल्या विजताराचे घर्षण होऊन स्पार्क झाले व फुलंग्या पडून उसाच्या पाचटाला पेट घेत आग वाऱ्यामुळे वेगाने भडकून संपुर्ण ऊस क्षणात जळून खाक झाला यात शेतातील एक लाखाचे पाईप व इतर वस्तू जळून मोठे नुकसान झाले जवळपास सात लाखाचे आगीमुळे नुकसान झाले असून सध्या विधानसभा निवडणुक प्रचार सुरू असून नेते मंडळींकडून आर्थिक नुकसान पोटी मदत मिळणे दूरच पण नेत्यांना साधे भेटण्यासाठी वेळ मिळत नाही रयत क्रांती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पेठे यांना शेतकऱ्यांची व्यथा कळताच त्यांनी तात्काळ भेट देऊन दिलाशा देत आकरा हाजार रुपये रोख रक्कम मदत म्हणून दिल्याचे शेतकरी राजकुमार खांडेकर यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाध्यक्ष शिवाजी पेठे, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भदरगे तालुका अध्यक्ष गुडेराव चौसष्ठे, भानुदास धुमाळ, नरसिंग चिमणशेट्टी, प्रकाश खांडेकर,माधव चिमणशेट्टी, सतीश रेड्डी, नरसिंग माळी, कमलाकर रेड्डी,वेंकट डांगे, विनोद कुंभार यांच्या सह कार्यकर्ते, पदाधिकारी व शेतकरी आदी उपस्थित होते.

## पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी महायुतीला साथ द्या : आ. पाटील निलंगेकर

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ८ नोव्हेंबर-**

महायुतीने समाजातील सर्व घटकांना समोर ठेवून विविध योजना आखल्या व राबवल्या आहेत. या योजना अधिक ताकदीने व गतीने यापुढेही राबविल्या जाणार आहेत. आपल्या पुढच्या पिढ्यांनाही सुखी,समृद्ध जीवन जगता यावे यासाठी देशाचा, राज्याचा व मतदारसंघाचा विकास होणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी महायुतीला साथ देत पुन्हा एकदा राज्याची सत्ता हाती द्या. निलंगा मतदारसंघातूनही महायुतीच्या विजयासाठी कमळाचे बटन दाबा, असे आवाहन माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

विधानसभा निवडणूक प्रचाराच्या अनुषंगाने आ. निलंगेकर यांनी सुरू केलेली आशीर्वाद यात्रा बुधवारी धनगरवाडी कवठाळा,विळेगाव येथे पोहोचली. ठिकठिकाणी नागरिकांना संबोधित करताना आ.निलंगेकर बोलत होते.यात्रेदरम्यान तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे,विधानसभा प्रभारी दगडू सोळुंके,जिल्हा उपाध्यक्ष अटल धनुरे, देवणी बाजार समितीचे सभापती सदाशिव पाटील,शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख सुधीर पाटील,माजी जिप सदस्य प्रशांत पाटील यांच्यासह मान्यवरांची



उपस्थिती होती.उपस्थितांशी संवाद साधताना आ.निलंगेकर म्हणाले की,निलंगा मतदारसंघातील प्रत्येक गावात विकासकामे झाली आहेत. विकास प्रत्येक घरापर्यंत पोहोचला आहे. नागरिकांचे जीवनमान सुधारले असून तरुणांना रोजगार,महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण यावर काम सुरू आहे. मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उंचावणे हे आपले ध्येय असल्याचे आ.निलंगेकर म्हणाले. नागरिकांची एकी, विश्वास आणि प्रेमामुळेच निलंगा मतदारसंघ विकासाच्या वाटेवर धावत आहे. ही निवडणूक मतदारसंघाच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे सर्वांनी सावध राहत विरोधकांच्या भुलथापांना बळी न पडता मतदान करावे,असेही आ. निलंगेकर म्हणाले. महायुतीने राज्याच्या विकासाचे निर्णय घेतले त्याच पद्धतीने मतदारसंघातील जनतेसाठी आपण कायमच काम करत आहोत.जनहिताच्या योजना आपल्यापर्यंत पोचवण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचेही आ.निलंगेकर यांनी यात्रेदरम्यान बोलताना सांगितले. धनगर वाडी येथे युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष रामलिंग शेरे,माजी सरपंच हनुमंत बिराजदार, जगन्नाथ बोडके,लहुजी बोडके,माधव बोडके, कवठाळा येथे जिल्हा बँकेचे संचालक भगवानदादा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अनिल इंगोले,देवणी बाजार समितीचे माजी सभापती बालाजीराव बिराजदार, संगम पताळे,माजी पंस सदस्य महेश सज्जनशेटे, व्यापारी आघाडीचे राजकुमार हुडगे,महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष रंजना पोलकर, आणि विळेगाव येथे मान्यवरांसह आठवले गटाचे उपजिल्हाप्रमुख अंकुश ढेरे,प्रशांत पाटील दवण हिप्परगेकर, उषाकिरण बिराजदार, राज गुणाले, सुधीर भोसले, विजय मुक्के, अनिल जाधव उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारातून हिंदुत्व टिकवा : गोविंददेवगिरी महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. ८ नोव्हेंबर-**

लोकसभेच्या निवडणुकीत ४० टक्के हिंदूनी हिंदुत्ववाचा विचार न करता मतदान केले. तर १६ टक्के मुस्लिम मतदारांनी एकवटून हिंदुत्ववादी नेतृत्वाला बगल देत मतदान केले.यामुळे झालेला परिणाम आज आपण पाहतो आहे. देशाची ओळख, संस्कृती टिकवायची असेल तर १०० टक्के मतदान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारातील हिंदू विचारसणीतील उमेदवारास करुन हिंदुत्व टिकवा, असे आवाहन अय्योध्या येथील श्री राम मंदीर समितीचे कोषाध्यक्ष तथा मथुरा येथील श्रीकृष्ण मंदीर समितीचे उपाध्यक्ष परमपूज्य स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांनी केले.

शिवचैतन्य जागरण यात्रेचे औसा येथे स्वागत करण्यात आले. व हनुमान मंदिरापासून गांधी चौक ते नाथ संस्थान सभागृहापर्यत स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांची रथातून मिरवणूक काढण्यात आली. तर शहरवासियांनी फुलांची उधळण करीत ठिकठिकाणी स्वागत केले. यानंतर श्रीराम जन्मोत्सव समिती, श्री चिंतामणी प्रतिष्ठाण व श्री आझाद गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्याशिवचैतन्य जागरण यात्रा मेळाव्याला मार्गदर्शन करताना स्वामी गोविंददेवगिरी महाराज बोलत होते. व्यासपिठावर पंढरपुर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदीर समितीचे सहअध्यक्ष तथा नाथ संस्थानचे अध्यक्ष गहिणीनाथ महाराज औसेकर, हभप महेश महाराज कानेगावकर, हभप छात्रगिरी




महाराज बामणीकर उपस्थित होते. स्वामी गोविंददेवगिरी महाराज म्हणाले, लोकशाहीच्या या भारतात ८४ टक्के हिंदू तर १६ मुस्लिम आहेत. प्रत्येक निवडणुकीत मुस्लिम समाजाला साथ देणाऱ्या नेत्यांची निवड करुन एकवटून मतदान करीत निवडून आणतात. पण सर्वाधिक हिंदू असूनही आपण मतदानाचा हक्क पूर्णपणे बजावत नाहीत. यामुळे सत्तेत हिंदू विचारविरोधी सरकार सत्तेत येत आहे. केवळ मतासाठी होणाऱ्या राजकीय खेळीमुळे तिरुपतीबालाजी, सिध्दीविनायक, शिर्डी अशी अनेक देवस्थानं तुमच्या ताब्यात नाहीत. यासाठी सत्ताधाऱ्यांनी ७० वर्षात का प्रयत्न केले नाहीत. याचा विचार करण्याची गरज आहे. यावर मात करायची असेल तर हिंदुत्वाची एकजुट करणे हाच एकमेव उपाय असून छत्रपतींच्या विचाराचे नेतृत्व मतदानातून निवडण्याची गरज असल्याचे मत स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांनी व्यक्त केले.

**एकमत नवी दिशा देऊ शकते : गहिनीनाथ महाराज**

मतदानाचा हक्क बजावण्याचे संस्कार वडिलांनी घालून दिले आहेत.कितीही काम असले तरी मतदानाच्या दिवशी सुट्टी घेऊन आमच्या कुटुंबातील प्रत्येकजण मतदान करतात.एक एक मत गोळा झाले तरच एकमत होवून आपल्या विचारधारेला, संस्कृतीला व हिंदुत्वाला बळकटी देशाला नवी दिशा देऊ शकते.यासाठी प्रत्येकांनी मतदान करुन सहभाग घ्यावा. असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदीर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराजांनी केले.

**भारतात का घडत नाही**

दोन दिवसापूर्वी झालेल्या निवडणुकीत हिंदुनी एकत्रित येऊन जगाच्या महासत्तेचा राष्ट्रपती बदलून दाखविला.आता भारतात घडविण्यासाठी हिंदूनी एकत्रित येवून हिंदू संस्कृतीशी, विचारधारेशी सहमत असलेला आपला नेता निवडणुकीत निवडावा, असे आवाहन स्वामी गोविंददेवगिरी महाराजांनी केले.